शनिवार । ६ डिसेंबर १९८० । एक रुपया

# माणूस

संपादक ' माणूस '

आपले कोणत्या शब्दात अभिनंदन करावे कळत नाही. विजय परूळकर यांनी ' योद्धा शेतकरी ' हा लेख लिहून आमच्या मनीची व्यथा बोलकी केली. प्रस्तुतीकरण तर अत्युत्तम. कृपया माझे हार्दिक अभिनंदन कळविणे.

आणि खुद्द शरद जोशी यांच्याबद्दल काय लिहावे ! मीही एक शेतकऱ्याचा मुलगा आहे; परंतु आम्ही पांढरपेशी शहरी वातावरणात रमलेले लोक; आपल्या ग्रामीण मातीचा संबंध, यत्किंचित निर्विकारपणे कपड्यावरील माती झटकून टाकतो, तितक्या सहजपणे विसरून जातो. मनाच्या आतल्या कप्प्यात केवळ अगतिक कळकळ व सहानुभूती दडलेली असते. त्यांनी शेतीव्यवसायाचा समग्र अभ्यास करून व शासनाची तथाकथित हरितक्रांती वगैरेचे नागडे दर्शन घडविले.

आता निर्धार एकच. आपली बाजू सत्य आहे. माघार घेणे नाही !

आपल्या ' माणूस ' मधील हा लेख आम्ही सर्व प्राध्यापकांनी सामूहिकपणे वाचला आणि सगळे अस्वस्थ झालो.

## पुढील अंकापासून

# योद्धा शेतकरी

ही अस्वस्थता काय निष्पन्न करते, तेच बघायचं.

समयोचित संपादनाबद्दल पुन्हा एकदा मनस्वी अभिनंदन !

२८ नोव्हेंबर, ८० शरद पुसदकर
धामणगाव रेल्वे
( जि. अमरावती )

# दवंडी...

बिजय परुळकर

श्रीवर्धन मतदार संघातून धो धो मतांनी निवडून आलेले आपले लाडके मुख्यमंत्री जनाब अबदुर् रहमान अंतुलेसाहेब छत्रपती शिवाजीमहाराजांची तलवार आणण्यासाठी इंग्लंडात गेले आहेत. जाण्यापूर्वी| शेतकरी-नेत्यांना ' गय करणार नाही ', ' वठणीवर आणीन ' अशा लोकशाही सूचना त्यांनी दिलेल्याच आहेत. आजी मुख्यमंत्री महाराजांचे खड्ग आणण्यासाठी विलायतेच्या दौऱ्यावर निघण्याच्या तयारीत असतानाच आपले लाडके माजी मुख्यमंत्री शरदरावजी पवार ह्यांनी छत्रपतींच्याच वारसदारांच्या वतीनं ' रक्ताचा सडा पडला तरी बेहत्तर ' अशी प्रक्षोभक घोषणा केली.

' ही श्रीची इच्छा ' अशा रीतीनं प्रकट होताना पाहिली की महाराष्ट्रातील शेतकरी आंदोलन ' राजकीय ' आहे ह्याची खात्री पटते–म्हणजेच शेतकरी संघटनेच्या आंदोलनामुळे राजकारणी मंडळी अडचणीत आली आहेत हे सत्य उघडकीस येते. राजकारण करणाऱ्यांची ही धावपळ चालू असतानाच शेतकरी संघटनेचे नेते शरद जोशी हे मात्र २८ नोव्हेंबर १९८० रोजी शांतपणे घोषणा करतात की, आंदोलन १४ डिसेंबरपर्यंत–सरकारला योग्य निर्णय घेण्यास अवसर मिळावा म्हणून–स्थगित करण्यात येत आहे !

शरद जोशी–एक सुविद्य, प्रामाणिक, त्यागी व शेतकऱ्यांविषयी खरी कळकळ असणारा माणूस. शतकानुशतके गुराढोरांप्रमाणे राबविल्या गेलेल्या, प्रस्थापितांकडून लुबाडण्यात आलेल्या शेतकऱ्याला शरद जोशींनी ज्ञानदान करून जाग आणली. बळीराजा आपली मरगळ झटकून उठला... हे जे नवल वर्तले ती सत्यकथा मी यदाच्या ' माणूस ' दिवाळी अंकातून ' योद्धा शेतकरी ' या लेखाद्वारे वाचकांना सादर केलीच आहे.

शेतकऱ्याच्या शेतमालाला त्याचा सर्व उत्पादनखर्च भरून निघेल असा भाव मिळाला पाहिजे ही एकच रोकठोक मागणी ! ह्या ' एक कलमी ' कार्यक्रमावर शेतकरी संघटनेनं लढा उभा केला आणि सिंहासन डळमळू लागलं. हा लढा केवळ 'बड्या शेतकऱ्यांचा'–उसाच्या किंवा कांद्याच्या भावाचा आणि नाशिक जिल्ह्यापुरताच मर्यादित अशी समजूत करून घेणं म्हणजे आपलं ग्रामीण विभागाबाबतचं अज्ञानच प्रकट करणं आहे.

२७ ऑक्टोबर १९८० रोजी श्रीगोंद्याला एक गरीब शेतकरी नाना चौधरी पोलिस इन्स्पेक्टर शिंदे ह्यांच्या पिस्तुलाची गोळी लागून हुतात्मा झाले. तेव्हापासून १० नोव्हेंबरपर्यंत शेतकऱ्यांच्या नेत्यांशी वाटाघाटी करण्यासाठी शासनकर्त्यांना भरपूर अवधी होता; पण सत्ताधाऱ्यांनी शहामृगाची भूमिका स्वीकारली. शेतकऱ्यांना नाइलाजास्तव बांधावरचा लढा ' रस्त्यावर ' आणावा लागला. रस्ता रोको, रेल रोको आंदोलन सुरू झालं. सरकारनं आंदोलन चिरडून टाकण्याचं ठरवलं आणि खेरवाडीला पहिल्याच दिवशी दोन शेतकरी आणि एक पोलीस मृत्युमुखी पडले.

शेतकरी संघटनेनं खेरवाडीच्या हुतात्म्यांच्या कुटुंबाला प्रत्येकी एक लाख रुपये देण्याचं जाहीर केलं आहे–धारा-


**साप्ताहिक माणूस**

वर्ष : विसावे

अंक : सत्ताविसावा

६ डिसेंबर १९८०

किंमत : एक रुपया

संपादक
श्री. ग. माजगावकर

सहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी :
चाळीस रुपये

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन अंकात व्यक्त झालेल्या मताशी चालक सहमत असतीलच असे नाही.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यानी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे, येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

**साप्ताहिक माणूस**

१०२५ सदाशिव, पुणे ३०. दूरध्वनी : ४४३४५९

तीर्थी पडलेल्या पोलिसाच्या कुटुंबाला देखील ! बळीराजा कंगाल आहे–पण न्यायी आणि उदार आहे त्याचा हा अभूतपूर्व पुरावा !

दहा नोव्हेंबरपासून अठ्ठावीस नोव्हेंबरपर्यंत–एकोणीस दिवस शेतकरी संघटनेच्या आंदोलनानं दिवसागणिक वेगळं रूप धारण केलं ! ग्रामीण भारताच्या या स्वातंत्र्यलढ्याची सुरुवात अतिशय जवळून अनुभवण्याचं भाग्य मला लाभलं. दिवाळी अंकातील लेख लिहिल्यानंतर आता श्रीगोंद्याचा गोळीबार आणि नासिक-धुळे जिल्ह्यातील शेतकरी संघटनेच्या आंदोलनाच्या पहिल्या एकोणीस दिवसांचा चक्षुर्वैसत्य वृत्तान्त वाचकांसमोर मांडणं जरुरीचं आहे असं मी समजतो.

मी आणि माझ्या बायकोनं हे आंदोलन पुण्यात बसून किंवा नासिक शहरातील हॉटेलच्या खोलीमध्ये बसून बघितलं नाही. एकोणीस दिवस आम्ही सतत नासिक आणि धुळे जिल्ह्यात दिवसरात्र फिरत होतो. शेतकऱ्याच्या, स्थानिक राजकीय पुढाऱ्याच्या, रस्त्यावर अडकलेल्या ट्रकड्रायव्हर्सच्या, एस. आर. पी कडून निर्घृण अत्याचार सहन केलेल्या स्त्रियांच्या-वृद्धांच्या असंख्य मुलाखती आम्ही 'टेप' केल्या आहेत. 'माणूस' च्या वाचकासमोर क्रमशः व विस्ताराने हे सर्व मांडण्याची आमची इच्छा आहे.

'खबरनामा' ही लेखमाला यामुळे थोडी बाजूस सारावी लागत आहे, त्याला इलाज नाही. 'योद्धा शेतकरी' लेखमालेनंतर ती पुन्हा सुरू करावी असे सध्या तरी मनात आहे. वाचक या बदलामुळे फारसे नाराज होणार नाहीत अशी आशा बाळगतो. □

---

पुणे वार्ता

# विद्यापीठ पदवीदान

## हा सारा पोकळ डामडौल, ही उधळपट्टी कशासाठी ?

दि. ३० नोव्हेंबर. पुणे विद्यापीठाचा परिसर फुललेला. गाड्यांची, बसेसची जोरात वर्दळ चालू. वाहनं भरभरून माणसं येत होती. एखाद्या महोत्सवाचं वातावरण सर्वत्र निर्माण झालेलं. कुणी सर्टिफिकेटस् मिळवण्याच्या धादलीत होतं, तर कुणी गाऊन. त्यातच फोटो काढणाऱ्यांची आणि काढून घेणाऱ्यांची धावपळ चालू.

आज विद्यापीठाचा ६३ वा विशेष पदवीदानसमारंभ होता. केंद्रीय आरोग्य व कुटुंबकल्याणमंत्री बी. शंकरानंद येणार होते. दुपारचे चार वाजले आणि पोलिसाची पायलट कार मुख्य प्रवेशद्वारातून आत शिरली. पाठोपाठ मंत्रिमहोदय. प्रवेशद्वारापाशीच यूथ कॉंग्रेस (अरस) तर्फे निदर्शनं आयोजित करण्यात आली होती. 'शेतीमालाला योग्य भाव मिळाला पाहिजे' पासून 'मारुती मोटारीचं राष्ट्रीयीकरण रद्द करा' पर्यंत वाट्टेल त्या मागण्याची मोळी निदर्शकानी एकत्र बांधली होती. मध्येच एक-दोनदा 'राष्ट्रपती राजवट नही चलेगी', अशाही घोषणा झाल्या. जेमतेम पन्नास जण, त्यांच्यासमोर जाळ्या धरलेल्या. पोलीस शांतपणे उभे, निदर्शकही शांतपणे घोषणा देत होते. सगळंच नाटक. राजकीय पक्षाच्या व नेतृत्वाच्या दिवाळखोरीचंच हे आणखी एक दृश्य होतं

चार वाजून वीस मिनिटं झाली आणि विद्यापीठाच्या पदवीदान-सभागृहातून मिरवणूक सुरू झाली. सर्वात पुढे विधिसभा व कार्यकारिणीचे सदस्य.त्यानंतर कुलगुरु डॉ राम ताकवले, मुख्य पाहुणे बी. शंकरानंद, कुलसचिव सुभाषचंद्र भोसले इत्यादी मंडळी. सर्वांनी भरजरी गाउन्स घातलेले. अतिशय नयनमनोहर दृश्य होतं; पण त्याच वेळी या सर्व कृतीतला तकलादूपणाही बोचत होता. दुर्धर रोगानं शरीर पोखरलं गेलं असताना वरकरणी मात्र एखाद्याने तजेलपणा दाखवावा तसं हे सर्व भासत होतं.

ही सर्व सन्मान्य मंडळी आसनस्थ झाल्यावर निरनिराळ्या विद्याशाखाचे पदवीधर तरुण आणि तरुणी गाऊन्स घालून पुढे येऊ लागले. एकेक गट व्यासपीठासमोर येऊन उभा राहात असे. कुलगुरु व्यासपीठावरच्या मंडळींना उद्देशून काही तरी म्हणत, मंडळी 'ओम' किंवा 'हो' किंवा दोन्हीही म्हणत होती, गट पुढे सरकत होता. पुन्हा पुढला गट. असंख्य तरुण–तरुणी यामध्ये अजूनही उत्साहाने भाग घेतात हे पाहून अचंबा वाटला आपण मोठं जगज्जेतेपदच मिळवलं आहे अशाच रुबाबात ही मंडळी पहात आणि चालत होती. कदाचित खरंच त्यानी ते मिळवलं असेलही. कारण प्रत्येकाचं जगायचं आणि जिंकायचं जग वेगवेगळच असतं की !

गेल्या वर्षीपासून पी. एच. डी. मिळवणाऱ्याना कुलगुरूंच्या हस्ते या समारंभातच पदव्या प्रदान करण्याची योजना कार्यवाहीत आली आहे. त्यानुसार यंदा १०६ जणानी पदव्या घेतल्या. विविध विषयामध्ये विशेष प्राविण्य मिळवणाऱ्याना सुवर्णपदकेही कुलगुरूंच्या हस्ते देण्यात आली,

हा सर्व कार्यक्रम आटोपल्यानंतर कुलगुरू डॉ राम ताकवले यांनी भाषण केलं. आपल्या भाषणात त्यानी गेल्या आठ–दहा महिन्यातील विद्यापीठातील घडामोडीची माहिती दिली. तसंच नवीन उपक्रम व आगामी योजनाचीही रूपरेषा सांगितली. नंतर मंत्रिमहाशय बोलायला उभे राहिले अतिशय घाणेरडे उच्चार करत त्यानी मराठीत छापलेलं भाषण कसबसं वाचून संपवलं. 'प्रतिगामी शक्तीविरुद्ध लढा द्या', 'राष्ट्रीय एकात्मता फोडू पाहणाऱ्याना निपटून काढा',

'आपल्या ज्ञानाचं राष्ट्रीय विकासाशी नातं कसं निर्माण होईल याकडे विशेष लक्ष दिलं पाहिजे', 'राष्ट्रीय शिस्त अंगी बाणवली पाहिजे' असली फक्त आज्ञार्थ व विध्यर्थातलीच वाक्यं महोदय बोलत होते. त्याच्या भाषणात चिंतन किंवा विचार कुठेच नव्हता. सगळी आपली वृत्तपत्रामधल्या बातमीला उपयोगी पडतील अशी 'लीड' चीच वाक्यं.

शेवटी एकदाचं 'क्षणोक्षणि पडे, रडे परी बळे उठे बापडी' या शैलीनं चाललेलं 'मराठी' तील भाषण संपलं. प्रथम प्रमुख पाहुणे, कुलगुरु, कुलसचिव निघाले, मग सगळे विधिसभा व कार्यकारिणी—सदस्य. अर्धेअधिक प्रेक्षक मंत्रिमहोदयांचं भाषण चालू असतानाच निघून गेले होते. आता उरलेलेही निघाले.

विद्यापीठाचा पदवीदानसमारंभ कसा असावा याबद्दल सध्या पुन्हा एकदा उलटसुलट चर्चा सुरू झाली आहे. या प्रसंगी पदवीधर किंवा प्रमुख पाहुणे व इतर सन्मान्य व्यक्ती जो पोषाख घालतात तो तर आपल्यातली गुलामगिरीची वृत्ती अजून गेली नसल्याचंच द्योतक आहे. दुपारी विद्यापीठातल्या दुय्यम अधिकाऱ्यापर्यंत सर्वजण सुटा—बुटात कसे जिवंत राहू शकत होते हे तर अजूनही न उलगडलेलं कोडं आहे !

हे सगळं कशासाठी करायचं ? हा मबंध समारंभ गंभीरपणानं अंगीकार करणारी शेकडा दहासुद्धा माणसं समारंभाच्या स्थानी निघाली नसती. व्यासपीठावर बसलेले सदस्यसुद्धा आपापसात गप्पा मारत, हसत—खिदळत होते. मग हा सारा पोकळ डाम—डौल, ही उधळपट्टी कशासाठी ? यापेक्षा आमच्या एका मित्रानं सुचवलेली कल्पना नामी आहे. तो म्हणाला, 'विद्यापीठ जसं परीक्षाच्या निकालांच्या मार्कलीस्टस त्या त्या कॉलेजकडे पाठवून देतं तसंच त्यांनी आता पदव्याची सर्टिफिकेटसूही पाठवायला लागावं. प्रत्येक कॉलेजनं आपापल्या विद्यार्थ्यांचा पदवीदानसमारंभ स्वतंत्रपणे आयोजित करावा म्हणजे त्यातलं सध्याचं पोकळ अवडंबरही आपोआपच कमी होईल आणि तो एक माजी विद्यार्थ्यांचा व त्याच्या पालकाचा उत्तम मेळावा-गेटटुगेदर होईल.' अर्थात 'विद्यापीठाचा पदवीदानसमारंभ विद्यापीठाच्या प्रांगणात भव्यतेनं आणि गभीरपणानंच साजरा झाला पाहिजे' असल्या खुळचट कल्पना मात्र त्यासाठी सोडून दिल्या पाहिजेत. ◻

---

# पूर्व प्राथमिक शिक्षणाचा डोळस विचार हवा

---

महाविद्यालयीन आणि पदव्युत्तर शिक्षणपद्धतीबाबत आपल्याकडे अनेक शिक्षणतज्ज्ञानी 'बराच' विचार केलेला आहे. नुकत्याच सुरू झालेल्या सत्रपद्धतीच्या संदर्भात अनेक शिक्षणतज्ज्ञानी अगदी डोकी फोडून घेतलेली आहेत. या सर्व विचारातून शिक्षणपद्धतीत आमूलाग्र बदल सुचविण्यात येतात जे आपल्याला प्राप्त परिस्थितीत सहजी स्वीकारणे शक्य नसते. मुलगा शिक्षणक्षेत्रात उतरून १०–१२ वर्षे झाली की मग त्याच्या पुढील शिक्षणाची काळजी केली जाते, म्हणजे मूळ सोडून फादीवर घाव घालाण्यासारखे हे कृत्य असते. त्यामुळे पूर्वप्राथमिक किंवा प्राथमिक शिक्षणाबाबत अजूनही म्हणावा तसा विचार झालेला दिसत नाही.

या पार्श्वभूमीवर पुण्यात नुकताच झालेला 'पूर्व प्राथमिक शिक्षण' या विषयावरील परिसंवाद लक्ष्यवेधी तेवढाच उद्‌बोधक ठरला. युनिव्हर्सिटी वुमेन्स असोसिएशन या संस्थेतर्फे हा परिसंवाद आयोजित करण्यात आला होता. ही संस्था बायकांची; पण सभासद स्त्रियानी या विषयाकडे आपले लक्ष 'वळवून' विशेष कार्य हाती घेतले आहे या संस्थेने नोकरी करणाऱ्या स्त्रियासाठी एक वसतिगृह बांधले आहे, ज्याचा लाभ अनेक नोकरदार स्त्रिया आज घेत आहेत.

इतर संस्थाप्रमाणे नुसता देखावा करण्यापेक्षा ही संस्था वेगळी वाट चोखाळते आहे हे विशेष. या संस्थेतर्फे काही महिन्यांपूर्वी पुण्यातील पूर्व प्राथमिक शाळाची पाहणी करण्यात आली. या पाहणीत त्या शाळाची स्थिती समाधानकारक नसल्याचे आढळून आले. त्यामुळे यावर काही उपाययोजना आखण्याच्या दृष्टीने पहिला टप्पा म्हणून हा परिसंवाद आयोजित करण्यात आला होता.

रानडे इन्स्टिट्यूटमध्ये दुपारी साडेतीन वाजता संसारी बायका, शिक्षिका एकत्र झाल्या. नावाला एकदोन पुरुष; पण हॉल मात्र भरलेला. दुपारच्या वेळेला विश्रांती घ्यायची सोडून या स्त्रिया (मोटारीतून का होईना !) हा परिसंवाद 'अटेंड' करायला आल्या होत्या. श्रोत्यांपैकी अनेक स्त्रिया वक्त्यांच्या भाषणांच्या चक्क नोटस् घेत होत्या, या नोटस्‌चा व्यवहारात वापर कसाही होवो पण विषयाबद्दलची त्याची आत्मीयता यातून दिसून आली.

परिसंवादात भाग घेणारी एकही स्त्री 'परिसंवादी' नव्हती, तर आपले स्वत चे अनुभव आणि त्यातून येणारं वा आलेलं शहाणपणच त्या बोलून दाखवत होत्या. पूर्व प्राथमिक शिक्षणाबाबत बालक वा शिक्षक खरोखरच फार हयगय करतात. वास्तविक याच काळात झाडाला खतपाणी घातले तर त्याला मोहक फुलं, फळं येतील यावर बहुधा त्याचा विश्वासच नसावा. मला आठवतंय, प्राथमिक शाळेत जाण्यापूर्वीचं भोकाड शाळेतच चालू राहिलं तर चक्क पट्ट्यांचा मार मिळायचा हो ! बरं, आई घरी गेलेली त्यामुळे दाद कुणाकडे मागणार ! ही परिस्थिती आता सर्वत्र दिसून येते. शिक्षकाना पाल्याबद्दल प्रेम, जिव्हाळा ही फक्त पुस्तकी भाषा झाली ! या परिसंवादात याच वर्मावर बोट ठेवलं गेलं.

सुरुवातीला श्रीमती चंद्राताई नाडकर्णी व श्रीमती इंदुमती राव यांनी पूर्व प्राथमिक शाळाची सध्याची स्थिती असमाधानकारक असल्याचे सांगितले. सस्थेतर्फे या दोघीनी पूर्व प्राथमिक शाळाची पाहणी केली. त्या पाहणीत आलेल्या गोष्टी त्यानी परिसंवादाची प्रस्तावना म्हणून कथन केल्या.

नतर श्रीमती शाताबाई श्रह्मे बोलल्या. आदर्श स्वावलंबी नागरिक निर्माण करण्याची प्रक्रिया पूर्व प्राथमिक शिक्षणापासूनच सुरू होते अस सागून त्या म्हणाल्या, "प्राथमिक शाळा ह्या सस्कारकेंद्र आहेत, विकासाची केंद्र आहेत. बालकावर ह्या वयात होणारे संस्कार त्याला आयुष्याची साथ करीत असतात, त्यामुळे याच वयात त्याच्यावर चागले संस्कार करण्याच काम फार महत्त्वाच मानलं पाहिजे. त्या बालकाला वेगवेगळे

अनुभव घेऊ दिले पाहिजेत. त्याला मुक्तपणा दिला पाहिजे. त्याला जर सतत धाक दाखवला तर पुढे तो कोरडा बनू लागतो. त्याच्या मनातली आदराची भावना जाऊन तिथं तिरस्काराची भावना निर्माण होते. त्यामुळे याच वयात बालकाला सृजनशील बनण्यासाठी भरपूर वाव दिला पाहिजे."

शाताबाईंचे हे विचार पुस्तकातले नाहीत तर त्याचा सामाजिक कार्यातील अनुभवाचे आहेत. शाताबाईंनी परिसवादाला सुरुवात तर चागली केली. निदान प्रत्येक श्रोता मनातल्या मनात विचार तरी करू लागला असावा.

मला आठवले आमच्या शाळेतले श्लोक. हे श्लोक सस्कृतमधले, आम्हाला त्याचा अर्थ धड कळत नव्हता ना शिक्षकाना सांगता येत होता; पण आम्ही दडपून म्हणत असू कारण चुकलं की छडी. हे श्लोक, परवचा कशासाठी म्हणायचे असतात ? हा त्या वेळी पडलेला प्रश्न अजूनही तसाच राहिलेला आहे. सस्कार म्हणजे शुभ करोति...म्हणणं का हे कोडच मला पडलेलं आहे. मारून–मुटकून मास्तराच्या किंवा शिक्षकाच्या मनाप्रमाणे वागण याला सस्कार म्हणतात का ?

श्रीमती शाताबाई आठवलेंनी या प्रश्नाला वाचा फोडली. मुलाच्या मनावर वातावरणाचा एक परिणाम होत असतो आणि हे लक्षात घेऊन शाळेत ही वातावरणनिर्मिती करायला हवी, अस त्याचं म्हणण. यासाठी मुलाच्या गरजा समजून घेतल्या पाहिजेत. या गरजा शारीरिक असतात तशाच त्या मानसिकही असतात. अन्न, वस्त्र, निवारा या गोष्टीची पूर्तता करताना शहरी पालकही काही गोष्टी ध्यानात घेत नाहीत. समतोल आहार हा खेड्यात वा शहरात केवळ अज्ञानामुळे दिला जात नाही. मुलाला दररोज डब्यातून केक, नाही तर बटर–स्लाइस असले पदार्थ शहरी पालक देतात हे अयोग्य आहे. शहरातून मुलाच्या व्यायामाकडे दुर्लक्ष होते. या लहान वयात आपल्या शरीरावर ताबा मिळविण्याचा दृष्टीने किमान व्यायाम आवश्यकच असतो. व्यायामाबरोबरच त्याच्या कामात बदलही हवा. हा बदल म्हणजे त्याचे मनोरंजन. या शारीरिक गरजाबरोबरच त्याला मानसिक गरजाही असतात. 'बालकाला हवं असत प्रेम शाळेत प्रेमाचा 'दुष्काळ'च दिसून येतो. प्रेमापोटी मिळणारं घरातलं सरक्षण शाळेतही मिळतं अशी त्याची भावना झाली तर शाळेबद्दल त्याला आपुलकी वाटू लागेल.

मुलगा–मुलगी असा भेद करून त्या मुलाला हिडिसफिडिस करण त्याच्या विकासाच्या दृष्टीने अयोग्यच. (आमच्या ओळखीतल्या एकाना लागोपाठ तिसरी मुलगी झाली. त्यामुळे त्या तिसरीला इतका बेदम मार बसायचा की त्यामुळे ती रडकी न बनता घाबरट झाली. आपल्याला 'स्वीकार' नाही ही भावना तिच्यात बळावू लागल्याचं मी पाहतेय.)

याच मुद्द्याला धरून त्यापुढील वक्त्या श्रीमती शालिनी केळकर यानी आपले विचार सोदाहरण मांडले. 'आपल्याला जगण्यासाठी समृद्ध करणारी गोष्ट म्हणजे शिक्षण' अशी साधी सरळ व्याख्या त्यानी केली. बालकाला आपल्या अस्तित्वाची जाणीव २ ते ७ या वयातच करून द्यायला हवी. आपण कुणी तरी आहोत ही जाणीव त्याला असायला हवी. त्यासाठी त्याच्यावर त्याला पेलतील अशा जबाबदाऱ्या टाकल्या पाहिजेत. त्यामुळे त्याच्यामधे आत्मविश्वास निर्माण होतो. त्याला समवयस्क मित्रही असायला हवेत, नाही तर मुलगा एकलकोंडा होतो. सध्याच्या विभक्त कुटुबपद्धतीत त्याचे मित्र त्याच्याभोवती वातावरण निर्माण करीत असतात. मुलान कोणतीही कृती केली की त्याला पालकानी, शिक्षकानी मान्यता द्यायला हवी. (आम्ही होडी करून मोठ्याना दाखवली की, मोठे लोक बोलत असताना मधेमधे बोलू नये एवढंही कळत नाही का? असा प्रतिप्रश्न आम्हालाच विचारला जायचा !) मुलाची जिज्ञासा स्वावलबनाकडे असते. सभोवतालच्या परिस्थितीवर ताबा मिळविण्याची ती धडपड करीत असतात. ही धडपड मानवीच आहे. कित्येकदा घरगुती अडचणीमुळे मुलाची कोंडी होते, अशा वेळी त्याच्या विकासाला शाळेतच वाव मिळू शकतो. शाळा म्हणजे त्याच्या लेखी मुक्त क्रीडागण असायला हवं. शालेय अभ्यासक्रमापेक्षाही वेगळे शिक्षण पालकानी द्यायला हवं.

श्रीमती अरुणाताई ससे यानी अनौपचारिक शिक्षणाची गरज प्रतिपादन केली. प्राथमिक शिक्षणाची पूर्वतयारी करणं म्हणजे काय हे पालकांनी आणि शिक्षकानी समजून घ्यायला हवं. मुलाना विविध अनुभव दिले पाहिजेत, वेगवेगळ्या प्रकारच्या अनुभवातून येणारं शहाणपण पुस्तकी ज्ञानापेक्षा वेगळं असत, पण त्यासाठी मुलाना सधी द्यायला हवी. शालेय अभ्यासक्रमात पाठ्यपुस्तकाव्यतिरिक्त इतर अभ्यासक्रम असतात याची जाणीव शिक्षकानी ठेवली पाहिजे.

शाळा कशासाठी चालविली जाते, तिची ध्येयधोरणे, उद्दिष्टे कोणती आहेत याची जाणीवच पालकाना असत नाही, असे मत श्रीमती पद्माताई टेंबे यानी व्यक्त केले. त्या म्हणाल्या, त्यामुळे शाळानी प्रथम पालकाना एकत्र आणून हे सागितलं पाहिजे. शाळेतलं शिक्षण आणि घरातल शिक्षण असा भेदभाव असताच कामा नये. नाही तर मुलगा शाळेत अगदी शिस्तीत वागतो पण घरत मात्र बेशिस्त राहतो. यासाठी शिक्षक आणि पालक यानी समांतर राहून चालणार नाही, त्यानी एकत्र येऊन बालकाची सर्वांगीण वाढ होण्यासाठी जबाबदारी पेलली पाहिजे तरच उद्याचे देशाचे आधारस्तंभ आशादायी ठरू शकतील.

श्रीमती सुचित्रा राजूरकर यांनी या परिसवादानंतर प्रत्यक्ष कामाला सुरुवात केली पाहिजे असा इशारा दिला. पालक आणि शिक्षक यांच्या देवाणघेवाणीतून हे हे प्रश्न सुटू शकतील अशी आशा त्यानी व्यक्त केली.

या परिसंवादामुळे प्रथमच पूर्वप्राथमिक शिक्षणपद्धतीसंबधीचे विचार मांडण्यात आले. हा विषय खरं तर घराघरातच गेला पाहिजे. कारण प्रत्येक आईबापाची आपल्या लेकराबद्दल काही ना काही तक्रार असतेच. त्याना हे समजून सागायला हवं की 'बाबानो तुम्ही ज्याला तक्रारी म्हणताहात त्या तक्रारी नाहीतच. जरा डोळसपणानं पाहा तुम्हाला तुमच्यातच काही दोष आढळून येतील.'

—प्रतिनिधी

पोटनिवडणुकांचा कौल

# विरोधकांना पक्षबांधणीचा आणखी एक इशारा

विजय कुवळेकर

सात राज्यामध्ये विधानसभाच्या पंधरा जागांसाठी नुकत्याच झालेल्या पोटनिवडणुकानी याआधीच्या दोन निवडणुकीचाच कल कायम ठेवला आहे. कॉंग्रेस (आय) न दोनतृतियांश (दहा) जागा आणि इतर सर्व विरोधी पक्षानी मिळून एकतृतियाश (पाच) जागा मिळवल्या आहेत. दहा महिन्याच्या काळात कॉंग्रेस (आय)चा लोकमानसावरचा प्रभाव कमी झाला नाही आणि विरोधकांना आपलं बळ वाढवता आलेलं नाही, हे या पोटनिवडणुकानी दाखवून दिलं आहे. यात अंतर्भूत असलेला इशारा जाणून घेऊन विरोधी पक्ष कामाला लागणार की आकडेवारीचे खेळ करून आपलं बळ कस वाढलं आहे, याचे फसवे दावे करत राहणार, हा खरा प्रश्न आहे. वास्तविक जानेवारी १९८० मध्ये झालेल्या लोकसभेच्या मध्यावधी निवडणुकीपासून आजतागायत कॉंग्रेस (आय) विरुद्ध जनतेत असंतोष निर्माण होण्यासारखं बरंच काही घडलेलं आहे. लोकसभा निवडणुकीच्या वेळीही कॉंग्रेस (आय) नं आणि पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यानी अनेक आश्वासनं दिली होती. त्यांची पूर्तता करण्याच्या दिशेनं सरकारची समाधानकारक वाटचाल नाही. जीवनावश्यक वस्तूंचे भाव सतत वाढत्या पातळीवरच राहिले आहेत. ज्या 'कायदा व सुव्यवस्था स्थिती'चा इंदिरा गाधी सतत उद्घोष करीत होत्या आणि जनता राजवटीवर ठपका ठेवत होत्या ती कायदा व सुव्यवस्था स्थिती त्याच्या राजवटीत अधिकच बिघडली आहे. जातीय आणि धार्मिक तणाव वाढून संघर्ष निर्माण झाले आहेत. मोरादाबादसारख्या घातक दगलीना सरकार आवर घालू शकलेलं नाही या साऱ्यामुळे सर्वसामान्य जनता त्रस्त झालेली आहे. या असतोषाबरोबरच कॉंग्रेस (आय) मध्ये पक्षातर्गत झगडे संजयच्या निधनानंतर पुन्हा वाढले आहेत. संजयनं कामाला जुपलेली पक्षसंघटना शिथिल झाली आहे. सत्तेवर येऊन जवळजवळ वर्ष पूर्ण होत आलं तरी इंदिरा गाधी आपलं मंत्रिमडळही पूर्ण करू शकलेल्या नाहीत.

सत्ताधारी पक्षाचं एवढं नाकर्तेपण आणि अपयश असूनही विरोधक त्याचा लाभ उठवू शकले नाहीत. मग स्वकर्तृत्वाचा तर प्रश्नच नको. आधी दुभंगायचं आणि मग निवडणुकांच्या निमित्तानं तेवढ्यापुरतं 'लोकशाही वाचवा' ची ठरलेली गर्जना करीत एकत्र यायचं, एवढंच धोरण आखणाऱ्या या विरोधकांना जनतेनं जवळ कसं करावं? जानेवारीतल्या आणि मेमधल्या निवडणुकांप्रमाणेच या वेळीही जनतेनं त्यांना दूरच ठेवलं आणि त्या वेळेप्रमाणेच या पोटनिवडणुकातही दोन्तृतियांश जागा कॉंग्रेस (आय) च्या पदरात टाकल्या.

महाराष्ट्र (२), गुजराथ (२), कर्नाटक (२), ओरिसा (३), हरियाणा (३), मध्यप्रदेश (२) आणि राजस्थान (१) या राज्यामध्ये या पोटनिवडणुका झाल्या. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री बॅ. ए. आर. अंतुले, राजस्थानचे मुख्यमत्री जगन्नाथ पहाडिया आणि ओरिसाचे मुख्यमंत्री जानकीवल्लभ पटनाईक हे यातले कॉंग्रेस (आय) च्या दृष्टीनं प्रमुख आणि प्रतिष्ठेचे उमेदवार होते विरोधी पक्षांनी एकत्र येऊन 'एकास एक' उमेदवार हे सूत्र या सर्वांच्या बाबतीत अवलबिलं होतं; पण हे तिघेही प्रचंड बहुमतानं विजयी झाले आणि 'सर्व विरोधी पक्षाचा पाठिंबा असलेल्या उमेदवाराना मात्र अनामत रक्कम वाचण्याइतकीही मतं मिळाली नाहीत. मताची विभागणी पाहिली की विरोधकाची अवस्था किती दारुण होती, हे दिसून येतं. बॅ. अंतुले (श्रीवर्धन मतदार संघ) याना ७२,८९७ मतं मिळाली, तर विरोधी उमेदवार दत्ता खानविलकर (जनता) यांना फक्त ८०५४ मतं पडली. ६४,८४३ एवढ्या प्रचड मताधिक्यानं अंतुले विजयी झाले. जगन्नाथ पहाडिया (वैद) यांनी प्रतिस्पर्धी सत्यपाल जतन (कॉंग्रेस) याचा ५८,८७९ मतानी पराभव केला, तर पटनाईक (अठगड) हे प्रतिस्पर्धी उमेदवार शरतकुमार कार (लोकदल) याच्यावर ३९,२८२ मतानी मात करून निवडून आले. यावरून जनतेनं कॉंग्रेस (आय) या उमेदवारांना प्रचड पाठिंबा दिल्याचं स्पष्ट आहे. तरीही मुख्यमंत्र्यानी सरकारी यत्रणेचा गैरवापर केला आणि प्रचंड पैसा ओतला, त्यामुळे त्याना हे यश मिळालं,' अशी ठरीव ठशाची टीका जनता पक्षाचे अध्यक्ष चंद्रशेखर याच्यासारख्या नेत्याने करावी, हे हास्यास्पद आहे. कारण मुख्यमत्री नसलेल्या इतर उमेदवाराबाबतीतही कॉंग्रेस (आय)ला काही अपवाद वगळता चागलं मताधिक्यच मिळालेल दिसून येतं. याउलट विरोधकाना (काही ठिकाणी युती न करता) मिळालेल्या पाच-जागाच्या बाबतीत मोठं मताधिक्य दिसत नाही. त्याना कमीत कमी १९१ मताची आघाडी (इंदूर भारतीय जनता पक्ष उमेदवार सत्य नारायण) आणि जास्तीत जास्त ८७९८ मतांची आघाडी (बडोदा शहर भाजपचे उमेदवार, माजी मत्री मकरंद देसाई) मिळाली. यावरून विरोधकाना दहा हजाराच्या पुढे आघाडी मिळवता आलेली नाही, हे दिसून येतं. विरोधकांना मिळालेल्या पाच जागात भाजपला मिळालेल्या या दोन जागा, ओरिसा आणि हरियानात लोकदलाला मिळालेल्या दोन जागा आणि कर्नाटकात जनता पक्षाला मिळालेली एक जागा याचा समावेश आहे. यावरून विरोधी पक्षाचं वलाबलही प्रतीत व्हावं.

हे चित्र काय दर्शवतं? -

मलपृष्ठ २ वर

# चीन

## नव्या नेत्यांची नवी मांडणी

वा. दा. रानडे

चीनमध्ये सध्या 'गँग ऑफ फोर' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या चौकडीवरील खटल्यास सुरुवात झाली आहे. माओची पत्नी व तिचे तीन सहकारी त्यात आहेत हा खटला बाह्यत या चौघाविरुद्ध असला तरी तो खरोखर माओविरुद्ध, एवढेच नव्हे तर कम्युनिस्ट पक्षाविरुद्ध आहे असे त्याचे वर्णन 'दि इकोनामिस' या ब्रिटिश पत्राने आपल्या २२ नोव्हेंबरच्या अंकातील 'माओ इन द डॉक 'आरोपीच्या पिंजऱ्यात माओ' या शीर्षकाच्या लेखात केले आहे. खटल्याच्या सुनावणीत आरोपीचे माओशी असलेले संबंध येणे अटळ आहे अशी कबुली सध्याच्या चीनचे सूत्रधार डुग झियाओ पिंग यानीही दिली आहे. चीनच्या नव्या नेत्यानी माओच्या मार्गापासून पूर्ण फारकत घेतली आहे का? आणि तेवढ्यावरच न थाबता त्यानी कम्युनिस्ट पद्धतीशीच फारकत घेतली आहे का? की माओवाद आणि कम्युनिस्ट पद्धती या दोहोतील चांगल्या गोष्टी ठेवून आणि चुका सुधारून कम्युनिस्ट विचारप्रणालीची व कार्यपद्धतीची काही नवी माडणी ते करीत आहेत? कम्युनिस्ट चळवळीच्या दृष्टीने हे प्रश्न महत्त्वाचे आहेत. चीनसबंधी जास्तीत जास्त वस्तुनिष्ठ माहिती मिळवून आणि पूर्वग्रह बाजूला ठेवून या प्रश्नांची उत्तरे शोधायला हवीत.

सध्याचा खटला सास्कृतिक क्रातीत जे हत्याकांड झाले त्यासंबंधात आहे. हत्याकांडाच्या बातम्या त्या वेळी प्रसिद्ध झाल्या होत्या; पण त्यापेक्षाही मोठ्या प्रमाणात हत्या केल्याचा आरोप आरोपीवर ठेवण्यात आला आहे. आरोपपत्राप्रमाणे सास्कृतिक क्रांतीने जवळजवळ चार लाख लोकाचा बळी घेतला. काही विभागवार आकडे पुढीलप्रमाणे आहेत. अतर्मंगोलिया १६ हजार, युनान १४ हजार, हेबे ३ हजार, गुआग डॉंग ४० हजार हे भयंकर आकडे वाचले म्हणजे प्रश्न पडतो की माओवादी कम्युनिस्टाच्या हिशेबी मानवी जीविताला काही किमत आहे की नाही? या विकृतीची मुळे माओवादात सुरुवातीपासून होती का? असाही प्रश्न उपस्थित केला जातो. येनानमध्ये १९४० च्या सुरुवातीस चिनी कम्युनिस्टांनी पहिली 'रेक्टिफिकेशन कॅंपेन' (सुधारमोहीम) केली आणि १९५७ मध्ये उजवेविरोधी मोहीम केली. सास्कृतिक क्राती ही या घटनांचीच तर्कशुद्ध परिणती असे म्हटले जाते. डाव्या अतिरेकीपणाच्या विकृतीचे ते फळ होते या डाव्या अतिरेकीपणाला कोणी विरोध कसा केला नाही? असा प्रश्न यातून उपस्थित होतो. हाच प्रश्न उपस्थित करून हॉंगकॉंगचे एक वृत्तपत्र लिहिते, "पक्षाचा हा डावा एकागीपणा ही काही क्षणिक अवस्था नव्हती. त्यावर पक्षात टीका का झाली नाही? किंवा त्याला मोठ्या प्रमाणात विरोध का झाला नाही?" चौएनलाय आणि डुगझियाओपिंग याच्यावर या बाबतीत जबाबदारी येते. १९६७ नतरच्या सास्कृतिक क्रातीशी डुग याचा काही सबध नव्हता; पण त्यापूर्वीच्या काळातील माओच्या अतिरेकी धोरणाना त्यानी तरी कोठे विरोध केला? उलट ते त्यात सहभागी होते. प्रभावी नेतृत्व आपल्या प्रभावी व्यक्तिमत्त्वाने एवढा प्रभाव व दहशत निर्माण करते की त्याला विरोध करण्याचे धैर्य कोणाला होत नाही. रशियात स्टालिनला विरोध का झाला नाही? आपल्याकडे आणीबाणीबाबत काय अनुभव आला? यशवंतराव चव्हाण, जगजीवनराम या ज्येष्ट सहकाऱ्यांना इदिरा गाधीना विरोध करण्याचे धैर्य झाले नाही. कम्युनिस्ट चळवळीतही अशा अपप्रवृत्ती निर्माण होत असतील तर कम्युनिस्ट पद्धती इतर पद्धतीपेक्षा चांगली का मानायची? असे प्रश्न चिकित्सक मनापुढे येणे स्वाभाविक आहे.

टीका आणि आत्मटीका हे कम्युनिस्ट कार्यपद्धतीचे एक महत्त्वाचे तत्त्व मानले जाते; पण पक्षातर्गत अशी खुली टीका आत्मटीका तेथे कितपत प्रामाणिकपणाने होते? ही कार्यपद्धती अवलंबली गेली असती तर स्टालिन व माओ याच्या हातून ज्या चुका झाल्या त्या झाल्या नसत्या किंवा वेळीच सुधारल्या गेल्या असत्या. प्रभावशाली व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव सर्वांवर पडतो, त्याच्या विचाराने, विश्लेषणाने, युक्तिवादाने सर्वसामान्य माणूस भारला जातो. कम्युनिस्टही याला अपवाद नाहीत; पण या प्रभावी व्यक्तिमत्त्वाच्या हाती सर्व सत्ता एकवटत नाही याची दक्षता घ्यावयास हवी आणि दीर्घ काळ त्याच्या हाती सत्ता रहात नाही अशी तरतूद घटनेतच करायला हवी. एका व्यक्तीचा प्रभाव नाहीसा करण्यासाठीच स्टालिनच्या मृत्यूनंतर सामुदायिक नेतृत्वाची पद्धति पुरस्कारली गेली. सामुदायिक नेतृत्व म्हणजे समुदायाने केलेले नेतृत्व नव्हे. कम्युनिस्ट पक्ष व सरकारमध्ये या प्रमुख पटावर असलेल्या व्यक्तींनी एकत्र येऊन केलेले नेतृत्व म्हणजे सामुदायिक नेतृत्व असा त्याचा अर्थ रूढ झालेला आहे. रशियामध्ये कम्युनिस्ट पक्षप्रमुख, पतप्रधान आणि देशाचा अध्यक्ष या तिघाचे नेतृत्व हे स्टालिननंतर सामुदायिक नेतृत्व मानले गेले; पण प्रत्यक्षात ही पद्धति फार काळ टिकली नाही. त्या तिन्ही जागा सुरुवातीस निरनिराळ्या व्यक्तीकडे होत्या; पण पुढे क्रुश्चेव्ह यानी पक्षप्रमुखपद आणि पतप्रधानपद या दोन्ही जागा स्वत:कडे घेतल्या त्यातून त्याचे व्यक्तिमहात्म्य वाढत गेले, कुश्चेव्हनंतर आलेल्या ब्रेझनेव्ह यांनी सध्या पक्षप्रमुखपद व देशाचे अध्यक्षपद ही दोन पदे स्वतःकडे घेतली आहेत त्यामुळे इतर नेत्याच्या तुलनेने त्याचेच व्यक्तिमहात्म्य वाढले आहे. कम्युनिस्ट पद्धतीत पक्षप्रमुखपद हेच सर्वश्रेष्ठ असते त्यामुळे त्या पदी असलेल्या व्यक्तीचे महात्म्य व प्रभाव वाढत जातो आणि एखादी व्यक्ती दीर्घकाळ त्या पदी राहिली तर तिच्या हाती सत्ता केंद्रित होऊन चुका होऊ लागतात. ते टाळण्यासाठी एका व्यक्तीकडे एकच अधिकारपद ठेवावयाचे आणि त्या जागीही पाच-दहा वर्षांपेक्षा अधिक काळ तिने रहावयाचे नाही हे संकेत रूढ करायला हवेत.

आणखी एक आवश्यक सकेत म्हणजे निवृत्तीबाबतचा सरकारी व खाजगी नोकराना, शिक्षकाना सेवानिवृत्ती असते तशी ती राजकीय नेत्यानाही असली पाहिजे. आपल्याकडे निवृत्तीचे वय ५८ ते ६० वर्षे आहे. माणसाचे आयुर्मान वाढले असून

पृष्ठ २१ वर

# जॉर्ज आणि शेतकरी आंदोलन

मुलाखत । रवि ना. नायक

प्रश्न : नासिक जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या चळवळीच्या निमित्ताने आपण येथे आलेले आहात. त्याबद्दलच्या प्रतिक्रिया आपण पाहिल्या असतीलच; तेव्हा आपण इतर देशभरचे कार्यक्रम सोडून येथे का आलात?

जॉर्ज : काही प्रतिक्रिया वाचल्या आहेत. शालिनीताई पाटलांपासून ते विजय नवल पाटलापर्यंत इतर काही लोकांची टिप्पणी पण मी वाचली आहे. मी जर येथे आलो नसतो तर त्याच मंडळींनी पुढे केव्हा तरी विचारले असते की, जेव्हा नासिक जिल्ह्यातील शेतकरी लढत होता तेव्हा तुम्ही कोठे होता? अर्थात माझे इथे येण्याचे कारण कोण काय म्हणतील हे नसून शेतकऱ्याच्या लढ्याला पाठिंबा देणे हेच होय. आपणाला आठवत असेलच की, जेव्हा कांद्याच्या प्रश्नावर गेल्या मार्च महिन्यात जी चळवळ झाली त्या वेळेस एकदा नाही तर दोनदा या भागात मी आलो होतो. शेतकऱ्यांच्या प्रश्नासंबंधी इथे व लोकसभेत आवाज उठविण्याचे काम केले होते, तसेच त्यांच्या मागण्यांना पाठिंबा देण्याचेही काम मी पार पाडले होते.

प्र. : तुमच्यावर एक आरोप आहे की, तुमचे सरकार असताना शेतकऱ्यांचे प्रश्न धसास लावण्यासाठी तुम्ही काही केले नाही.

जॉर्ज : मी सरकारात अडीच वर्षं होतो. त्यातले पहिले तीन महिने मी दळणवळणमंत्री होतो. दळणवळणमंत्री असताना मी जे निर्णय घेतले त्याचाच परिणाम एक वर्षभरात हिंदुस्थानातील प्रत्येक गावी डाक पोहोचण्यासाठी यंत्रणा उभारण्यात आली. उद्योगमंत्री या नात्याने माझं काम देशाच्या विकासाचं होतं. त्यात मी जे औद्योगिक धोरण आखले त्या धोरणानुसार हिंदुस्थानात पाच लाखापेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या शहरात नवीन उद्योगधंदे उभारण्यासाठी परवानगी देण्याबाबत मी मनाई केली व सर्व नवीन उद्योग शहरापासून दूर गावात ह्यापुढे उभारण्यात यावेत असे सरकारी धोरण आखले व ते भांडवलदारांच्या सतत विरोधाचा मुकाबला करून अंमलात आणले. त्याचबरोबर मोठ्या उद्योगावरून लहान उद्योगावर भर देण्याच्या दृष्टीने ८०७ वस्तू लघुउद्योगासाठी राखीव ठेवण्यात आल्या. हे करीत असताना सुद्धा मोठ्या भांडवलदारी शक्तींशी व त्यांच्या पाठीराख्यांशी प्रचंड झुंज द्यावी लागली व तिसरे म्हणजे ज्या वस्तू कुटीरोद्योग क्षेत्रात हाताने बनविण्यासारख्या आहेत त्या शक्यतो यंत्राने बनवू नयेत असे धोरण आखून 'हातमागासाठी यापुढे सर्व कापड' असा कार्यक्रम आखला. त्यानुसार कापडमिलमधल्या यंत्रमागावरील क्षमता वाढविण्यास बंदी घातली व यापुढील सर्व कापड हातमागावर बनेल असे धोरण निश्चित केले. कुंभार तयार करीत असलेल्या सर्व मातीच्या वस्तू सरकारी क्षेत्रापासून ते खाजगी क्षेत्रापर्यंत वापरण्यात याव्यात अशी मी पावले टाकली. तेव्हा भांडवलदारी वर्तमानपत्रांनी 'हा उद्योगमंत्री की कुंभारमंत्री?' अशी माझी टिंगल केली. बाटा कंपनीचे परदेशी मालक थॉमस बाटा आपल्या कंपनीचा विकास करण्यासाठी परवानगी मागावयास माझ्यापाशी आले तेव्हा त्यांना कारखान्यातून जोडे बनविण्यास परवानगी नाकारून चांभाराच्या हातून तयार होणाऱ्या वस्तूच लोक विकत घेतील असे प्रयत्न केले. खादी व ग्रामीण उद्योग यासाठी सरकारी अनुदान पूर्वी जे असायचे त्यात चार पटींनी वाढ केली, की जेणेकरून ग्रामीण भागामध्ये अधिक पैसा जाईल आणि नोकऱ्या निर्माण करण्यात येतील आणि सर्वांत महत्त्वाचा भाग म्हणजे देशाच्या एकूण ३९९ जिल्ह्यामध्ये प्रत्येक जिल्ह्यात जिल्हा उद्योग केंद्र स्थापन करून ग्रामीण औद्योगिक विकास व गावातला पैसा गावाच्या विकासकार्याच्या उपयोगी यावा या दृष्टीने पावले टाकली. तेव्हा उद्योगमंत्री असताना सुद्धा माझी दृष्टी शहरी नसून ग्रामीण विकासाकडेच होती. तसेच बड्या लोकांपासून दूर आणि ग्रामीण भागातील प्रश्न सोडविण्याची होती

प्र. : पण शेतकीविषयक प्रश्नावर तुमची नजर नवीन अशी वाटते. कारण तुमचा लौकिक कामगार-पुढारी म्हणूनच आहे.

जॉर्ज आता आम्ही आमची जीवनकहाणी कुणाकुणाला सांगत बसायचं? मी समाजवादी पक्षाचा सदस्य झालो. १९४९ च्या जुलै महिन्यात माझ्या जन्मस्थानी कर्नाटकच्या द. कन्नड जिल्ह्यात जयप्रकाश नारायण यांच्या प्रेरणेने मी पक्षात आलो आणि त्या वेळेला माझ्या पक्षाने मला सर्वप्रथम जे काम दिले ते म्हणजे आमच्या जिल्ह्यातील लहान शेतकरी व शेतमजूर ह्यांच्या प्रश्नावर जिल्ह्याची परिषद बोलावून त्यांच्या गाऱ्हाण्यांना वाचा फोडणे. सतत ६ महिने माझे पक्षातील सहकारी अम्मबळ बाळप्पा आणि मी सबंध जिल्ह्याचा दौरा करून शेतकऱ्यांच्या शेकडो सभा घेतल्या. त्यात आमच्या अनेक मागण्यांपैकी एक मागणी कसणाऱ्याची जमीन ही होती. ज्यांना आमच्या मागणीमुळे नुकसान व्हावयाचे त्यांच्याकडून लाठ्या, काठ्या, मारसुद्धा वयाच्या १९ व्या वर्षीच खाल्ला; पण परिषद घेतली व ती यशस्वीही झाली. मी १९४९ साली एका कन्नडभाषी साप्ताहिकाचा संपादक झालो. त्या साप्ताहिकाचे नाव होते 'रयतवाणी' म्हणजे शेतकऱ्यांचा आवाज तेव्हापासून आजपर्यंत मी जेवढ्या शेतकऱ्यांपर्यंत पोहोचलेलो आहे आणि मी त्यांचे

लढे देशभर जेवढे लढविले आहेत तेवढे प्रयत्न फार कमी लोकानी केलेले आहेत. १९७० सालच्या एप्रिल महिन्यात जमान-फेरवाटपाच्या प्रश्नासह इतर काही प्रश्नावर जेव्हा दिल्लीत राष्ट्रपतीना एक निवेदन देण्यासाठी मी माझ्या पक्षाच्या वतीने एक भव्य प्रदर्शन आयोजित केले होते त्या वेळेस श्रीमतो गाधी ह्याच्याकडून तर मला ठार मारण्याचाच प्रयत्न झाला होता ! त्या वेळेस डोके व सबंध शरीर पोलिसी लाठ्यानी फुटून मी दिल्लीच्या इस्पितळात एक महिना होतो आणि जगणार की मरणार ह्यावर ४८ तास डॉक्टरानी काही सागणे नाकारले होते, पण हे सगळे कोण रोज सागत सुटणार ?

प्र. : पण आज महाराष्ट्रातच काय म्हणून हृया चळवळीत तुम्ही काम करावयास आलात ? एकदर शेतमालाचे भाव सबध देशभर ठरवावयाचे आहेत तर मग ही लढाई सबध देशभरच चालवावयास नको काय ?

जॉर्ज : महाराष्ट्र देशातच आहे आणि ही लढाई आज सबध देशभर कुठल्या ना कुठल्या स्वरूपात चालू आहे. कर्नाटकामध्ये तर या लढाईत आम्ही सक्रिय काम करीत आहोत. उत्तर प्रदेशात काशिपूर, मुजफ्फरनगर व सितापूर ह्या तीन मोठ्या केंद्रावर नुकत्याच शेतकऱ्याच्या तीन प्रचड परिषदा आम्ही घेतल्या. त्या भागातील शेतकरी आपल्या परीने लढत आहेत. त्याचप्रमाणे उत्तर बिहारच्या शेतकऱ्याची एक जगी परिषद गेल्या महिन्याच्या ३१ तारखेला हाजीपूर येथे घेतली. तेव्हा लढाई चाललेली आहे आणि जर नासिक जिल्ह्यात सरकारने गोळीबार केला नसता तर कदाचित मी ह्या ठिकाणी ह्या क्षणी आलोही नसतो; पण आणखी एक मुद्दा आहे. जरी माझे काम देशव्यापी असले व जरी मी आज उत्तर बिहारच्या मुझफ्फरपूरचा प्रतिनिधी म्हणून लोकसभेत असलो तरी पण महाराष्ट्र ही माझी मुख्य कर्मभूमी राहिलेली आहे. तेव्हा महाराष्ट्रात जव्हा शेतकरी आज दडपशाहीचा मुकाबला करण्यास कटिबद्ध झालेला आहे त्याच्याचबरोबर उभे राहणे हे माझे नैतिक कर्तव्य आहे.

प्र. : महाराष्ट्रातील शेतकऱ्यामध्ये नवी जागृती निर्माण झालेली आहे. त्यामध्ये शेतकरी सघटनेचा सर्वांत मोठा वाटा आहे असे तुम्हाला वाटत नाही काय ?

जॉर्ज . प्रत्येक विचाराचा एक क्षण असतो. देशाला जेव्हा स्वातत्र्य मिळाले तेव्हा लो. टिळक जिवत नव्हते. म्हणजे स्वातत्र्यात लो. टिळक याचा वाटा नव्हता काय ? ह्या देशातल्या समाजवाद्यानी आयुष्यभर शेतकऱ्याच्या प्रश्नास वाचा फोडण्याचे काम केले आणि हे काम करीत असताना ३३ वर्षांमध्ये आमचे हजार कार्यकर्ते ठार मारले गेले. त्याचे व सबंध देशभर शेतकरी जो जागा होत आहे त्यामध्ये ह्याचे काहीच योगदान नाही काय ? म्हणून कोण व्यक्ती, कोणती सघटना कुठल्या क्षणी नेतृत्वाच्या ठिकाणी असते एवढ्यावरून एका मोठ्या चळवळीचे मूल्याकन करता येत नसते. जयप्रकाश नारायण, आचार्य नरेंद्र देव, डॉ. राममनोहर लोहिया, अच्युतराव पटवर्धन, पंडित रामानदन मिश्रा ह्याच्याबरोबर कित्येक थोर समाजवादी पुढाऱ्यानी तसेच कम्युनिस्ट पक्षाच्या नेतृत्वाखाली तेलगणचा लढा, भूमिहीन शेतकरी-शेतमजुराचे लढे, शे. का. पक्षाने नासिक जिल्ह्यातच भाताच्या किमतासाठी यशस्वी लढे दिले आहेत. महाराष्ट्रात कापूस एकाधिकार, रोजगार हमी व शेतमालाचे उत्पादन-खर्चानुसार भाव बाधून द्यावेत इ. प्रश्नासाठी समाजवादी, कम्युनिस्ट व शे. का. पक्ष यानी आदोलने केली आहेत ती काय व्यर्थ झाली ?

प्र. : आज जो महाराष्ट्रातील शेतकऱ्याचा लढा चालू आहे त्याचा शेवट कसा होईल असे तुम्हाला वाटते ?

जॉर्ज : लढाई आताच कुठे सुरू झालेली आहे. त्याच्या शेवटाची चर्चा एवढ्या लवकर कशी करता येईल ?

प्र. : उसाचे भाव, काद्याचे भाव ठरविण्याबाबत ज्या मागण्या आहेत त्याचा स्वीकार झाला तर लढा थाबणार नाही काय ?

जॉर्ज : माझ्या मते हा लढा नजीकच्या भविष्यात थाबू शकणार नाही. कारण प्रश्न नुसता उसाचे भाव ठरविण्याचा नाही. एकूण शेतीमालाचे भाव ठरविण आवश्यक आहे. त्यात भात, गहू, ज्वारी इ. वस्तूचे भाव ठरविणे सुद्धा आवश्यक आहे. कारखान्यात तयार होणाऱ्या वस्तूचे भाव आणि शेतीमाल हृयाच्या किंमतीत सतुलन असणे आवश्यक आहे. नाही तर आज उसाला रु. ३००/– भाव ठरविल्यानतर उद्या जर पाण्याचे दर, विजेचे दर, खतांच्या किमती झपाट्याने वाढविल्या तर पुढच्या वर्षी रु. ३००/– च्या एवजी रु. ४००/– चा लढा करावा लागेल आणि म्हणून हा वाद कुठल्या तरी आकड्याचा नसून शेतीमाल व शेतकऱ्याना शेतीमालाच्या उत्पादनासाठी लागणाऱ्या कारखान्यातील उत्पादित वस्तू या दोघाच्या किंमतीमध्ये एक कायमचे सतुलन निर्माण करण महत्त्वाचे आहे, तरच हा प्रश्न कायमचा सोडविता येईल, पण मी एवढ्यावरच थाबावयास तयार नाही. गल्या एका काळापासून मी दोन मागण्यावर सतत भर देत आला आहे. पहिले म्हणज 'गावातला पैसा' गावाच्या विकासासाठी गावातच उभा राहिला पाहिजे आणि दुसरे शेतकऱ्याच्याच उत्पन्नावर जी सीमा बाधण्यात आलेली आहे तीच सीमा देशातल्या सर्वांच्या उत्पन्नावर बाधावयास हवी.

प्र. : हे दोन्ही प्रश्न मी विचारणारच होतो. तुम्ही जेव्हा गावातला पैसा गावात राहिला पाहिजे असे म्हणता त्यातूनच देशाच्या अर्थव्यवस्थेला धक्का लागणार नाही काय ? आणि दुसरे ज्या गावामध्ये काहीच नाही त्या गावाचे काय ?

जॉर्ज : मी जेव्हा गावातला पैसा गावात राहावा असे म्हणतो त्या वेळेस मी आजचे जे जिल्हे आहेत त्या जिल्ह्याची सीमा लक्षात घेऊन बोलत असतो. म्हणजे प्रत्येक जिल्ह्यात जो बचतीचा पैसा बँकात, पोस्टातील निरनिराळ्या खात्यामध्ये, इन्शुअरन्सच्या रूपाने व युनिट ट्रस्टमधल्या गुंतवणुकीच्या मार्गाने जमविला जातो त्याचा उपयोग त्या त्या जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठीच झाला पाहिजे असा माझा आग्रह आहे. आता नासिकचेच उदाहरण घ्या. मी अजून सपूर्ण आकडेवारी जमा करू शकलेलो नाही, पण माझा अदाज आहे की, नासिक जिल्ह्यात मी वर सागितलेल्या निरनिराळ्या खात्यात २०० कोटी रुपये बचतीचा पैसा असावा. त्यातले नासिक

जिल्ह्याच्या विकासासाठी बँकाकडून व इतर संस्थांकडून जर ५० कोटी रु. मिळाले असतील तरी मी धन्य समजेन ! जेवढा अधिक मागासलेला जिल्हा तेवढे अधिक त्या जिल्ह्याचे शोषण होत आहे आणि गावातला पैसा मूठभर भांडवलदारांच्या विकासासाठी वापरला जात आहे आणि म्हणून मी एका काळापासून सांगत आलेलो आहे की, आपल्या देशातला सर्वांत मोठा आंतरविरोध (Contradiction) आहे तो म्हणजे गाव आणि शहर यांमध्येच आहे माझ्या मार्क्सवादी मित्राना हे पटत नाही. त्याचे म्हणणे आहे की, सर्वांत मोठा आंतरविरोध मालक व कामगार याच्यामध्ये आहे; पण देशातल्या कुठल्याही मालकाने आपल्या कामगाराचे आजपर्यंत केलेल्या शोषणापेक्षा कित्येक पटीनी अधिक शोषण शहरी व्यवस्थेने आपल्या ग्रामीण भागाचे केलेले आहे. मुंबईच्या पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यासाठी 'विश्व बँके' (World Bank) कडून जवळजवळ ५०० कोटींचे कर्ज मिळविले आहे; पण स्वातंत्र्याच्या ३३ वर्षानंतर देशातल्या साडेतीन लाख गावाना पिण्याच्या पाण्याची साधी व्यवस्थाही होऊ शकलेली नाही आणि त्यासाठी पैसा नाही. ३ लाख १८ हजार खेड्यामध्ये अजून कुठल्याही प्रकारचा रस्ता नाही आणि त्यासाठी पैसा नाही; पण दिल्लीत आशियन गेम्ससाठी की ज्यामध्ये भारताला एकसुद्धा पदक मिळण्याची शक्यता नाही, या गरीब देशाचे ३०० कोटी रु. खर्च होणार आहेत.

प्र. : तुमच्या ह्या सूचनेमुळे देशातल्या अर्थव्यवस्थेवर परिणाम होणार त्याचे काय ?

जॉर्ज : ते सागणारच होतो. शेवटी अर्थव्यवस्था म्हणजे काय ? मी जेव्हा उद्योगमंत्री होतो त्या वेळेस मी सांगत असे की, मी उद्योगविकासाचा मंत्री आहे, उद्योगपतीचा मंत्री नाही. अर्थव्यवस्था म्हणजे देशातली भांडवलदारव्यवस्था अशी जर समजूत असेल तर ती मी मानत नाही. अर्थव्यवस्थेचा आधार देशातल्या ६६ कोटी लोकाना त्यांच्या आवश्यक गरजेच्या वस्तू पुरवणे, भाव बांधून ठेवणे, बेकारी दूर करणे आणि आजची भीषण असमानता दूर करणे हेच होय आणि माझी ही सूचना जर ह्या देशाचे आर्थिक धोरण म्हणून स्वीकारली गेली तर त्यातूनच ग्रामीण भागाचे कल्याण म्हणजेच पर्यायाने देशाचे कल्याण आहे. ह्या धोरणातूनच आज मोठ्या भांडवलदाराच्या हातात जो पैसा केंद्रित झालेला आहे. त्याचे अवश्य विकेंद्रीकरण होईल व ते तसे झाले पाहिजे.

प्र. : उत्पन्नावर सीमा बांधण्याबद्दल आपली सूचना कितपत शक्य आहे ?

जॉर्ज : शक्य होण्यास काय अडचण आहे ? पण प्रश्न नुसता कितपत शक्य आहे हा नसून असमानता आपण दूर करणार आहोत की नाही हा आहे. तुम्ही कायद्याने एक शेतकरी किती जमीन स्वतःकडे ठेवू शकतो याची मर्यादा बांधलेली आहे. महाराष्ट्रात बागायती जमीन १८ एकर व जिरायती जमीन ५४ एकर आहे, तर उत्तरेत अनुक्रमे १० व ४० एकर आहे. महाराष्ट्रात असलेल्या सीमारेषा अधिक कुठेच नाही. या सीमेइतकी शेतजमीन असलेले शेतकरी शेकडा ५ टक्के पण नसावेत. अधिकांश शेतकरी ५ एकरापेक्षा कमी जमीन असणारे आहेत. जेव्हा तुम्ही जमिनीची मर्यादा बांधली तेव्हा शेतकरी वर्षाला किती उत्पन्न घेऊ शकतो हे तुम्ही कायद्याने ठरविले. एकरामागे जर १००० रु. वाचवता आले तर रु. १८०००/– ची मर्यादा, अपवादाबद्दल बोलू नका, तुमच्या-आमच्या धोरणानुसार कुणाही शेतकऱ्याला १५ ते २० हजारापेक्षा जास्त उत्पन्न होणेच शक्य नाही. मग जी मर्यादा तुम्ही त्या शेतकऱ्याला म्हणजेच देशातील ग्रामीण भागातील ८० टक्के लोकासाठी बांधलीत आणि जी मर्यादा जवळपास त्याच प्रमाणात शहरात राबणाऱ्या ८० टक्के कामगार, छोटे दुकानदार ह्यांच्यासाठी आहे तीच मर्यादा देशभर सर्वांवर का लावली जाऊ नये ?

प्र. : हे प्रश्न सोडविता येतील असे तुम्हाला वाटते काय ?

जॉर्ज : शेतकऱ्यांच्या शेतीमालाच्या भावाचे प्रश्न सोडविता येतील असे दोन वर्षांपूर्वी कोणाला वाटले होते काय ? पण आमच्यासारखी माणसे गेली कित्येक वर्षे ह्यासाठी सतत लढत राहिली आहेत आणि येथून पुढे त्याला यश मिळू पहात आहे. मी आशावादी आहे. शेतकऱ्यामध्ये देशभर आज जी नवी जागृती दिसून येत आहे त्याला जर योग्य वळण लागले तर हे सर्व प्रश्न लवकरच सुटतील असा माझा विश्वास आहे.

प्र. : पण ह्यात राजकारण नाही काय ? कारण सीमा बांधावयाची हा कायद्याचा प्रश्न झाला आणि आर्थिक धोरणात बदल घडवून आणून गावातला पैसा गावात ठेवायचा तर तो फारच मोठा प्रश्न झाला.

जॉर्ज : राजकारणाशिवाय प्रश्न सुटतील असे मी केव्हा म्हणालो ? मग शेतीमालाचे भाव वाढविले पाहिजेत असे आपण सरकारशी जेव्हा बोलतो तेव्हा राजकीय पक्षच सरकार चालवीत असतो म्हणजेच राजकारण सर्वत्र आहे. त्यातून कुणाला कधीच मुक्ती नाही. शेतकऱ्यांमध्ये सुद्धा राजकीय जागृति नसल्यामुळे आजपर्यंत त्याना लुबाडण्याचा धंदा शहरी राजकीय नेतृत्वाने केलेला आहे. ग्रामीण विकासाच्या धोरणाबरोबरच कामगार शेतकरी ह्यांची भक्कम एकजूट व असमानता दूर करण्याचा कार्यक्रम ह्या चौकटीत जेव्हा देशाचे राजकारण जाईल तेव्हाच देशनिर्माण कार्य होऊ शकेल.

प्र. तुमचा खटला संपल्यावर तुम्ही नाशकात राहून चळवळ चालवाल का निघून जाल ?

जॉर्ज : मी कुठे चळवळ सुरू केली आहे ? संसदेचे अधिवेशन १७ पासून सुरू झालेले आहे आणि काही महत्त्वाचे प्रश्न पुढच्या ५ आठवड्यात चर्चेस यावयाचे आहेत. तेव्हा बैठकीस उपस्थित राहाणे मला आवश्यक आहे; पण जर इकडची परिस्थिती चिघळली तर त्या परिस्थितीपासून दूर राहाणे मला शक्य होणार नाही. बघू काय होते ते.

प्र. : सध्या चळवळ चालविणाऱ्या नेतृत्वाशी तुमचे काही मतभेद आहेत काय ?

जॉर्ज : असे आहे, सध्या चळवळ चाललेली आहे तेव्हा मतभेदासंबंधी फार चर्चा करू नये; पण एक गोष्ट मी समजू शकलेलो नाही.

शेतकरी ऊस पुरवितो आणि तरीही बोर्डावर, पत्रकामध्ये लिहिले जाते 'दामाशिवाय काम नाही. ३०० शिवाय ऊस नाही!' याचा अर्थ काय? रेलगाडी आणि रस्ते बंद केले जातात आणि मग एकाएकी सगळी चळवळ थांबविली जाते. हे सगळे मला तरी समजेनासे झालेले आहे.

प्र. – रेलबंदी आणि रस्ताबंदी करीत असताना जे अनुचित प्रकार घडले त्यामुळे हे निर्णय घेण्यात आलेले आहेत हे तुम्हाला योग्य वाटत नाही काय?

जॉर्ज – एवढी प्रचंड चळवळ चालवीत असताना काही गोष्टी घडणारच! त्यामुळे चळवळ थांबवावी हे मला पटत नाही. यापुढे जर शेतकऱ्याची चळवळ फोडून काढावयाची असेल तर सरकारी पक्षाला रेल्वे गाड्या रुळावरून खाली उतरविणे व २–३ ट्रक जाळून टाकणे हाच सोपा मार्ग राहील.

प्र. – पण लोकांच्या अडीअडचणी सुद्धा लक्षात घेणं आवश्यक नाही काय? आणि जो नवीन कार्यक्रम जाहीर करण्यात आलेला आहे त्यात नाशवंत माल-दूध वगैरे–नेण्याचा जो आदेश दिला त्यामुळे चळवळीला सामान्य लोकांचा पाठिंबा मिळविता येणार नाही काय?

जॉर्ज – आता तुम्ही मला खरंच अडचणीत टाकत आहात. कारण ह्या प्रश्नावर काही बोलायचं नाही असे माझे मत होते. नाशवंत माल तुम्ही कसा जाऊ देणार? समजा २००० गाड्या रस्त्यावर उभ्या आहेत. मागाहून नाशवंत माल असलेली एक गाडी व आजारी माणूस असलेली टॅक्सी येऊन उभी राहिली तर ती पुढे नेणार कुठून? तेव्हा चळवळीत काही जणाना त्रास होणारच. जेव्हा एस. टी कामगार गाडी बंद करतो तेव्हा प्रवाशांना त्रास होत नाही? किंवा तुम्ही वर्तमानपत्रवाले कुठल्याही कारणास्तव वर्तमानपत्र बंद करता तेव्हा ते वाचणाऱ्याना त्रासदायक होते ना?

प्र – म्हणजे एकूण चळवळीच्या डावपेचाबद्दल तुमचे तीव्र मतभेद आहेत असे दिसते.

जॉर्ज – मतभेद आहेत ते किती तीव्र हे तुम्हीच समजावून घ्या; पण मतभेद आहेत म्हणून कुठल्याही प्रकारची फूट होऊ द्यावयाची नाही आणि आपली सर्व शक्ती शेतकऱ्याच्या पाठीशी उभी करावयाची हा माझा ठाम निर्धार आहे. गेल्या ३/४ दिवसात कामगार संघटनेच्या नेत्याशीही बोललो आहे. त्याची एक कृतिसमिती झालेली आहे. एस. टी. कामगाराचा एक दिवसाचा संप झाला आहे. विद्यार्थ्यांमध्ये आमचे कार्यकर्ते कामाला लागलेले आहेत. शेतकऱ्याच्या चळवळीला पाठिंबा देण्यासाठी कामगार, विद्यार्थी इ. शहरी लोकाना एका व्यासपीठावर आणून लढाई जिंकेपर्यंत मी प्रयत्नशील राहीन! □

---

# शेतकरी-आंदोलन

## चळवळीचे व्यापक स्वरूप

चंद्रशेखर

शरद जोशीप्रणीत शेतकरी आंदोलन आता अशा एका अवस्थेस येऊन पोचले आहे की त्याचे भावी स्वरूप काय राहील, याचा अंदाज करणे सोपे नाही; परंतु आजपर्यंत या आंदोलनाने जी वैशिष्ट्ये दर्शविली, त्याचा आढावा घेणे उपयुक्त ठरेल. ही वैशिष्ट्ये थोडक्यात अशी–

१ : सरकारकडे आपल्या मागण्या एकत्रितपणे मांडणे.

२ : या मागण्यांच्या मागे जोर यावा म्हणून रस्ते रोखणे.

३ : सरकारी कायद्याचा भंग करून मोठ्या प्रमाणावर अटक करवून घेणे.

४ : प्रमुख नेत्यांनी उपोषणास बसणे.

५ : बिगर शेतकरी क्षेत्रामधून आपल्या आंदोलनास पाठिंबा मिळवण्याचा प्रयत्न करणे.

६ : वृत्तपत्रातून आपली बाजू मांडणे.

या वैशिष्ट्याचा एकत्रितपणे विचार केल्यास असे आढळून येईल की, या आंदोलनाचे स्वरूप गेल्या ५०–६० वर्षांतील प्रमुख आंदोलनाशी मिळते–जुळतेच आहे. एवढेच नव्हे तर आपल्या आंदोलनास अधिक भावनिक धार यावी म्हणून शरद जोशीनी इंडियात रहाणारे व भारतात रहाणारे असा वर्गभेदही शोधून काढला आहे. सदर आंदोलन मूठभर इंडियनाविरुद्ध बहुसंख्य 'शेतकरी भारतीयानी' चालवलेले- असे त्याचे स्वरूप श्री. जोशीना अभिप्रेत आहे; परंतु एका अर्थाने हे आंदोलन पूर्वीच्या आंदोलनांपेक्षा निराळे भासते. स्वातंत्र्यचळवळीत व कामगार चळवळीमध्ये प्रमुख रस्ते पूर्णपणे रोखून सार्वजनिक जीवन विस्कळित करण्याचा प्रयत्न केला गेला नव्हता. तो या आंदोलनात होत आहे.

'रस्ता रोको' ही घोषणा हे या आंदोलनाचे वैशिष्ट्य म्हणता येईल. दुर्दैवाने या कारवाईचे तात्त्विक समर्थन शरद जोशी वा त्याचे अनुयायी देऊ शकत नाहीत. तसे देण्याचा प्रयत्नही आत्तापर्यंत झालेला नाही. राष्ट्रीय महत्त्वाच्या हमरस्त्यावरून देशभराचे विविध प्रवासी सुखसोयी व वाहतूकदार मालाची व माणसाची ये–जा करीत असतात. त्याचा शेतकऱ्याच्या मागण्यांशी दूरान्वयानेही संबंध नसताना त्याना त्रास कशासाठी द्यावा याचा खुलासा होऊ शकत नाही. शेतमालाची वाहतूक थांबवण्याचा मर्यादित कार्यक्रम जर या आंदोलनाने हाती घेतला तर त्याचे काही तरी समर्थन होऊ शकेल इतक्या कमी भावात शेतमालाची वाहतूक व खरेदी–विक्री होऊ देणार नाही, असा शेतकरी आंदोलनाने खरे म्हणजे पवित्रा घेणे आवश्यक आहे प्रवासी वाहतुकीला मात्र कोणत्याही कारणाने अडथळा आणणे शोभनीय व समर्थनीय नाही.

आपल्या मागण्या मान्य करून घेण्यासाठी

संबंधितांवर दबाव आणण्याचे तंत्र कामगार चळवळीत फारच पुढे गेले आहे. या चळवळीच्या नेत्यांशी शरद जोशी व इतर शेतकरी नेत्याचा फारसा संपर्क आला नसावा दुसरी एक गोष्ट शेतकरी नेत्यानी नजरेआड केलेली दिसते ती म्हणजे शेती-क्षेत्राच्या सर्व व्यवहारात सरकारचा व बँकाचा अब्जावधी रुपयाचा चलनपुरवठा अडकून पडलेला आहे हा चलनपुरवठा काही कारणाने धोक्यात आला तर सर्व अर्थव्यवस्था डळमळित होऊन शेती-क्षेत्रही त्यापासून मुक्त राहू शकणार नाही.

शेतकरी नेते ह्या नात्याने शरद जोशी यांनी हे ओळखले पाहिजे. 'रस्ता रोको' किंवा कायदेभंग वा सत्याग्रह या गोष्टीना प्रतीकात्मक मूल्य असून त्या नित्याच्या व्यवहाराचा भाग बनू शकत नाहीत, स्वातंत्र्य-चळवळीचेच उदाहरण चालू ठेवायचे झाल्यास चळवळ व वाटाघाटी याचे सूत्र व सत्र राष्ट्रीय नेत्यानी कायम ठेवले होते. शरद जोशीनीही तोच कित्ता गिरवणे आवश्यक आहे. चळवळीचे राजकारण आता थाबवून वाटाघाटीचे पर्व सुरू केले पाहिजे. याचा पहिला टप्पा म्हणून संपूर्ण महाराष्ट्रातील शेतक-याचे प्रतिनिधित्व करू शकतील अशी तीस-एक नेत्याचे प्रतिनिधि-मंडळ स्थापन करणे आवश्यक आहे प्रत्येक जिल्ह्यास १ प्रतिनिधी व सपूर्ण राज्यासाठी शरद जोशीच्या तोलामोलाचे पाच प्रतिनिधी अशी रचना रहावी. हे प्रतिनिधी कसे निवडावयाचे वगैरे तात्रिक तपशील ठरवणे सहज शक्य आहे या प्रतिनिधि-मंडळाकडे खालील प्रकारची कामे सोपवता येतील-

१ : सहकारी संस्था, बँका व व्यापारी बँका याजकडून शेतीसाठी मिळणाऱ्या कर्जाची रक्कम व पद्धती प्रमाणित करून घेणे

२ : शेतकऱ्यांवरील पारंपारिक सावकारांची मगरमिठी अद्यापही घट्ट आहे ती जरा शिथिल करण्यासाठी प्रयत्न करणे.

३ : त्या-त्या पिकाच्या हंगामात पिकांची चांगली साठवणूक करण्यासाठी आवश्यक अशी गुदामे बांधण्याकरता सरकारकडे आग्रह धरणे.

४ : तलाठी पातळीपासून ते जिल्हाधिकारी पातळीपर्यंत शेतकऱ्यांची जमिनीच्या व्यवहारात जी नाडवणूक होते ती पूर्णपणे थाबवण्याचा कसोशीने प्रयत्न करणे.

५ शेतकरीवर्ग कौटुबिक कारणांसाठी उदा.-लग्न, मर्तिक वगैरे-वारेमाप खर्च करतो, तो कमी करण्यासाठी जोराची लोक-जागृतीची मोहीम हाती घेणे

ही कामे फार महत्त्वाची असून २-४ दिवस रस्ता बंद पाडणे वा अटक करवून घेणे ह्यापेक्षा जरा अवघड आहेत; पण ती करणे आवश्यक आहे. याकरिता शेतकऱ्यामधून योग्य ते नेतृत्व जोपासण्यासाठी पद्धतशीर कार्यक्रम आखावा लागेल. एकटे शरद जोशी वा एकटे माधवराव बोरस्ते सर्व ठिकाणी उपयोगी पडू शकणार नाहीत.

शहरी जनतेचे मत चळवळीविरुद्ध निष्कारण कलुषित करण्यात काही अर्थ नाही त्या दृष्टीने शरद जोशीची 'भारतीय' व 'इंडियन' ही परिभाषा व्यवहारात उपयोगाची नाही. शरद जोशी सागतात म्हणून उसाला ३०० रु. टन भाव व कांद्याला १०० रु. टन भाव सयुक्तिक आहे असे प्रत्येकाने मानावे, ही अपेक्षा बरोबर नाही. त्यासंबंधीची आकडेवारी शक्य तितकी नेमकी वृत्तपत्रात प्रसिद्ध होणे आवश्यक आहे. थोडक्यात म्हणजे सध्याचे शेतकरी आदोलन ही फार मोठी व्यापक राष्ट्रीय चळवळ बनू शकेल. अशा ह्या स्फूर्तिदायक चळवळीचे प्रणेते म्हणून शरद जोशी याचे स्थान आधुनिक भारताच्या इतिहासात कायम राहील. त्यांनीही ह्या स्थानास साजेसे वर्तन ठेवणे आवश्यक आहे. □


**NEW TITLES RECEIVED**

1. **The Second Lady**–( Bestseller–Novel )– Irving Wallace.
2. **Cricket Alivel**–( World Series Cricket ) Rs. 20/—
3. **The Dead Zone**–( Bestseller )–Stephen King „ 25/15
4. **Try this one for size**–( thrillor )– James Hadley Chose
5. **My Enemy The Queen**–( Historical Romance ) Victoria Holt.
6. **A Bend in the River** ( A novel on Africa ) V. S. Naipaul
7. **Doctor on the Job**–By Richard Gorden
8. **Heat Wave**–( Novel ) Timothy Harris
9. **Soxcapades**–Spicy Cartoons & Jokes

१. **बालंट**–( कादंबरी ) बाबा कदम रु. २०/—
२. **पु. लं. चा नाटचप्रवास**–मुकुंद टेकाडे „ १०/—
३. **मुकज्जी**–( कादंबरी )–शिवराम कारत „ २५/—
४. **गर्भश्रीमंतीचं झाड**–( ललितलेखसंग्रह )– पद्मजा फाटक „ १२/—
५. **लाखातील एक**–( विनोदी कथा )–बाळ गाडगीळ „

□ 'फिनिक्स' चे सभासदत्व ही आपल्या उच्च अभिरुचीची साक्ष आहे !
□ अत्युत्तम पुस्तके
□ पुस्तकात महत्त्वाची कात्रणे, लेखकाचे फोटो, सिने-स्टोरीज् वगैरे

**दि फिनिक्स लायब्ररी, ७२७ सदाशिव, पुणे ३०.**

# एक लबाड बाई - मादाम ब्लाव्हाट्स्की

डॉ. शरद अभ्यंकर, वाई

पुण्यात भरलेल्या 'बुद्धिप्रामाण्यवादी मेळाव्यातील काही विचारांवर आक्षेप घेताना एका सद्गृहस्थाने मला थिऑसॉफिकल सोसायटीचे वाङ्मय वाचण्याचा सल्ला दिला. त्यानुसार थिऑसॉफी हा प्रकार तरी काय आहे हे अभ्यासण्याचा प्रयत्न केला त्यातून या पंथाच्या संस्थापिका मादाम ब्लाव्हट्स्की यांचेबद्दल फारच मनोरंजक माहिती मिळाली. 'वाल्याचा वाल्मीकि झाला' किंवा 'एका लबाड बाईने हजारोंना फसवले' असे दोन निष्कर्ष यातून निघू शकतील. कोणता मानायचा ते वाचकानीच ठरवावे

हेलेना पॅट्रोव्हना ब्लाव्हाटस्की हे या बाईचे संपूर्ण नाव. वयाच्या ४३ वर्षी म्हणजे १८७४ मध्ये, व्हिएन्ना येथे एका गूढ मेळाव्यात (Spiritualistic seance) तिची भेट हेन्री स्टील ऑलकॉट यांच्याशी झाली त्यापूर्वीचा तिचा इतिहास धूसर असाच आहे थिऑसॉफिस्ट मंडळी तिचा पूर्वेतिहास सागतात तो बराचसा काल्पनिक आहे. ज्या सत्य गोष्टी माहीत आहेत त्या अशा–

१८३१ मध्ये युक्रेनमधील एका रशियन सैन्याधिकाऱ्याला झालेली ही मुलगी. ती एक तापदायक मुलगी (problem child) म्हणूनच वाढली अंगापिंडाने मजबूत असूनही सदैव आजारी असणारी, अतिशय हट्टी आणि आक्रस्ताळी अशी ती होती. वयाच्या सतराव्या वर्षी राजकुमार जिलेस्टिनने तिला धुडकावून लावली, त्याची प्रतिक्रिया म्हणून तिने एरिव्हन प्रांताचा उपराज्यपाल जनरल निसफोट ब्लाव्ह्ट्स्की याच्याशी विवाह केला. तीन महिन्यातच ती आपल्या आजोबाकडे पळून गेली. त्यानी तिला लगोलग जहाजात बसवून ओडेसाला तिच्या वडिलाकडे पाठवून दिले. वाटेतच जहाजाच्या कप्तानाचा हात धरून ती कॉन्स्टॅंटिनोपलला पळून गेली इथून ती कैरोला प्रकट झाली. तिथे तिची भेट अमेरिकन संशोधक आल्बर्ट रॉसन यांच्याशी झाली. रॉसन हे पौर्वात्य दंतकथाचा अभ्यास करीत, त्याच्याबरोबर तीन रात्री तिने ग्रेट पिरॅमिडमधे मुक्काम केला होता. रॉसननेच तिची ओळख पॉवलोआ मेटॅमॉन या प्रसिद्ध जादुगाराशी करून दिली. त्याचे हाताखाली तिने तीन महिने जादूविद्येचा अभ्यास केला. सबंध आयुष्यात तिने पुरा केलेला हा एवढाच औपचरिक विद्याभ्यास !

कैरोमध्ये असतानाच कल्पनाशक्तीला खुराक म्हणून ती गांजा (मारिजुआना) चे सेवन करू लागली. हे व्यसन तिच्या आयुष्यभर सुटले नाही. कॉन्स्टॅंटिनोपलला परतल्यावर ती काही काळ एका सर्कशीत घोडेस्वाराचे काम करत होती आणि नंतर प्रसिद्ध गायकसंगीतकार अगादी मेट्रोव्हिच याची रखेली म्हणून रहात होती कदाचित तिने त्याच्याशी बेकायदेशीर विवाहही केला असावा. कारण मेट्रोव्हिच एका पत्रात तिच्या आजोबाना आपण त्याचे नातजावई आहो असे लिहितो. आणखी काही वर्षांनी, तुमच्या नातीशी आपण विवाह केला असल्याचे पत्र एका इग्लिश माणसाकडून तिच्या आजी–आजोबाना आले, तर पुढे ती पॅरिसमधे गूढविद्यासंशोधक डी. डी. होम याच्या सहवासात आहे असेही त्यांना समजले.

अखेर दहा वर्षे भटकतीत घालवल्यावर हेलेना आपल्या रशियातील त्रस्त नातलगाकडे परतली आणि स्थानिक मंडळीना गूढविद्येचे चमत्कार दाखवून थक्क करू लागली. तिला पुन्हा तिच्या पतीकडे जायला तयार करण्यात आले; पण तेवढ्यात गायक मेट्रोव्हिच एका दौऱ्यावर त्या शहरात आला आणि त्याच्याबरोबर ती पुन्हा पळून गेली !

१८६२ मधे तिने कॉकेशसच्या जगलात आश्रय घेतला आणि पितृत्व निश्चित नसणाऱ्या एका कुबड्या मुलाला जन्म दिला ! हे मूल अल्पावधीतच मरण पावले १८७१ मधे मेट्रोव्हिच आणि त्याची सहचरी हेलेना कैरोला जाण्यास निघाले. हे जहाज वाटेत फुटले आणि आपल्या रखेलीला मागे ठेवून मेट्रोव्हिचने जलसमाधी घतली ! भूमध्यसमुद्रार्पण होण्यापासून वाचलेली हेलेना कैरोमधे एम्मा करिंग या खाणावळवालीच्या आश्रयाने राहू लागली. आपल्या जादूच्या शिक्षणाचा उपयोग करून तिने एक 'गूढविद्या मडळ' चालू केले आणि ठिकठिकाणच्या 'माध्यम' मडळींना 'मानसिक साहसाचा' अनुभव घेण्यास येण्याचे आवाहन केले; पण एके दिवशी अतराळातून प्रकट होऊन अधारात तरगणारा एक पंजा म्हणजे प्रत्यक्षात कापूस भरलेला हातमोजा आहे हे लक्षात आल्यावर हे मंडळ मोडले. निराश होऊन हेलेना परत रशियात आपल्या नातेवाइकाकडे गेली; पण तिथेही वादावादीच सुरू झाली. तिथून पॅरिस आणि मग १८७३ मधे पुन्हा नवीन आयुष्याला सुरुवात करण्याच्या कल्पनेने ती न्यूयॉर्कला येऊन पोचली. अनेक उद्योग करूनही तिला पैसा असा मिळालाच नाही ! काही काळ तर ती नेकटाय आणि कृत्रिम फुले बनवायचे काम करीत असे. वडलाच्या मृत्यूनतर तिला थोडी–फार सपत्ती मिळाली; पण ती सर्व तिने छानछाकीच्या रहाणीत उडवून टाकली. अखेरचे हजार डॉलर्स खर्चून तिने एक कुक्कुटपालन केंद्र खरीदले; पण तेही फसले !

१८७४ मधे हेन्री स्टील ऑलकॉट याने लिहिलेला व्हरमॉंट येथील दोन गावकरी माणसानी केलेले गूढविद्येचे चमत्कार वर्णन

करणारा लेख तिने वाचला ऑलकॉट हा न्यू जर्सीचा दाढीधारी वकील हेलनापेक्षा एक वर्षाने लहान होता. यादवी युद्धात सैन्याच्या कंत्राटातील लबाडचा शोधून काढायचे काम त्याच्याकडे होते हे काम उत्कृष्टरीत्या बजावल्याबद्दल त्याला कर्नलचा किताब दिलेला होता

कर्नल ऑलकॉटला गूढविद्येत रस असल्यामुळे हेलेना त्याच्याकडे आकृष्ट झाली. ऑलकॉटशी ओळख करून घेणे तिला अजिबात अवघड गेले नाही आणि तिचा लालभडक डगला, सिगारेट्स, आडदाड बांधा, अस्ताव्यस्त झुलपे, भरदार खोल आवाज आणि रशियन आघाताचे उच्चार या सगळ्याकडे त्याने दुर्लक्ष केले. कारण आपल्या गूढ अनुभवांच्या रोमांचक कथा सांगून तिने त्याला गुंगवून टाकले. त्याच्याविरुद्ध तिच्या अनेक गूढानुभवी बैठकी झाल्या.

इथून हेलेना अचानक फिलाडेल्फियाला निघून गेली आणि मायकेल बेटॅनेली नावाच्या कॉकेशसहून आलेल्या एका तरुणाबरोबर राहू लागली. याचा आयातीचा धंदा अगदी डबघाईला आला होता. ऑलकॉट तिला भेटायला येणार आहे असे समजताच तिने बेटॅनेलीशी विवाहबद्ध होणेच शहाणपणाचे, असे ठरवले; पण पूर्वीच्या दोन विवाहासारखीच याचीही गत झाली. बेटॅनेलीने अखेर तिच्याशी घटस्फोट घेतला !

पुन्हा न्यूयॉर्कला येऊन तिने ऑलकॉटला गाठला आणि त्याच्या पत्नी–मुलांना सोडून मॅनहॅटनमधे आपल्याबरोबर बिन्हाड करायला त्याचे मन वळवले. अर्थात आपले संबंध फक्त प्लेटॉनिक प्रेमाचे आहेत असे ही दोघेही ठासून सांगत असली तरी सौ. ऑलकॉटला ते पटणे अवघड होते. तिने ऑलकॉटविरुद्ध घटस्फोटाचा दावा लावला.

अशा तऱ्हेने सुरू झालेली भागीदारी दोघानाही फायदेशीर ठरली कारण दोघाचीही हुषारी एकमेकाला पूरक ठरत होती. ब्लाव्हाट्स्की आपल्या गूढ आकर्षणाने एकएक मासा गळाला अडकवीत असे आणि आपल्या धंदेवाईक चातुर्याने ऑलकॉट त्याला साफ करत असे. हळूहळू केवळ 'माध्यम' रहाण्यापेक्षा अधिक काही करावे असे ब्लाव्हाट्स्कीला वाटू लागले इजिप्तमधल्या अनुभवाचा उपयोग करून तिने असे सांगायला सुरुवात केली की समाधिकाळात आपल्याला इजिप्तमधील काही मृतात्मे आणि पिशाच्चे याच्या मदतीने मृतात्म्याकडून संदेश येतात या पिशाच्च्यामुळे ब्लाव्हाट्स्कीच्या जादुगारीचा दर्जा खूपच उंचावला. तिने वर्तवलेले भाकीत चुकीचे ठरले की याना दोष दिला जाई. या अतिप्रिय भागीदारामुळे ती एकदम उच्च पातळीवर पोचली आणि स्पर्धकाची दाणादाण उडवू लागली. कोण्या प्रश्नकर्त्याला उत्तर द्यायला तिला वेळ लागला की ती लगेच या अस्तित्वात नसणाऱ्या पिशाच्च्याशी सल्लामसलत करू लागे. ही जोडगोळी अनेक मोठ्या लोकांचे आगतस्वागत करीत असे. त्यामध्ये इच्छाशक्तिद्वारे लंबक हलवता येतो का हे तपासू इच्छिणारा एडिसन सुद्धा होता.

७ सप्टेंबर १८७५ रोजी या मंडळीनी ऑलकॉटला अध्यक्ष करून एक मंडळ सुरू केले. कोणी तरी 'थिऑसॉफी' हे नाव सुचवले. फेल्ट उपाध्यक्ष आणि जज् चिटणीस अशी ही 'थिऑसॉफिकल सोसायटी' सुरू झाली. याच्या समेत प्रत्यक्ष मृतात्मे कधीच अवतरले नाहीत; पण अनेक चित्रविचित्र गोष्टी मात्र उद्भवल्या. १८७७ मध्ये ब्लाव्हाट्स्कीने तिचे पहिले पुस्तक 'Isis Uncovered' प्रसिद्ध केले काही समीक्षकानी याचे वर्णन 'घमेलेभर कडबा' असे केले तर इतरानी 'कचरा' अशी त्याची संभावना केली. या पुस्तकात तिने पश्चिमेकडील तत्त्वज्ञान आणि लोककथा आणि पूर्वेकडील गूढविद्या आणि पुराणातल्या श्रद्धा याचे मिश्रण केलेले होते.

दरवर्षी आपल्या थिऑसॉफी तत्त्वात ब्लाव्हाट्स्की नवी नवी भर घालत असे. अखेर तिची शिकवण म्हणजे बहुतेक सर्व जादूच्या तत्त्वज्ञानातील तुकडे तुकडे बनले. यात किमया, 'फलज्योतिष, संख्याज्योतिष, मृतात्म्याशी संभाषण, भविष्यकथन, अध्यात्मवाद, प्राणतत्त्व, इतकेच काय भारतीय तत्त्वज्ञानातील पुनर्जन्म आणि कर्मसिद्धात आणि महात्म्याचा अदृश्य मेळावा, या सर्वांचा अंतर्भाव होता.

'इसिस अनकव्हर्ड' या ग्रंथाची पहिली आवृत्ती दहा दिवसातच संपली; पण त्यातून मिळणारे मानधन या जोडप्याला उदरनिर्वाहास पुरेसे नव्हते. ऑलकॉटमहाशयांची अपकीर्ती सर्वत्र पसरल्यामुळे व्यवसाय बसलेलाच होता शिवाय ख्रिश्चन अमेरिकेमधे प्रथमच मृतदेहावर अग्निसंस्कार करण्याला मदत करणारा अशी त्याची प्रसिद्धी झाल्यामुळेही त्याच्याविरुद्ध काहूर माजले होते

ब्लाव्हाट्स्कीने मग पिशाच्च्याचेकडून पारलौकिक पत्रे मागवून ऑलकॉटला हिंदुस्थानात जाण्यास प्रवृत्त केले. हिंदुधर्मसुधारणा करण्याकरता निर्माण झालेल्या आर्यसमाजाचे संस्थापक दयानंदसरस्वती मुंबईत होते त्याना ऑलकॉटने पत्र पाठवले आपल्या आणि त्याच्या संस्थेची ध्येय-धोरणे एकच आहेत अशी त्याने त्याची खात्री पटवली. हे 'थिऑसॉफिकल जुळे' (ते स्वत:लाच तसे म्हणवून घेत) १८७८ मध्ये मुंबईला पोचताच दयानंद सरस्वती आणि आर्य समाजाचे सभासद यानी त्याचे प्रचंड स्वागत केले. हे दोघेही भलतेच खूष झाले; पण अल्पकाळच. कारण स्वागतसमारंभाचे दणकेबाज बिल त्याना यजमानांकडून सादर करण्यात आले.

उत्तर भारताच्या प्रवासात असताना ब्लाव्हाट्स्कीने एका जादूचा प्रयोगात तरबेज नोकर गुपचूप नेमला होता. तो या प्रवासी मंडळीत गूढ आवाज काढून झपाटल्याचे वातावरण निर्माण करी आणि ऑलकॉटला त्याच्या दैवी मोहिमेत यश चिंतणारी उत्तेजनपर पत्रे पाठवीत असे. या जोडगोळीचे आणि दयानंद सरस्वतीचे संबंध एकमेकावर आरोप–प्रत्यारोप होऊन संपले. या वेळपर्यंत पौर्वात्य अध्यात्म आणि जादूटोणा याबद्दलचा ब्लाव्हाट्स्कीचा भ्रमनिरास झाला आणि स्वत:चाच असा खास प्रकार सुरू करायचा तिने निर्णय घेतला. या जोडगोळीने आपले उरलेसुरले भांडवल घालवण्याचा धोका पत्करून 'दि थिऑसफिस्ट' हे मासिक सुरू केले आणि ते तत्काल यशस्वी झाले. अनेक सुखवस्तू भारतीय तर त्याचे शिष्य बनलेच; पण मृतात्म्यात रस असणारा आल्फ्रेड पर्सी सिनेट हा संपादक आणि नंतर भारतीय राष्ट्रीय काँग्रेसला जन्म देणारे ॲलन ह्यूम हेही त्यांना मिळाले.

मुंबईला परतताच ब्लाव्हाट्स्कीला तिची कैरोची जुनी मैत्रीण एमा कटिंग भेटली. तिच्याबरोबर तिचा नवा नवरा कुलोब नावाचा एक फ्रेंच गृहस्थ होता. बिचाऱ्याचा सिलोनमधला धंदा बुडाल्याने

तो अगदीच हलाखीच्या परिस्थितीत होता. ब्लाव्हाट्स्कीने लगेच एमाला घराचा ताबा दिला आणि कुलोबला हरकाम्या म्हणून नेमले. हिंदुस्थानात असताना तिबेट आणि हिमालयातील महात्म्याच्या माध्यमातून आपण मृतात्म्याशी संपर्क साधतो असा तिचा दावा होता सिमला येथे असणाऱ्या इंग्रज मंडळीना आपल्या गूढ चमत्कारानी तिने भारून टाकले होते. ह्यूमसाहेब तर इतके प्रभावित झाले की आपली नोकरी सोडून त्यांनी तिबेटमधल्या महात्म्यांच्या भेटीला स्वत.च जाण्याची तयारी केली ! ब्लाव्हाट्स्कीच्या उपस्थितीत स्वर्गीय घंटानादासारखे विचित्र आवाज काही वेळा उंच छपराजवळून येत किंवा अंधाऱ्या खोलीभर तरंगत जात याचा अर्थ कोणी तिबेटी महात्मा खोलीत आहे असे ती सांगे. कधीकधी खोलीतल्या सामानावर व भिंतीवर पिशाच्च्यानी केलेली टकटक ऐकू येई. एका सत्राचे वेळी तर तिने जमलेल्या बड्या सरकारी अधिकाऱ्याच्या टकलावर असे आवाज काढून दाखवले होते !

अस्वस्थ आणि भोळसट असणारा ऑलकॉट या पथाचा प्रचार करण्याकरिता सर्वत्र फिरत असे. सर्व हिंदुस्थानात आणि सिलोनमध्ये त्याने या पंथाच्या शाखा उघडल्या. मधूनमधून त्यालाही महात्मे भेटत असत. एका रात्री या साध्याभोळ्या कर्नलला एक कूट हूमी नावाचा तिबेटी महात्मा भेटला. त्याचे वर्णन त्याने उंच, रुबाबदार आणि मवाळ असे केले. त्याला काही उपदेश करून कूट हूमी नाहीसा झाला. अर्थात यात सर्वचजण सर्व गोष्टीवर विश्वास ठेवत नसत. सिनेटने कूट हूमीला देण्याकरता ब्लाव्हाट्स्कीला एक पत्र दिले. त्यात लडन 'टाइम्स'चा त्या दिवशीचा अंक हिंदुस्थानात उत्पन्न करायला सागितले होते. ब्लाव्हाट्स्कीने कूट हूमीचे उत्तर आणले. त्यात असली कुप्रसिद्धी महात्मे लोकाना पसंत नसते असे म्हटले होते. एका सहलीचे वेळी कपबशा कमी पडल्या. ब्लाव्हाट्स्कीने एका सोबत्याला एका मातीच्या ढिगाखाली उकरायला सागितले. तिथे नेमक्या तेवढ्या कपबशा सापडल्या. सर्व थक्क झाले ! एका सशयी पाहुण्याने मात्र तो ढीग नुकताच रचला असल्याचे ओळखले.

'गूढ विश्व' (The occult world) या नावाचे एक पुस्तक सिनेटने प्रसिद्ध केले. त्यात त्याने ब्लाव्हाट्स्कीबरोबरचे गूढ अनुभव वर्णन केले आहेत. तो आणि ह्यूम यानी ब्लाव्हाट्स्कीबरोबर सिमल्यामध्ये चित्तथरारक असे दोन महिने घालवले होते हे दोघे तिला थिऑसफीच्या गुप्त तत्त्वाबद्दल प्रश्न विचारीत, तर ती महात्म्याच्या आठवणी सागून पिशाच्च्याकडून पत्रे पैदा करून त्याची करमणूक करत असे. मात्र त्याच्या प्रश्नाला टाळाटाळीची उत्तरे देत असे. ह्यूम मात्र काही काळानतर या संस्थेपासून दूर झाले; पण त्यांचे जागी सुब्बाराव आणि मोहिनी चतर्जी हे दोघे उपयोगी भारतीय या पंथात आले. १८८२ च्या अखेरीस, हिंदुस्थानातील आणि सिलोनमधील धनवान देणगीदाराच्या सहाय्याने या सस्थेचे केंद्र मद्रासजवळील अड्यार येथील एका प्रासादात हलवण्यात आले. या बगल्याचा सपूर्ण वरचा मजला ब्लाव्हाट्स्का आणि तिचा साथीदार कुलोब हे वापरीत असत. दिवाणखान्याच्या एका भागात पार्टिशन घालून तिने तिथे गूढ महाल केला होता. यात एक लाकडी देवतेची मूर्ती ठेवलेली होती. जाडजूड पडद्यानी ही मूर्ती झाकलेली असे. या मूर्तीच्या पाठीमागे एक पाकळी होती आणि ती थेट ब्लाव्हाट्स्कीच्या शयनगृहाला जोडलेली होती. ही गोष्ट मात्र फार थोड्याना माहीत होती. एका कपाटाच्या आतली फळी सरकवली की कुलोबमहाशय तथाकथित महात्म्याच्याकडून आलेली पत्रे मूर्तीच्या अतर्भागात टाकू शकत. समारंभाचे वेळी इथे जमणाऱ्या भक्ताना थेट महात्म्याकडून आलेल्या भेटवस्तू दाखवल्या जात. पुढे वर्षभर अड्यार हे अतीद्रिय चमत्कारानी थरथरत होते. महात्म्याकडून आलेली पत्रे पाहुण्यांच्या डोक्यावर पडत किंवा मूर्तीमध्ये सापडत. क्वचित केव्हा रात्रीच्या वेळेस बागेतून केवळ प्राणतत्त्वाच्या आधाराने तरंगत जाणारी पिशाच्चे दिसत.

सिनेटचे गूढवादाबद्दलचे वेड वाढतच चालल्यामुळे त्याला संपादकाच्या नोकरीला मुकावे लागले. १८८३ मध्ये तो इग्लंडला परतला. तिथे त्याने 'अज्ञात बुद्धवाद' या नावाचे पुस्तक लिहिले आणि लंडनच्या थिऑसॉफिकल सोसायटीचे कामात तो लक्ष घालू लागला. ब्लाव्हाट्स्की आणि ऑलकॉट यानीही त्याच्या मागोमाग इंग्लंडला जायचे ठरवले; पण लंडनमधल्या 'मानसिक संशोधन सस्थे'मुळे त्याचा इंग्लंडमधे जम बसेना. या संस्थेचे सशोधक मित्रत्वाने वागत; पण त्याच्या प्रश्नाना टाळाटाळीची आणि दुर्बोध उत्तरे मिळताहेत असे त्याच्या लक्षात आले. तिच्या एखाद्या विधानावर आक्षेप घेतला गेला की ब्लाव्हाट्स्कीबाई अतिशय सतापत असत. साहजिकच संशोधकांना जास्तच संशय येऊ लागला.

दरम्यान इकडे अड्यारमध्येही वादळ उफाळू लागले होते. सौ. कुलोंब संस्थेच्या विश्वस्ताना 'गूढ महालात' पाऊल टाकू देईनात, तर विश्वस्त मंडळी हे दोघे पैशाची अफरातफर करताहेत असे म्हणू लागले अखेर विश्वस्तांनी या जोडप्याला संस्थेच्या आवारातून हाकून लावले. मादाम ब्लाव्हाट्स्कीनी जादूचा परिणाम कसा साधावा हे सागण्यासाठी आपल्याला लिहिलेली चाळीस पत्रं प्रसिद्ध करण्याची धमकी मादाम कुलबने दिली. मद्रास ख्रिश्चन कॉलेजच्या मिशनरी मंडळीचा या जोडप्याने आश्रय घेतला आणि ही पत्रं त्यानी एका वार्ताहराच्या हवाली केली त्याने ती एका लेखात प्रसिद्ध केली. या प्रकरणाचा सक्षिप्त वृत्तात युरोपमधील वृत्तपत्रात येताच ऑलकॉट घाईघाईने भारतात परतला.

ब्लाव्हाट्स्कीबाई मात्र मजल-दरमजल करीत परतल्या. त्याचेबरोबर पूर्वी धर्मगुरू असणारे मध्यम वयाचे चार्लस डब्ल्यू लेडमीटर हे गृहस्थ होते. या पंथाची खलवुद्धी याच माणसाने पुढे पुरवली आणि ब्लाव्हाट्स्कीच्या पश्चात् त्याची गादी याने चालविली. 'spirits sizas and spells' या पुस्तकाचे लेखक श्री. व सौ. स्प्राग द काप हे या गृहस्थाचे वर्णन समलिंगीसभोगी व परवेदनानंदी (sadistic) असे करतात.

वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेले अहवाल पाहताच लंडनच्या मानसिक संशोधन सस्थेने रिचर्ड हॉजसन या तरुण केंब्रिज पदवीधराला अड्यार येथ पाठवले ब्लाव्हाट्स्कीबाई अड्यारला पोचण्यापूर्वी चारच दिवस आधी हॉजसन तिथे पोचला. त्याने कूलब दापत्याची मुलाखत घेऊन त्याच्या विधानाचा छडा लावण्यास सुरुवात केली. स्वत: ऑलकॉट आणि सस्थेच्या आवारात राहणारे इतर थिऑसॉफिस्टस् विसंगत आणि असत्य विधाने करताहेत असे त्याला आढळले. अनेक जादूच्या किमया कशा घडवल्या जात हेही त्याला उमगले. शेवटी

त्याला जेव्हा गूढमहालात प्रवेश मिळाला तेव्हा तिथल्या भिंतीला हा नवीन गिलावा केलेला आणि मूर्ती नाहीशी झालेली त्याला दिसली. ब्लाव्हाट्स्कीच्या हस्ताक्षराचे नमुने आणि महात्म्यांकडून आलेली पत्रे त्याने हस्ताक्षरतज्ञाकडून तपासून घेतली. यातही बहुतेक पत्रे ब्लाव्हाट्स्कीनेच लिहिली आहेत आणि बाकीची दामोदर नावाच्या एका हिंदी शिष्याने लिहिली आहेत असा त्याचा अहवाल आला.

आणखी आरोप-प्रत्यारोप व अब्रूनुकसानीच्या खटल्याच्या धमक्या मिळाल्यावर ब्लाव्हाट्स्कीच्या शिष्यांनी तिची रवानगी युरोपला केली. मार्च १८८५ मध्ये तिने हिंदुस्थानला कायमचा रामराम ठोकला. तिच्या मागे हिंदुस्थानात हिंदु थिऑसॉफिकल सोसायटी आणि सिलोनमध्ये बुद्धिस्ट थिऑसॉफिकल सोसायटी या संस्था राहिल्या.

युरोपमध्ये थोडा काळ भ्रमती केल्यावर ब्लाव्हाट्स्कीबाई इंग्लंड-मध्ये स्थिरावल्या. तिथे त्यांची मादाम ॲनीवुड बेझंट या एकेचाळीस वर्षांच्या अतिशय बुद्धिमान स्त्रीशी गाठ पडली. बेझंटबाईंनी यापूर्वी विविध क्षेत्रात काम केले होते. अनेक वर्षांपूर्वी आपल्या धर्मगुरू नवऱ्याला सोडून निरीश्वरवाद, स्त्रीमुक्ती, संततिनियमन, समाजवाद याना त्यांनी वाहून घेतले होते. ब्लाव्हाट्स्कीने त्यांच्यावर अशी मोहिनी घातली की चार्लस ब्रॅडलॉ बर्नार्ड शॉ हे आपले पूर्वीचे सहचरी सोडून देऊन, आपल्या जिव्हाळ्याच्या सर्व मोहिमा रद्द करून त्यांनी केवळ थिऑसॉफी आणि त्याची संस्थापिका याची भक्ति करण्यास सुरुवात केली. साहजिकच ब्लाव्हाट्स्कीनंतर त्या या पंथाच्या प्रमुख होणार हे ठरल्यासारखेच झाले १८९१ मध्ये बेझंटबाई अमेरिकेच्या दौऱ्यावर असताना ब्लाव्हाट्स्कीबाईंना इन्फ्लुएंझा झाला आणि त्या शांतपणे मरण पावल्या. त्यांच्याभोवती त्यांचे विश्वासू सहकारी होते. स्प्राग द काप लिहितो, 'खोटेपणा, प्रेमप्रकरणे, मारिजुआना, महात्मे, सरकत्या फळ्या आणि असेच इतर सर्व असूनही ब्लाव्हाट्स्की ही जादूविद्येच्या जोरावर बदमाशगिरी करणाऱ्या सर्वांच्यातली विस्मयकारक, मनोरजक आणि तिच्या खास शैलीने तिच्याबद्दल प्रेम वाटायला लावणारी व्यक्ती होती यात शंका नाही.'

ब्लाव्हाट्स्कीचा अत्यविधी पार पडतो तोच ऑलकॉट, बेझंटबाई आणि जज् याच्यामध्ये तीव्र मतभेद उसळले. ब्लाव्हाट्स्कीच्या मालकीच्या वस्तू पळवणे, महत्म्याची बनावट पत्रे तयार करणे, ऑलकॉटने एका स्त्री-सभासदाशी गैरवर्तणूक करणे असे आरोप केले जाऊ लागले. जज् यानी थिऑसॉफिक सोसायटी ऑफ अमेरिका ही वेगळीच शाखा सुरू केली. तेव्हापासून या संस्थेत आणखी फाटाफूट झाली. काही फुटीर गट नाहीसे झाले. काही अद्याप तग धरून आहेत. १८९३ मध्ये ॲनी बेझट हिंदुस्थानात आल्या. बहुतेक थिऑसॉफिस्ट पंथीय तिला ब्लाव्हाट्स्कीची उत्तराधिकारी मानू लागले मात्र कागदोपत्री ऑलकॉट हेच त्याचा १९०७ मध्ये मृत्यू होईपर्यंत अध्यक्षस्थानी होते. ॲनीबेझंट यानी हिंदूधर्म स्वीकारला. इतकेच काय त्यातील सतीच्या आणि देवदासीच्या प्रथेचेे समर्थनही केले. भारतीय राष्ट्रभावना जागृत करण्याकरता त्यांनी प्रयत्न केले आणि भारतीय राष्ट्रीय सभेच्या त्या एक वर्ष अध्यक्षही होत्या ही सभा एक थिऑसॉफिस्ट ह्यूम यानीच स्थापन केली होती; पण नतर भ्रमनिरसन होऊन त्यांनी ती सोडून दिली होती.

१९०५ पासून आपल्या अनेक विद्यार्थ्यांशी समलिंगी संभोग करण्याच्या आरोपाखाली लेडबीटर (अड्यारच्या थिऑसॉफिकल केंद्राचे प्रमुख) हे कायद्याच्या कचाट्यात सापडले. थिऑसॉफिस्ट सभासदाच्या मुलाना तो गूढशक्ति प्राप्त होण्याकरता हस्तमैथुन करायला उत्तेजन देत असे असे एका चौकशीत निष्पन्न झाल्यावर त्याला राजीनामा द्यायला लावला गेला; पण पुन्हा त्याने बेझंटबाईंची मर्जी संपादन केली. स्वत: त्या मनोविकृत नसल्यामुळे गूढसंवेदनासाठी त्याना त्यांची जरूर भासत होती.

चौदा वर्षे वयाच्या जद्दू कृष्णमूर्ती नावाच्या एका ब्राह्मण मुलाला देवत्व बहाल करण्याची कल्पना लेडबीटरचीच. या मुलाला जवळजवळ सक्तीने माता-पित्यांपासून हिरावून घेऊन त्याची रवानगी शिक्षणासाठी इंग्लड आणि फ्रान्सला करण्यात आली आणि येणारा अवतार अशा स्वरूपात थिऑसॉफिकल सोसायटीला त्याचा नजराणा अर्पण करण्यात आला; पण १९२७ मध्ये नेदरलँडमध्ये एका शिबिरातील बैठकीत कृष्णमूर्तींनी बंड पुकारले. आपल्या शिष्याना त्याने ठणकावून सांगितले की, 'मी अवतार वगैरे कोणीही नाही. कर्मकाड, अधविश्वास, देव, भटजीगिरी आणि संस्था या सर्व गोष्टी निरर्थक आहेत. प्रत्येकाने स्वत च अंतिम सत्याचा शोध घेतला पाहिजे.' थिऑसॉफीतून बाहेर पडून कॅलिफोर्नियामधील आपल्या निवासात जाऊन ते राहिले आणि क्वचित केव्हा जगातील विविध भागात पसरलेल्या अभ्यासकाना त्यांच्या साध्यासुध्या सदेशाचे मार्गदर्शन करण्यासाठी बाहेर पडू लागले.

कृष्णमूर्तीप्रकरणामुळे राजीनाम्याची लाटच उसळली. मध्य युरोपातील २४०० सभासद रुडॉल्फ स्टाइनच्या नेतृत्वाखाली फुटून निघाले. त्याने ॲन्थ्रॉपॉसॉफिकल सोसायटी या नावाखाली नवी संघटना सुरू केली. तिचे केंद्र स्वित्झर्लंडमध्ये ठेवण्यात आले.

१९३३ मध्ये ॲनी बेझंट मरण पावल्या. पुढच्या वर्षी लेडबीटर कालावश झाले. नेहमीच्या कटकारस्थानानंतर संस्थेचं नेतृत्व अन्य कोणाचे तरी हाती गेले.

ब्लाव्हाट्स्कीबाईंच्या शिकवणीचा परिणाम आजच्या थिऑसॉफिकल सस्थावर तर झालाच आहे; पण गुप्त धन्याचा प्रभाव, महात्म्यांची उच्च पदे इ. गोष्टी अनेक जादूगिरीच्या पंथानी आणि उपपथानी स्वीकारल्या आहेत. असे पंथ उत्पन्न होतात आणि विलयाला जातात. रोसीक्रुसीयन्स, ख्रिश्चन मिस्टिक्स्, ख्रिश्चन सायंटिस्ट्स, सायंटॉलॉजिस्ट, सुबुद्धिस्ट, बाबाइस्ट, पेंटेकोस्टलिस्ट, येहोव्हाचे साक्षीदार, मोर्मोन, बहाई, हरेकृष्ण, डिव्हाइन लाइट सोसायटी, आनंदमार्ग, ट्रान्सेडेंट मेडिटेटर्स, सेव्हन्थ डे ॲडव्हेंटिस्ट इ. प्रकार यातलेच होत. बरेच वेळा या पथाचे संस्थापक हेलेना ब्लाव्हाट्स्कीच्या प्रचड यशासारखे यश आपल्याला मिळेल या आशेने असे पथ सुरू करतात.

या सर्व लुडबुडणाऱ्या महात्म्यापासून गुरू, बाबा आणि धन्यांपासून आपल्याला एक बोध घेता येईल. माणसाला ज्ञानी बनविण्याचे सामर्थ्य अड्यारच्या गूढ महालातही नसते वा साईबाबाच्या अथवा रजनीशाच्या भजनमंडपातही नसते. कोण्या एका किमयागाराकडे आपली निष्ठा आणि बुद्धी गहाण टाकून ज्ञान विकत घेता येत नाही. अभ्यास, तपासणी आणि अवलोकन या सर्वांचा जीवनातल्या प्रसगाना सामोरे जाताना केलेला विचारपूर्वक उपयोग या सर्वांतून सावकाशपणे ज्ञान साठत जाते. या ज्ञानासाठी कुठली तरी जादूयुक्त झटपट वाट (shortcut) जे शोधू पहातात ते आपले स्वत्व, निर्णयशक्ति, श्रीजवस्तू आणि शहाणपणाही गमावून बसतात. □

कथा

# लोककथा

श्रीकांत द. निबवीकर

शाळातपासनीय म्हणून या भागात बदलून आलो ते बरीच वर्षं शहरी मुलखात घालवून. हिंडायला लागल्यावर जाणवलं की गेल्या १०।११ वर्षांत बराच बदल घडून आलेला आहे. 'हरितक्रांती' म्हणतात ती लगेचच दिसते. उसाचे हिरवेगार मळे, वाऱ्यावर हलण्याने दिसणाऱ्या उसाच्या तुऱ्याच्या समुद्राच्या लाटासारख्या लाटा, त्यावर उडणारे पांढरेशुभ्र बगळे ! जागोजागी पाटाचे पाणी ! ऑइल इंजिनचा लयबद्ध आवाज ! रस्त्यांवर भेटतात साखरकारखान्याकडे जाणारे उसाचे ट्रेलर्स आणि पांढरा शर्ट, पायजमा, टोपी आणि काळा गॉगलवाले बुलेटवरचे नवश्रीमंत ! वीसेक वर्षांपूर्वी शिकायला असताना हा भाग पुष्कळसा दुष्काळी, कोरडा म्हणूनच प्रसिद्ध ! उन्हाळ्यात गावातून पिण्याच्या पाण्याचे हाल. गावातल्या विहिरी आटयच्या. मग कोणाच्या तरी मळ्यात पाणी असेल तर तिथं नाही तर पाण्यासाठी दाही दिशा ! !

गावात एस. एस. सी. पर्यंतचं हायस्कूल झालं आहे. माळावर शाळेची दुमजली इमारत आकारत आहे. शाळेचे निकाल बरे दिसले. मुलांची उपस्थिती, शिक्षकवर्गाचं शिकवणं वगैरे सर्वसाधारण ग्रामीण भागात दिसतं त्याचप्रमाणे. शहरात नोकरी मिळत नसल्याने नाइलाजाने राहिलेले शिक्षक किंवा गावालगत शेती असल्यामुळे शिक्षकीचा साईड बिझिनेस करणारे बेपर्वा शिक्षक. यामध्ये क्वचित ध्येयवादी शिक्षकही भेटतात. मग मनाला बरं वाटतं.

शाळेच्या ऑफिसात पुढाऱ्याचे, विशेषत: साहेबाचा फोटो असतोच, इथेपण ते पाहून थोडं आश्चर्य वाटलं. कारण, या भागात गावंच्या गावं कम्युनिस्ट असलेली मला माहीत होती. पत्रीसरकारच्या काळात क्रांतिवीर फार लोकप्रिय असल्यामुळे त्यांच्यामागे सगळे लोक कम्युनिस्ट ! या भागात दहशत एवढी की 'गावच्या सावकाराचे हातपाय मी तोडले होते' अशी माहिती एखादी वीरमहिला सहज भाजी चिरता चिरता सांगताना भेटते !

शाळेत चेअरमन संपतराव यांची गाठ पडली. हे गावचे सर्वेसर्वा आहेत. शिक्षणसंस्था, खरेदी-विक्री संघ, कुक्कुटपालक संघ, दुग्धव्यवसायी संघ वगैरे सर्वांचेच अध्यक्ष, जवळच असलेल्या सहकारी साखरकारखान्याचे डायरेक्टर, झेड. पी. मेंबर वगैरे वगैरे. ते कांग्रेस कमिटीचे पण मेंबर आहेत हे ऐकल्यावर मला राहवले नाही. मी विचारले, 'इफ यू डोंट माइंड, एक विचारू ?'

'नो माइंड विचारा की !'

'मी लहानपणी इथं असताना, हा भाग कम्युनिस्ट होता. आता एकदम कॉंग्रेस कशी काय ?'

त्याचं काय आहे हे पक्ष वगैरे आम्ही ठरवत नाही. वरचे पुढारी ठरवतील ते आम्ही मान्य करतो. आमचे साहेब पूर्वीचे क्रांतिवीर म्हणून आम्ही कम्युनिस्ट होतो. नंतर ते शेकामध्ये गेले, आम्ही शेकात. मग ते कॉंग्रेसचे मंत्री झाले आम्ही कांग्रेसमध्ये, ते आता इंदिराबाईंकडे जाण्याच्या विचारात आहेत, मग आम्ही पण ...'

'उद्या आमचे साहेब मुस्लीम लीगमध्ये गेले तर आम्ही सुद्धा सगळे लीगवाले होऊ !' एक कुत्सित आवाज आला. संपतरावानी रागाने त्याच्याकडे पाहिले; पण हसत मला म्हणाले, 'तर रावसाहेब, या गावाची, नव्हे या भागाची परंपराच आहे निष्ठावान सैनिकाची. सेनापती सांगेल तेच ऐकायचं !'

'या गावाची १०० वर पोरं मिलेट्रीत हैत' कोणी तरी माहिती पुरवली.

'गावात सहकारी संस्थाचं पण बरंच जाळं दिसतंय ?'

'त्याचं सगळं श्रेय माननीय संपतरावाना आहे. त्यांचे बंधू बाळासाहेब आणि मेव्हणे पतंगराव यांना आहे. त्यांच्यामुळं गावात एकजूट टिकून आहे. गावातल्या प्रत्येक गोष्टीचं सहकारीकरण केलेलं आहे त्यांनी.' बोलताना मुख्याध्यापकांचे डोळे चमकत होते.

"सगळ्या ठिकाणी आमचीच पॅनेल्स निवडून येतात. बिनविरोध !"

"आश्चर्य आहे ! कारण इतर ठिकाणी निवडणुका म्हणजे मारामाऱ्या..."

"आश्चर्य काय त्यात ? वरून साहेबाचे आदेश येतात कोणाला काढा, कोणाला ठेवा. त्यामुळं बिनविरोध ! मारामाऱ्या बिल्कुल नाहीत !"

"गावात गेल्या दहा वर्षात एकही क्रिमिनल केस नाही. यावरून काय ते समजा. एकजूट म्हणजे एकदम एकजूट !"

"हे मात्र भलतंच केडोटेबल आहे हं संपतराव !"

¤

संध्याकाळच्या एस. टी. न परत निघालो. गाडीत मोजकीच माणसं होती. शेजारीच गावच्या शाळेतले वृद्धसे शिक्षक होते. सकाळी शाळेत त्यांना पाहिल्यासारख वाटलं. त्याच्या जवळ मी गावाच्या प्रगतीविषयी, संपतरावांच्याविषयी बोलायला लागलो गौरवपर, गुरुजी खिन्नपणे हसले, "रावसाहेब, संपतरावांनी सांगितलय ते अक्षरश: खरं आहे. गावात एकजूट आहे; पण कशी तर दहशतीखाली. कोणाला विरोध करायची हिंमत नाही. सगळी प्रकरणं त्रिकूट स्वत च्या मनानं मिटवतात. गावाची एकजूट त्यासाठी वापरतात."

"मला कळलं नाही तुम्हाला काय म्हणायचय ते. एखादं उदाहरण..."

"लांब कशाला माझंच सांगतो. मी या गावचा मूळचा नाही वऱ्हाडातला आहे. इतकी वर्षं नोकरीच्या निमित्तानं इथं राहिलो. गाव, हवा, पाणी मानवून गेलं. मुलं शिकून झाली. इच्छा झाली गावातच जमीन घेऊन इथंच राहावं आणि योग असा की माझाच एक विद्यार्थी गोपाळ माने, त्याची थोडीशी चार एकर जमीन त्यानं थोडक्यात दिली. गोपाळ माने अमेरिकेला गेला कायमच्यासाठीच; पण या जमिनीवर संपतराव कंपनीचा डोळा होता. मी गावाबाहेरचा माणूस, जमीन कशी घेतो ? त्यानी जगजंग पछाडले पण गोपाळ बधला नाही !"

"मग काय झालं? इंटरेस्टिंग दिसतंय !"

"इंटरेस्टिंग तर पुढेच आहे. गावच्या एकजुटीचा कसा उपयोग करून घेतला माहीत आहे ? माझी जमीन कोणीही करायची नाही असा सगळ्याना शब्द गेला.

शेती काय एकटघा-दुकटघाचं काम आहे ? नोकर, गडीमाणसं, नागर, मोटा काहीही मिळत नाही. आज तीन वर्षं झाली जमीन जवळजवळ पडीकच आहे. त्यातून मधूनच सांगावे येतात गुपचूप, जमीन विकायची आहे का म्हणून ?'

'तुम्ही त्यांना भेटून सामोपचारानं मिटवलं का नाही ?'

'अहो, वेगळं काय भेटायचंय ? रोज भेटतात. तोंडावर गोड बोलतात; पण करणी तशीच काळी !'

'असले पांढऱ्या कपड्यातले काळ्या करणीचे संस्थापक मी पुण्या मुंबईतसुद्धा पाहिलेत.'

'आमचं खरं वाटतं म्हणून आम्ही गप्प आहोत. पण आणखी सांगू ? संपतराव म्हणाले ना, गावात दहा वर्षांत एकसुद्धा क्रिमिनल केस झालेली नाही म्हणून ! याचा अर्थ एकच आहे. केसेस तर नेहमीच होतात; पण दाखल मात्र एकही नाही एवढंच !'

¤

दुसऱ्या दिवशी आम्ही ऑफिसात बोलत बसलो होतो. साहजिकच कालचा विषय निघाला. संपतरावाच्या नेतृत्वाखालील सहकारी सस्थाची माहिती मी इतरांना देत होतो. एक कारकून मला म्हणाले,

'साहेब, पण ही सगळी शिस्त म्हणजे आणीबाणीतील अनुशासनपर्वासारखी आहे. कुठे तोंडातून शब्द काढायची सोय नाही. लगेच नाकेबंदी होते !'

'ती कशी काय ?' मी विचारले.

'मी त्याच गावचा आहे साहेब. संपतरावाच्या संमतीशिवाय गावात काही करता येत नाही म्हशी घ्यायच्या त्यांच्यातर्फे; नंतर दूध त्याच्या सोसाटीला, कोंबड्या पाळा, अंडी त्याना. ऊस लावा, विका सोसायटीला.'

'पण यात वाईट काय आहे ? विना सहकार नाही उद्धार. एकच सस्था काम करते एका व्यक्तीपेक्षा तिची बार्गेनिंग पॉवर जास्त नाही का होत ? चांगलंच आहे हे.'

'साहेब, यातून चागलं झालंच तर ते फक्त संपतरावाच्या गँगचंच. खरेदी-विक्रीचे भाव, कर्ज, व्याज या गोष्टी अशा पद्धतशीर आहेत की तुम्हा-आम्हाला काही फायदा दिसत नाही. संपतराव, पतंग्या, बाळ्या सगळ्यांची घरं भरली जाताहेत. आम्हाला हात चोळीत बसावं लागतंय !'

'पण निवडणुका तर होत असतील ना ? असले डायरेक्टर बदलून द्यावेत चांगला प्रचार करून.'

'साहेब, या निवडणुका तर बिनविरोध होतात. विरोध करणाराचे मुडदे पाडलेत तेही बिनबोभाट !'

'बिनबोभाट मुडदे ? ते कसं शक्य आहे ? काहीतरीच ?'

'गावात जे गुन्हे घडतील ते पंचायतीत सोडवले जातात. वर देवाची शपथ भंडारा उचलून. बाहेर जाऊ द्यायचं नाही. देवाचीच फार चलती आहे सध्या. कळस वर चाललेत नी जीर्णोद्धाराच्या योजना आखल्या जाताहेत.'

¤

कामाच्या गडबडीत प्रकरण विसरून चाललो होतो. एक दिवस बाजारात अचानक संपतराव आणि पतंगरावाची गाठ पडली. त्याना चहासाठी घरी घेऊन आलो. गावात कशी असली तरी मंडळी माझ्याशी फार अदबीने वागत होती. चहा-पाणी-फराळ उरकला. पुन्हा भेटीगाठीचे वायदे होऊन मंडळी निघून गेली.

आम्ही इथं आलो तशी जनाबाई आमच्याकडे कामाला आहे. तिशीची विधवा बाई. घरातलीच एक होऊन गेली आहे संपतराव बाहेर गेले तशी ती आणि माझी पत्नी दोघी बाहेर आल्या. त्यांचा आधीच संवाद झाला असावा पत्नी म्हणाली,

'अहो, या जनाबाई बघा, काम सोडायचं म्हणतात !'

'साहेब, ही चांडाळमंडळी जर सारखी तुमच्याकडे येणार असली, तर मला तुमचं काम नको. त्या हरामखोरांची सावली मला नको !'

'का ग जनाबाई ! एवढं काय झालं त्यांच्यावर भडकायला ?'

'या मुड्यानी माझ्या धन्याला मारलय आणि देवाचे कळस तेवढे वाढवून सावासारखे मिरवतात दोघं !'

'काय बोलतेस तू हे जनाबाई ?'

'साहेब, आम्ही मुंबईला होतो. अंकुशरावांना चागली मिलमध्ये नोकरी होती. मी पण मुंबईचीच आहे. जागेची फार अडचण. संपतरावाची आणि त्यांची गाठ पडली एका गावाचे असल्यानं त्यांनी गोड बोलून गावात बोलावून घेतलं. त्यांच्या सोसायटीत काम दिलं. आम्ही घर दुरुस्त करून राहिलो. गावाकडं राहायला पण बरं वाटत होतं.

'पण हळूहळू धन्याचा जीव गुदमरायला लागला. चाललेली दडपेगिरी त्याना उघड्या डोळ्यानी बघवेना. या त्रिकूटाच्या समतीशिवाय काही करायच नाही. यांच्या कर्जाचे हप्ते परतफेड न होता नवी कर्ज आणि लोकाच्या घरावर जप्त्या. खरेदी-विक्रीचे हिशेब दोन वह्यामध्ये. यांची शेती तरारून आली तर इतराना जेमतेम पाणी असे अनेक प्रकार चालू होते नी आहेत

'सोसायटीची निवडणूक आली. अंकुशरावानी स्वत निवडणूक लढवायची ठरवली. सपतरावानी धाक घातला, लालूच दाखवली, पण रावानी स्वतःच्या पॅनेलने निवडणूक-प्रचार सुरू केला सगळ्याना चांडाळांच्या भानगडी माहीत होत्याच. त्यामुळे रावाची सरशी होणार असं लोक बोलू लागले.

'एक दिवस अकुशरावाचे प्रेत रेल्वेलाइनपाशी सापडल. तुकडे झाले होते गाडीखाली. कपड्यात चिठ्ठी होती, 'प्रेम-प्रकरणामुळे निराश होऊन आत्महत्या करीत आहे.' त्यांच्या पॅनेलमध्ये सुताराची हौसाबाई होती, तिचंही नाव बदनाम. हे खोटं आहे हे गावातल्या शेंबड्या पोरालाही माहीत आहे.

'मी खूप शोक केला. येणाऱ्या-जाणाऱ्याजवळ यात संपतरावाचा हात असल्याचं सांगितलं त्यांनीच रावाना आधीच मारून गाडीखाली टाकल्याचं सांगितल. परिणामी एवढंच की, सपतरावानी देवळात सभा बोलावली. आपण यात नसल्याचं नाटक केलं आणि तरीपण लोकानी अपवाद ठेवू नये म्हणून देवळाचा कळस नवा, उंच करण्यासाठी पैसे दिले !'

# विमुक्त मानव : चार लक्षणे

प्रा. किशोर मोरेश्वर फडके (मुबई)

उषाताई शाळेतून घरी आली तेव्हा संध्याकाळचे साडेसहा वाजून गेले होते. म्हणजे नेहमीपेक्षा थोडा जास्तच उशीर झाला होता. हातातल्या वह्यांचा गठ्ठा टेबलावर टाकून तिने एकदा घड्याळाकडे पाहिले आणि काही न बोलताच ती तोंड धुण्यासाठी आत गेली. तेव्हाच मला वाटले की आजही तिचे कोठे तरी बिनसलेले असावे; परंतु मीही काही न बोलता हातातले पुस्तक पुढे वाचू लागलो. तोंड धुऊन उषाताई बाहेर आली आणि आईने आमच्यापुढे चहा ठेवताना तिला सहज म्हटले, 'गप्प का गं तू आज? आणि...'

'कंटाळा आला बाई या नोकरीचा!... इच्छा नसताना मला माझा विषय सोडून इतर इतक्या गोष्टी कराव्या लागतात की जीव अगदी नको होतो... शिवाय वह्या तपासायची ती कटकट घरी आणली आहेच!' आईचे बोलणे पूर्ण व्हावयाच्या अगोदरच उषाताईने मौन सोडले.

'खरे आहे बाई! पण आता दोन आठवड्यांनी शाळेला सुट्टी सुरू झाली म्हणजे जाईल तुझा कंटाळा!' आई समजावणीच्या सुरात म्हणाली.

'हो. ते खरं आहे... पण तो आपला तात्पुरता दिलासा! सुट्टी संपली की परत सर्व तेच! केवळ नोकरी म्हणून किती जाच सहन करायचा?' उषाताईची नेहमीचीच कुरकुर.

'अगं, म्हणून तर त्याला नोकरी म्हणतात!' आईचे ठरलेले उत्तर.

'कधीकधी वाटतं घरी बसूनच शाळेत राजीनामा पाठवून द्यावा... आणि परत कधी म्हणून कोणाची नोकरी करू नये... अगदी सर्व जुलमातून मुक्त व्हावे!' उषाताईने चहाचा कप खाली ठेवून केलेल्या तिच्या जुन्या स्वप्नाचा पुनरुच्चार.

'पुरे झाले तुझे! शाळेतील नोकरी सोडून तरी तू अगदी मुक्त होणार आहेस का?' आईचा नवा पवित्रा!

मी चमकून आईकडे पाहिले. उषाताईने तिच्या नोकरीतील कटकटींचा पाढा वाचावा, कधीकधी वैतागाची भाषा बोलावी, आम्ही तिची समजूत घालावी व तिच्या ताज्या जखमांवर मलमपट्टी करावी यात नवीन काहीच नव्हते; पण आईची आजची प्रतिक्रिया मात्र जरा अनपेक्षित होती. म्हणूनच मी चमकून आईच्या चेहेऱ्याकडे पाहिले आणि तिच्या मनात काय विचार होते ते ताडण्याचा प्रयत्न केला.

'पुरे झाले तुझे! शाळेतील नोकरी सोडून तरी तू अगदी 'मुक्त' होणार आहेस का?' असे आई उषाताईला म्हणाली तेव्हा तिच्या मनात काय होते कोण जाणे; पण मी मात्र आईच्या प्रश्नाने आश्चर्यचकित झालो होतो. कारण आईच्या त्या प्रश्नाने माझ्या मनात गेले कित्येक दिवस घोळत असलेल्या विचारावर ठिणगी पडली होती.

मुख्याध्यापकाचा सासुरवास, एका वरिष्ठ पर्यवेक्षकाकडून होणारा जाच, इच्छा नसतानाही शाळेतील अनेक कार्यक्रमात सहभागी व्हावे लागत असल्यामुळे उद्भवणारे उद्वेगजनक प्रसंग इत्यादी अनेक तापदायक गोष्टींना कंटाळून उषाताईने शाळेतील नोकरी सोडून दिली तर ती कितपत स्वतंत्र, मुक्त व सुखी होईल? स्वतंत्र किंवा मुक्त असणे म्हणजे काय? या प्रश्नाचा मी अधिकच सखोलपणे विचार करू लागलो. उषाताईने शाळेतील नोकरी सोडलीच तर शाळेतील नोकरी पत्करण्यामुळे ज्या काही न आवडणाऱ्या गोष्टी तिला कराव्या लागत होत्या त्यातून तिची सुटका होईल हे कसे नाकारता येईल? परंतु त्यामुळे उषाताई खरोखरच मुक्त किंवा स्वतंत्र होईल का, हा प्रश्न मला सतावीत होता. उषाताईसारखेच स्वातंत्र्याची, मुक्तीची स्वप्ने पाहणारे असंख्य स्त्री–पुरुष आपल्याला वारवार भेटत असतात आणि त्यांपैकी कित्येक लोक अगदी नियमितपणे, कोणत्या ना कोणत्या लॉटरीची तिकिटे विकत घेत असतात. कारण जर आपण घेतलेल्या तिकिटाचा नंबर सुदैवी ठरला तर आपल्याला भली मोठी रक्कम एकदम मिळेल व मग नोकरीवर लाथ मारून गुलामगिरीतून मुक्त होता येईल अशी त्यांची आकांक्षा असते; परंतु त्यांनाही आईने उषाताईला विचारला तशाच तऱ्हेचा प्रश्न विचारता येणार नाही का? म्हणजे असे की, जर समजा एखाद्या माणसाने विकत घेतलेल्या लॉटरीच्या तिकिटाचा नंबर सुदैवी ठरला व त्याला पाच लाख रुपये मिळाल्यामुळे त्याने नोकरी सोडली तर लगेच तो माणूस 'मुक्त' किंवा 'स्वतंत्र' होईल का? आणि तसे असेल तर जी माणसे नोकरी करीत नाहीत ती सर्व माणसे खरोखरच स्वतंत्र किंवा विमुक्त असतात काय?

अगदी काटेकोरपणे बोलावयाचे झाले तर असे म्हणता येईल की जी माणसे कोणाचीही नोकरी करीत नाहीत ती माणसे नोकरीतून उद्भवणाऱ्या कटकटींतून, कुचंबणेतून व जुलमातून मुक्त असली तरी मानसिकदृष्ट्या विमुक्त किंवा स्वतंत्र असतातच अशी खात्री देता येणार नाही. कारण एखादा माणूस राजकीयदृष्ट्या स्वतंत्र असलेल्या देशाचा नागरिक असेल, कोणताही धर्म अनुसरण्यास मोकळा असेल, सामाजिक जीवनातही तो कोणत्या वर्णात व कुळात जन्मला होता याची कोणी फिकीर करीत नसेल आणि त्याला हवा तो उद्योग–व्यवसाय करण्याची संपूर्ण मुभा असेल आणि तरीसुद्धा एका विशिष्ट अर्थाने तो गुलामगिरीत खितपत पडलेला असणे शक्य आहे आणि ही त्याची

गुलामगिरी म्हणजे मानसिक गुलामगिरी ! केवळ शाळेतील नोकरी सोडून देऊन उषाताईला मुक्ती मिळणारच नव्हती असे मला वाटले तेव्हा माझ्या मनात या मानसिक गुलामगिरीच्या स्वरूपाबद्दल विचार चालू होते.

भारतीय तत्त्वज्ञानात सलोकता, समीपता, सरूपता व सायुज्यता असे मुक्तीचे चार मार्ग सांगितलेले आहेत आणि एखाद्या माणसाला स्वतःचा आत्मा जन्म-मरणाच्या फेऱ्यातून मुक्त करून आपल्या मूळच्या परब्रह्मात विलीन करावयाची इच्छा असेल तर तो माणूस या चार मुक्तिमार्गांकडे आकृष्ट होणे स्वाभाविकच म्हणावे लागेल; परंतु हे मुक्तीचे मार्ग पारमार्थिकाना अनुसरणीय वाटले तरी इहवादी माणसाला त्यात काय स्वारस्य वाटणार ? कारण इहवादी माणसाला या जीवनात आनंदाने व सुखाने जगावयाचे असते. अर्थात मानसिकदृष्ट्या तो जर विमुक्त किंवा स्वतंत्र नसेल तर या जीवनातील किती तरी आनंदाला व सुखाला तो पारखा होईल.

सुविख्यात अमेरिकी मानसोपचारतज्ज्ञ डॉ. अल्बर्ट एलिस यानी मानसिकदृष्ट्या ज्याला विमुक्त म्हणता येईल अशा माणसाची खालील चार लक्षणे सांगितलेली आहेत. त्या लक्षणांचा नीट अभ्यास केला तर असे दिसून येईल की, मानसिक गुलामगिरीतून स्वतःची सुटका करून घेण्यासाठी इहवादी माणसालाही आध्यात्मिक नाही पण चार मानसशास्त्रीय मुक्तिमार्ग मोकळे आहेत !

१) विमुक्त मानव सतत इतरांची प्रशंसा संपादन करण्याच्या गरजेतून मुक्त असतो. सामान्यतः विमुक्त मानव समाजात राहतो व इतर माणसांबरोबर सलोख्याने, मिळून-मिसळून राहणे त्याला आवडते. शिवाय काही निवडक व्यक्तींशी जिव्हाळ्याचे संबंध राखून मैत्रीचा आनंद लुटणेही त्याला प्रिय असते. मात्र इतरांच्या सहवासाबरोबर त्याच्याकडून मिळणारी शाबासकी व प्रशंसा त्याला हवीशी वाटली तरी 'अत्यावश्यक' वाटत नाही. कारण इतरांची प्रशंसा मिळविणे व त्यांची मर्जी राखणे 'अत्यावश्यक' आहे असे वाटणे हेच एक मानसिक गुलामगिरीचे लक्षण आहे !

इतरांची प्रशंसा संपादन करणे 'अत्यावश्यक' आहे असे एखाद्या माणसाला वाटले की तो माणूस इतरांची मर्जी राखण्यासाठी नाना खटपटी-लटपटी करू लागतो. सदोदित इतरांचा कल पाहून त्यानुसार वागण्याची त्याची धडपड त्याला इतरांचा गुलाम बनवून टाकते. इतरांची मर्जी राखण्यासाठी त्याना जे रुचेल तेच करावयास पाहिजे या हिशोबाने तो स्वतःची इच्छा नसतानाही अनेक बरे-वाईट उपद्व्याप करतो; त्याचप्रमाणे इतराना जे रुचणार नाही ते आपण करता कामा नये अशी खबरदारी घेता घेता तो स्वत.च्या आवडी-निवडी मारून जगावयास शिकतो. याही पुढची पायरी म्हणजे लोकांची इतराजी पदरी येऊ नये म्हणून स्वखुषीने पत्करलेल्या लागूलचालनाच्या त्याच्या या सवयीपायी तो स्वत.चे स्वत्वच गमावून बसतो.

इतरांची मर्जी संपादन करण्यासाठी जिवाचा आटापिटा करणाऱ्या या गुलामाची मजल येथ संपत नाही. हाती घेतलेले कार्य निष्ठेने करीत असल्यामुळे ज्या इतरांची मर्जी त्याला आवश्यक वाटत असते त्यांची ज्या कोणा व्यक्तीवर कृपादृष्टी असेल त्याचीही मेहरनजर आपल्यावर असावी म्हणून त्याचीही हाजी हाजी करण्यात हा दासानुदास अग्रेसर राहतो.

येवढी सर्व उग्र तपश्चर्या करून तरी अशा माणसाचे उद्दिष्ट सफल होईल अशी खात्री कोण देणार ? कारण ज्या इतर व्यक्तींच्या कृपादृष्टीची त्याला तहान लागलेली असते त्या इतर व्यक्तींना कशाची व कोणाची तहान लागलेली असते कोणी सांगावे ? त्यामुळे एखाद्या व्यक्तीच्या बाबतीत त्याचे सव परिश्रम वाया गेले असे आढळून आल्यावर तो कमालीचा खिन्न होतो आणि त्यातूनही जी काही माणसे अशा भक्तावर अनुग्रह करतील ती माणसे आपल्यावर कितपत खूष आहेत व उद्या कितपत खूष राहतील या विवचनेने भक्त आपला परत व्याकुळच असतो. कारण, भक्ताला इतरांकडून केवळ एक कृपाकटाक्ष नको असतो तर आजन्म टिकून राहणाऱ्या कृपादृष्टीची पखरण अत्यावश्यक असते. म्हणज एकदा एखाद्या माणसाने इतरेजनाची मर्जी आपल्याला 'आवश्यक' आहे असा हट्ट धरला की तो एक मानसिक पारतन्त्र्य स्वीकारून स्वत्व गमावतो आणि शिवाय विषण्ण व चिंताग्रस्त जीवन कंठतो.

विमुक्त मनुष्याला इतरानी आपली प्रशंसा करावी असे जरूर वाटते; परंतु इतरांकडून मिळणारी प्रशंसा ही त्याची 'अत्यावश्यक गरज' नसते. तसेच, दैनंदिन व्यवहारात 'राखावी बहुतांची अंतरे' हा सल्ला उपयुक्त असतो हेही तो जाणतो व त्यानुसार स्वत.ची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी काही विशिष्ट व्यक्तींची मर्जी राखण्याची तो खबरदारी घेतो; परतु इतरांची मर्जी राखणे, त्यांच्याकडून प्रशंसा मिळविणे या गोष्टी त्याला स्पृहणीय व उपयुक्त वाटत असल्या तरी त्या 'अत्यावश्यक' नाहीत अशी त्याची मनोधारणा असल्यामुळे इतरांची मर्जी राखण्यासाठी किंवा त्यांच्या प्रशंसेस पात्र होण्यासाठी तो स्वत.च्या स्वत्वाची किंमत मोजत नाही. स्वत.चे जीवन मुख्यतः स्वत.च्या इच्छेनुसार व स्वत.च्या आवडी-निवडीप्रमाणे जगावयास तो मुखत्यार असतो. स्वत चे 'मूल्य' किंवा 'लायकी' तो इतरांकडून मिळणाऱ्या प्रशंसेवर किंवा अनुमोदनावर अवलंबून ठेवीत नसल्यामुळे तो इतरांची खप्पा मर्जी सहन करू शकतो; लोकांची इतराजी त्याला आकाशाची कुऱ्हाड वाटत नाही किंवा आज ज्याने पुष्पहार घातला त्यानेच उद्या पाहिला प्रहार केला तर धरणीकंप झाला असेही तो समजत नाही. ज्या लोकांकडून तो प्रशंसेची अपेक्षा करतो त्याना त्यांची प्रशंसा न करता उलट त्याची निंदाच केली तर अपेक्षाभंग झाल्यामुळे त्याला वाईट वाटते; परतु त्या अपेक्षाभंगामुळे तो हतबल किंवा पराभूत होत नाही. कारण त्याची अपेक्षा फक्त अपेक्षाच असते; मागणी किंवा अनिवार्य गरज नसते.

२. विमुक्त मानव द्वेषभावनेतून मुक्त असतो.

एखाद्या माणसाने आपण इतरांच्या प्रशंसेस पात्र होणे 'अत्यावश्यक' आहे असे एकदा गृहीत धरल्यावर तो स्वत चे स्वातंत्र्य गमावून मानसिकदृष्ट्या इतरांचा गुलाम कसा होतो ते समजणे अवघड नाही; परतु इतर माणसांची गुलामी पत्करण्याचा आणखी एक अप्रत्यक्ष मार्ग आहे. जो मनुष्य त्या मार्गाने जात असतो त्याला आपण एक प्रकारे लोकांचे गुलाम झालेलो आहोत याची जाणीवही नसते. उलट त्याचा दावा असा असतो की तो पूर्णत. स्वतंत्र वृत्तीचा माणूस आहे.

असा मनुष्य ज्या कुटुंबात राहत असतो त्या कुटुंबातील माणसा-

कडून, त्याच्या उद्योग-व्यवसाय.च्या निमित्ताने तो ज्या माणसाशी संपर्क ठेवीत असतो त्या माणसाकडून व जीवनातील इतर सामाजिक प्रसंगामुळे त्याला ज्या अनेक माणसांशी देवाण-घेवाण करावी लागते त्या माणसांकडून मनातल्या मनात एक मोठी जबरदस्त मागणी करीत असतो. त्याला असे मनापासून वाटत असते की इतर सर्व माणसानी आपल्याशी सहकार्याने, सहृदयतेने व न्यायबुद्धीने वागणे अत्यावश्यक आहे; इतरांनी आपल्याशी अशा योग्य प्रकारे वर्तन केले नाही तर ती भयानक परिस्थिती आपण सहन करू शकणार नाही. म्हणून इतरांनी आपल्याशी अयोग्यपणे, अन्यायाने किंवा दुष्टाव्याने वागताच कामा नये आणि जे लोक आपल्याशी अशा वाईट रीतीने वागतील ते लोक शुद्ध नीच, नालायक व नासके-कुजके असतात व त्यांना त्यांच्या अशा सडक्या वर्तनाबद्दल योग्य ती अद्दल घडवलीच पाहिजे !

जो मनुष्य सतत अशी न्यायाची तराजू-तागडी मनात बाळगून इतरांच्या वर्तनाकडे पाहतो त्याच्या मनात क्षणोक्षणी इतरांबद्दल विद्वेषाची, वैमनस्याची भावना बळावत गेली नाही तरच आश्चर्य ! कारण जगातील सर्व लोक त्याच्याशी न्यायाने व समंजसपणे व्यवहार करावयास कोणत्याच रीतीने बाधलेले नसतात. लोकाचे असे बेपर-वाईचे, बेगुमान वर्तन ज्याला सहन होत नाही अशा माणसाच्या मनात साहजिकच दुसऱ्यांबद्दल शत्रुत्वाची भावना अधिकच खोलवर रुजते आणि जगातील अशा क्रूर दुष्टात्म्याचे पारिपत्य करण्याची त्याची जाज्वल्य न्यायबुद्धी त्याला अस्वस्थ करून टाकते. नतद्रष्ट माणसाना धडा शिकविण्याच्या कार्याला स्वखुषीने वाहून घेतलेल्या अशा पुण्यात्म्याला आपल्याला आयुष्यात सुखाने जगण्यासाठी काय करावयाचे आहे याचा विसर पडलेला असतो. त्यामुळे अप्रत्यक्ष रीतीने असा माणूस स्वत चे स्वातंत्र्य तर गमावून बसतोच; पण शिवाय एक प्रकारे दुसऱ्याची चमत्कारिक गुलामगिरीही स्वीकारीत असतो हे त्याच्या गावीही नसते !

उलट विमुक्त मानव इतराशी कशा प्रकारे वागतो व त्याच्या वर्तनाकडे कोणत्या दृष्टिकोणातून पाहतो ? इतराशी तो सहृदयतेने, सहकार्याने वागण्याचा प्रयत्न जरूर करतो, कारण त्याला जीवनात जे काही मनापासून करावयाचे असते त्यासाठी त्याला इतराचे सहकार्य उपयुक्त असते. त्यामुळे इतरांशी आपण जसे वागतो तसेच इतरांनीही आपल्याशी वागावे असे त्यालाही वाटते; परंतु इतरानी आपल्याशी न्यायाने व सहृदयतेने वागावे या अपेक्षेचे रूपांतर तो 'अत्यावश्यक' गरजेत करीत नाही. आपण स्वतः इतराशी कितीही प्रामाणिकपणे व सहृदयतेने सबंध ठेवण्याचा प्रयत्न केला तरी इतर लोक आपल्याशी तशाच प्रकारे वर्तन करावयास बाधलेले नाहीत हे तो ओळखून असतो. आपण कसेही वागलो तरी इतर माणसे स्वतंत्र असतात व त्यांच्या वर्तनावर आपले नियंत्रण नसते हे माहीत असल्यामुळे त्याच्या इतराबद्दलच्या अपेक्षा वास्तववादी असतात.

अर्थात ज्या वेळी त्याने केलेल्या उपकाराची फेड काही लोक चक्क अपकाराने करतात किंवा इतर लोक जेव्हा त्याच्याशी अकारण शत्रुत्वाच्या नात्याने वागतात तेव्हा त्याला जरी वाईट वाटते तरी तो अशा माणसाचा व्यक्तिशः द्वेष करीत नाही. कोणत्याही माणसाचे दुष्ट, अनैतिक, अप्रामाणिक वर्तन त्याला त्याज्य वाटले तरी त्यावरून तो असे अनिष्ट वर्तन करणाऱ्या माणसाला सपूर्णतः त्याज्य किंवा नतद्रष्ट समजत नाही. पहिली गोष्ट अशी की, इतर माणसाचे वर्तन चागले किंवा वाईट हे ठरविणेसुद्धा वाटते तितके सोपे नसते हे तो जाणून असतो. शिवाय वाईट वर्तन कर-णाऱ्या संपूर्ण व्यक्तीलाच नीच किंवा नालायक लेखून जबरदस्त शासन केले तर ती व्यक्ती सुधारेलच असेही नाही हे स्पष्ट दिसत असल्यामुळे तो कोणत्याही व्यक्तीचा खुनशीपणे पाठपुरावा करीत नाही. इतराच्या अप्रिय वर्तनामुळे तो कितीही नाखुष झाला किंवा इतराच्या दुष्ट वर्तनामुळे त्याचे कितीही नुकसान झाले तरी तो विद्वेषाच्या आधीन जाऊन इतराचा अप्रत्यक्षपणे का होईना; पण गुलाम होत नाही. कारण जो मनुष्य विद्वेषाच्या भावनेने पेटलेला असतो तो मनुष्य इतरांचा नायनाट करण्याच्या आकाक्षेने इतका बेफाम होतो की आयुष्यात आपल्याला काय हवे आहे व काय करा-वयाचे आहे याचा त्याला विसर पडतो. स्वत्व गमावून इतरांची गुलामगिरी पत्करण्याच्या या मार्गापासून विमुक्त माणूस लांब राहतो. अर्थात इतरांनी आपल्याशी सहृदयतेने व न्यायाने वागावे असे विमुक्त माणसालाही वाटते आणि स्वहिताचे रक्षण करण्यासाठी तो प्रसंगी इतराशी झगडण्यासही कमी करीत नाही. मात्र इतरानी आपल्याशी सहृदयतेने व न्यायाने वागणे 'अत्यावश्यक' आहे व जे लोक आपल्याशी योग्य प्रकारे वर्तन करीत नाहीत ते पूर्णत नालायक असतात व त्याना नरकाचा रस्ता दाखविला पाहिजे अशा आत्म-घातकी दृष्टिकोणाच्या आहारी तो जात नाही.

३. विमुक्त मानव सहजासहजी वैफल्यग्रस्त होत नाही.

लहान मुलाला एखादी वस्तू हवी असली म्हणजे ती त्याला तत्काळ हवी असते. खेळणे हवे म्हणजे दिसल्याबरोबर लगेच हवे; खाऊ हवा म्हणजे मागितल्या क्षणी हवा; घराबाहेर भटकायला जावेसे वाटले की मग उशीर खपत नाही ! हा लहान मुलाचा स्वभाव आपल्याला क्षम्य वाटतो व कधीकधी तर अशा हट्टीपणामुळे मूल गमतीदारपणे वागले तर त्याचे कौतुक होणेही स्वाभाविक असते कारण काही झाले तरी मूल ते मूलच !

परतु काही माणसे वयाने व शरीराने वाढलेली असली तरी त्यांचा हा बालिश व दुराग्रही स्वभाव बदललेला नसतो. आपल्याला जे काही हवे आहे ते सर्व लगोलग, विनासायास व अगदी मागणीहुकूम आपल्यासमोर हजर झालेच पाहिजे असे त्यांना मनोमनी वाटत असते. सभोवतालच्या जगातील सगळ्या घटना आपल्या इच्छेनुसार घडणार नसतील तर मग कोणत्याही गोष्टीसाठी व्यर्थ खटाटोप कराच कशाला असा त्याचा दावा असतो. कारण आपले सर्व मनसुबे आपल्या योजनेनुसार निर्विघ्नपणे प्रत्यक्षात उतरणार नसतील तर उगीच कष्ट उपसण्यात काहीच अर्थ नाही असा त्याचा दृष्टिकोण असतो.

कळत किंवा न कळत जो मनुष्य असा दृष्टिकोण स्वीकारतो तो बहुधा वैफल्याने सत्रस्त झालेला असणे स्वाभाविकच आहे. कारण त्याच्या सभोवतालच्या जगातील घटना काही त्याच्याच इच्छेनुसार घडत नसतात आणि त्यामुळे अशा माणसाला जीवनात जे काही हवे असते ते विनासायास क्वचितच प्राप्त होते. तसेच कोणतीही साधी इच्छासुद्धा पूर्ण करण्यासाठी जे प्रयत्न करावे लागतात ते प्रयत्न असा बालिश स्वभावाचा माणूस सामान्यत. करू शकत नाही. परि-

णाम असा होतो की जीवनाच्या विविध क्षेत्रांत कोणतीच गोष्ट आपल्या मनाप्रमाणे घडत नाही या त्रासदायक जाणीवेने तो हळूहळू विषण्ण व निराश होतो

कालातराने कोणत्याही कामास प्रारंभ करणेही अशा नैराश्यग्रस्त माणसाला नकोसे वाटू लागते; कारण ते काम सिद्धीस नेण्यासाठी आपल्याला काही कष्ट पडता कामा नयेत व त्या कामात कोणत्याही अडचणी येता कामा नयेत अशी त्याची अपेक्षा असते. अर्थात हात-पाय न हलविता त्याचे उद्दिष्ट सफल होत नाही म्हणून तो अधिकच निराश होतो व हळूहळू स्वत ची कीव करू लागतो आणि एकदा आत्मकरुणेची ही गुलामगिरी त्याने स्वत वर लादून घेतली की तो आणखीनच निष्क्रिय बनतो

कोणतेही कष्ट करावयास तयार नसलेल्या अशा माणसाला आणखी एका कारणामुळे स्वत ची कीव वाटू लागते. त्याने काही केले अथवा न केले तरी त्याच्या आयुष्यात ज्या काही दुर्घटना किंवा आपत्ती त्याच्या वाटचाला येतात त्यांना सामोरे जाण्याची मानसिक कुवतही त्याच्याजवळ नसते. आपल्या आयुष्यात काही मनाविरुद्ध घडू नये असे त्याला वाटत असल्यामुळे, कुटुंबातील कोणाचे आजारपण, प्रियजनाचा वियोग अथवा त्याचे निधन, आर्थिक अडचणी इत्यादी घटनाचा त्याच्यावर इतका आघात होतो की तो फक्त विषण्णच होत नाही तर पूर्णत' आत्मकरुणेच्या आहारी जातो. म्हणजे एक प्रकारे सभोवतालच्या जगात घडणाऱ्या घटनाचा तो गुलामच बनतो !

विमुक्त मानवाने आपल्या सभोवतालच्या जगातील घटना नेहमी आपल्या इच्छेनुसारच घडल्या पाहिजेत ही अपेक्षा कशी अवास्तव आहे हे केव्हाच जाणलेले असते. सामान्यत. आपले बेत तडीस नेण्यासाठी आपणच धडपडले पाहिजे व अगदी चिकाटीने प्रयत्न करूनही आपले काही बेत तडीस जातील, काही थोड्या अधिक प्रणाणात तडीस जातील व काही कधीच सफल होणार नाहीत हे तो ओळखून असतो. त्यामुळे त्याच्या आशा-आकाक्षा जेव्हा त्याच्या मर्जीनुसार फलद्रूप होत नाहीत तेव्हा त्याला जरी निराशेची भावना जाणवते तरी तो स्वतःची कीव करीत नाही. शिवाय, आयुष्यात ज्या अनेक अडचणी व संकटे त्याच्यावर कोसळतात त्यांना सामोरे जाण्याची त्याची मानसिकदृष्ट्या तयारी असते; कारण आपल्या वाटयाला कोणत्याही कटकटी किंवा आपत्ती येताच कामा नयेत अशी बिनबुडाची मागणीच तो मुळात करीत नसतो. थोडक्यात म्हणजे कोणत्याही प्रकल्पात नसत्या कटकटी व आपत्ती उपटल्या नाहीत तर छानच होईल असे जरी त्यालाही वाटते तरी तशा कटकटी व आपत्तीपासून जगत्कर्त्याने आपल्याला वगळावे अशी भ्रामक अपेक्षा तो ठेवीत नाही.

४. विमुक्त मानव जीवनात संपूर्णपणे यशस्वी होण्याच्या महत्त्व-कांक्षेतून मुक्त असतो समजा एखाद्या समंजस माणसाच्या असे लक्षात आले की दुसऱ्याची प्रशंसा मिळविणे स्पृहणीय असले तरी ती काही अत्यावश्यक गरज नाही; इतर लोकांनी आपल्याशी सहृदयतेने व न्यायाने वागणे किफायतशीर असले तरी त्यांनी तसेच वागले पाहिजे ही मागणी अवास्तव आहे आणि जगातील घटना सुव्यवस्थितपणे घडून आपले बेत बिनधास्तपणे तडीस गेले तर उत्तमच; परंतु जगातील घटना तशाच रीतीने घडल्या पाहिजेत अशी अपेक्षा करणं मूर्खपणाचं आहे. तर तो माणूस मानसिकदृष्ट्या स्वतंत्र किंवा मुक्त झाला असे म्हणता येईल काय ?

ज्या मनुष्याने वरील तीन मार्गांनी स्वत ला विमुक्त करून घेतले आहे त्या मनुष्याला फार मोठ्या प्रमाणात मानसिक स्वातंत्र्य प्राप्त होईल यात शकाच नाही आणि असा मनुष्य विषण्णता, चिंताग्रस्तता, वैरभाव व आत्मकरुणा या भायनापासून बऱ्याच प्रमाणात स्वत.चा निश्चितच बचाव करील असेही म्हणता येईल

परंतु वरील तीन आत्मघातकी दृष्टिकोणांचा त्याग केल्यावरही एखादा माणूस एका जबरदस्त महत्त्वाकाक्षेपायी स्वत.ला चिंताग्रस्त व विमनस्क करून घेऊ शकेल आणि ती महत्त्वाकाक्षा जीवनातील सर्व क्षेत्रात आपण सदैव व सपूर्णपणे यशस्वी होणे 'अत्यावश्यक' आहे या कल्पनेतून जन्मलेली व फोफावलेली असते.

व्यापार, उद्योग, व्यवसाय, कला, छंद इत्यादी विविध क्षेत्रात यशस्वी होण्याची महत्त्वाकाक्षा अनिष्ट असते असे कोणता शहाणा माणूस म्हणेल ? कारण अशी महत्त्वाकाक्षा मनात जोपासल्यामुळेच तर माणूस आपल्या कर्तृत्वाला नवी नवी दालने खुली करून देतो आणि कमी–अधिक प्रमाणात यशस्वीही होतो, परंतु ज्या माणसाला आपला स्वाभिमान टिकविण्यासाठी सर्व क्षेत्रात सदैव व संपूर्णत: यशस्वी होणे 'अत्यावश्यक' वाटते तो माणूस महत्त्वाकाक्षी नसतो तर स्वत च्या रोगट महत्त्वाकांक्षेचा गुलाम असतो. असा माणूस प्रत्यक्ष जीवनात अमाप कष्ट घेतो; किंबहुना कोणत्याही परिस्थितीत पूर्णत व सदैव यशस्वी झालेच पाहिजे या तीव्र आकाक्षेपायी झपाटल्याप्रमाणे काम करून तो स्वत चे (व प्रसंगी इतराचेही !) इतके हाल करतो की विचारता सोय नाही आणि या मुसंडी मारून पुढे जाण्याच्या जीवघेण्या शर्यतीत तो अनेकदा यशस्वी होऊन नेत्र-दीपक कामगिरी करूनही दाखवितो.

कितीही 'यशवंत' झाला तरी अखेर तो माणूसच असतो; त्यामुळे कित्येकदा प्रयत्नांची शिकस्त करूनही अशा माणसाची गरुडझेप चुकते, फसते, अयशस्वी होते हे उघडच आहे. अशा वेळी तो कमालीचा विमनस्क होतो. कारण त्याच्या मनात केवळ यशस्वी होण्याची महत्त्वाकाक्षा नसते तर यशस्वी होणे ही त्याची 'अत्या-वश्यक गरज' असते. त्यामुळे तो जेव्हा एखाद्या क्षेत्रात नेत्रदीपक यश संपादन करतो तेव्हा आपण असेच यशोमंदिराच्या कळसावर सदासर्वकाळ टिकून राहू की नाही या विवचनेने तो स्वत ची छळणूक करतो. सारांश, स्वत च्या महत्त्वाकांक्षेचा गुलाम असलेला मनुष्य यशस्वी होऊन काय किंवा अयशस्वी होऊन काय अखेर विमनस्क किंवा चिंताग्रस्तच राहातो. त्याची ही अशी ससेहोलपट कशामुळे होते ? केवळ तो महत्त्वाकांक्षी असतो म्हणून नाही तर आपण सर्व क्षेत्रात सदैव व संपूर्णपणे यशवंत होणे अत्यावश्य आहे या त्याच्या अमर्याद महत्त्वाकाक्षेची गुलामगिरी त्याने पत्करलेली असते म्हणून !

विमुक्त माणूसही महत्त्वाकांक्षी असतो. कोणत्याही अंगीकारलेल्या कार्यात यशस्वी व्हावे असे त्यालाही वाटत असते; परतु स्वत चा स्वाभिमान टिकविण्याठी किंवा स्वत वर प्रेम करण्यासाठी प्रथम

आपण सर्व क्षेत्रात पूर्णत यशस्वी होणे 'अत्यावश्यक' आहे अशा अवास्तव महत्त्वाकांक्षेची गुलामी तो पत्करीत नाही, कोणत्याही क्षेत्रात यश मिळविण्याचा तो कसोशीने प्रयत्न करतो; परंतु इतकेही करून तो मनुष्यच असल्यामुळे जेव्हा अयशस्वी होतो तेव्हा तो जरी साहजिकच खट्टू होतो तरी स्वत ला 'अयशस्वी माणूस' समजून तो स्वत ची निर्भर्त्सना करीत नाही. त्याचप्रमाणे त्याच्या प्रयत्नांना जेव्हा यश येते तेव्हा यशाचा आणि श्रमसाफल्याचा आनंद तो उपभोगतो; उद्याही आपण असेच यश मिळवून आपली 'लायकी' सिद्ध करून दाखवू की नाही या आचरट विवंचनेने आजच्या आनंदावर तो विरजण घालीत नाही. कारण उद्याही यशस्वी व्हावे असे त्याला वाटत असले तरी स्वत.ची 'लायकी' सिद्ध करण्यासाठी यशस्वी होणे अत्यावश्यक आहे अशा अविवेकी कल्पनेचा तो गुलाम नसतो!

डॉ. अल्बर्ट एलिस यानी पुरस्कारलेल्या चार मानसशास्त्रीय मुक्तिमार्गांचे स्वरूप हे असे आहे. आता साहजिकच एखाद्याला असे वाटेल की या चार मुक्तिमार्गांचा अवलंब करून तरी मानसिक विमुक्ती मिळविण्याचे प्रयोजन काय? कारण एखाद्या माणसाने केवळ मानसिक मुक्तीसाठी मुक्ती मिळविण्याच्या कार्यालाच स्वत.ला वाहून घेतले तर तीही एक मानसिक गुलामगिरीच म्हणावी लागेल. इहवादी दृष्टिकोणातून विचार केला तर असे म्हणता येईल की मानसिक विमुक्ती प्राप्त करून घेण्याचा प्रयत्न करण्यामागचा हेतू असा की माणसाला जीवनात मनमुराद आनंद लुटता यावा; किंबहुना विमुक्ती म्हणजे या जीवनात मनसोक्त आनंद व सुख उपभोगण्याची तीव्र इच्छा असे म्हटले तरी चालेल.

मखमलीच्या पायघड्या अंथरलेला जीवनाचा मार्ग जर काही लोकांच्या नशिबी येत असलाच तर असे नशीबवान लोक एकूण विरळाच; बहुतेकांच्या आयुष्याचा मार्ग संघर्षमय व काट्याकुट्यानी भरलेला असतो. मग अशा मार्गावरून प्रवास करताना आणखी शिरावर मानसिक गुलामगिरीचे ओझे का चढवून घ्या? विमुक्त मानव एकटा असताना किंवा समाजात वावरत असताना, प्रियजनाच्या सहवासात मैत्रीचा व काव्यशास्त्रविनोदाचा आनद लुटताना किंवा उद्योग–व्यवसायात गुतला असताना किंवा एखाद्या प्रकल्पात विमग्न झालेला असताना, आवडीच्या छंदात रममाण झालेला असताना किंवा रोजच्या जीवनातील सामान्य कामे करीत असताना मानसिकदृष्ट्या स्वतत्र असतो तो अशासाठी की त्याल जे काही करावेसे वाटते ते करण्यात समरस होता यावे. त्याला या जीवनात काय करावेसे वाटेल ते कोणी सागावे? परतु त्याला जे काही करावेसे वाटते ते, त्याला कितीही स्पृहणीय वाटले तरी 'अत्यावश्यक' वाटत नाही आणि यातच त्याचे स्वातत्र्य किंवा मानसिक विमुक्ती सामावलेली असते!

डॉ. अल्बर्ट एलिस याची विमुक्त मानवाची मानसशास्त्रीय कल्पना डोक्यात घोळत असतानाच आईने 'शाळतील नोकरी सोडून तरी तू अगदी मुक्त होणार आहेस का?' असा प्रश्न उषाताईला विचारला तेव्हा मी चमकलो. कारण मला वाटले की आईच्या मनात तरी काय होते? मानसशास्त्र तर सोडाच पण शालेय शिक्षणही पूर्ण झालेले नसताना माझ्या आईला व्यवहारज्ञानातून जसे जीवनातील अनेक गोष्टीचे सम्यक ज्ञान प्राप्त झाले होते त्याप्रमाणेच खऱ्या मानसिक स्वातंत्र्याचा अर्थ तिला केव्हाच कळून चुकला होता काय? ते काहीही असो पण तिने उषाताईला विचारलेल्या प्रश्नाने माझ्या मनात पिजून पडलेल्या विचारावर ठिणगी पडली व चहा पिऊन झाल्यावर कागद सरसावून मी हा लेख लिहून काढला एवढे मात्र खरे! □

---

## चीन : पृष्ठ ५ वरून

चीन : पृष्ठ ५ वरून

साठीनंतरही काही व्यक्ती चागल्या कार्यक्षम असल्याचे दिसून येते. तेव्हा निवृत्तीच्या बाबतीत वयापेक्षा कार्यक्षमता हीच खरी कसोटी मानायला हवी. निवृत्तीसाठी सध्याची वयोमर्यादा थोडी वाढवावी, पण राजकीय नेत्यानाही निवृत्ती लागू करायला हवी. याबाबतीत कोणताही गाजावाजा न करता साठाव्या वर्षी निवृत्त होऊन माजी ब्रिटिश पतप्रधान विल्सन यांनी आदर्श घालून दिला आहे निवृत्ती म्हणजे राजकारण सन्यास नव्हे फक्त अधिकारपदाचा संन्यास राजकीय प्रश्नाबाबत सल्लागाराची भूमिका त्यानी घ्यावी.

सर्व पातळीवर पक्षातर्गत खुल्या चर्चेने व लोकशाही पद्धतीने निर्णय ही पद्धती कम्युनिस्ट पक्षातही अवलंबली गेल्यास एकाधिकारशाही कार्यपद्धतीतून होणाऱ्या चुका टळतील, राजकीय प्रश्नाबाबत पक्षाच्या सर्वसामान्य सभासदाची जाणीव व जागरूकताही वाढवायला हवी.

पूर्वीच्या चुका टाळण्याच्या दृष्टीने चीनमध्ये काही नवी कार्यपद्धती अवलबिली जात आहे का? पक्ष व सरकार यानी एकमेकाच्या कामात हस्तक्षेप करावयाचा नाही हे तत्त्व नव्या राज्यकर्त्यांनी स्वीकारले आहे. पक्षाचे अध्यक्ष हुआकुओ फेंग यानी पतप्रधानपद सोडले. अध्यक्षपद त्याच्याकडे असले तरी त्याचे बरेच अधिकार कमी करण्यात आले आहेत. डुग झिपाओपिंग पतप्रधान नसले तरी तेच सरकारी धोरणाचे मुख्य सूत्रधार आहेत त्यानी सरकार आपल्या नियत्रणाखाली आणलेच आहे व येत्या काही महिन्यात ते पक्षावर आपली पूर्ण पकड बसवितील. □

पुस्तके

# घरदार : जगण्यातल्या कोंडीचे दर्शन

एक साधं चौकोनी कुटुंब. स्वातंत्र्यपूर्व काळातलं. नवरा-बायको, मुलगा-मुलगी, नवऱ्याची आई. नवरा कुठं तरी, कसे तरी पैसे मिळवून घराचा गाडा कसा तरी ओढतोय. बायको या गाड्याखाली पार चेपून गेलीय. मुलाला या साऱ्याची चिंता करायचं कारणच काय ? तो आपलं जगणं हवं तसं जगण्याचा प्रयत्न करतोय; पण त्याची त्यातही कोंडी होतेय. या मुलाची, बापूची कथा घरदारमध्ये वाचायला मिळते.

बापूचं जीवन चारचौघासारखंच. लहानपणी रीतीप्रमाणे शाळेत जाणारा बापू हुशार आहे. शाळेतल्या गमतीजमतीत त्याची बहीण कमळीही सहभागी होते आहे. चिंचा तोडताना पकडल्यामुळे त्याची झालेली तारांबळ, पेपर लवकर देऊन आला म्हणून आईची चिडचिड आणि मार; पण गुरुजींकडून मात्र बापूला शाबासकी. बापूच्या रा. स्व. संघातल्या गमती या साऱ्यांनी बापूचं जीवन तसं समृद्ध आहे. बापूच्या अवतीभोवतीची 'गँग'ही या गमतीमध्ये सामील आहे. या लहानपणीच्या अजाणपणात बापू स्वत:वरच खूष आहे. त्याला निळू दामले या श्रीमंत मुलाची दोस्ती मिळालीय आणि त्यानं तो समाधानी आहे. याच काळात बापू संघस्थानावर जायला लागला. त्याला संघाबद्दल असीम आदर वाटू लागला. बापूचा काका हेरंब त्याच्या वडिलांच्या इच्छेविरुद्ध त्याच्याकडं शिकण्यासाठी म्हणून राहायला आलाय. हेरंबाला संघाबद्दल तिटकारा; पण बापूला प्रेम. हे द्वंद्व पुढं आयुष्यभर कायम टिकलं.

हेरंब हुषार आहे, पण संघातला बापू देशमुख हेरंबापेक्षा वरचढ ठरावा अशीच बापूची इच्छा आहे. हेरंबचा भाऊ शामला घरच्या भानगडीत अजिबात इंटरेस्ट नाही. त्याला टेलरिंगचं दुकान घालून दिलं तर तेही त्यानं बुडवलन. या सगळ्या प्रकारात बापूचे वडील मात्र भयंकर अस्वस्थ आहेत.

बापूला संघावर बंदी आल्याने अटक झाली, खरं तर पत्रक घरोघर टाकताना त्या बापड्याला पकडलं, आता परीक्षेला तर बसायला हवं आणि बाहेर सोडत नाहीत या कात्रीत बापू तुरुंगात राहतोय. त्याच काळात बापूवर निस्सीम प्रेम करणारे त्याचे वडील निवर्तले आणि बापू आतून उन्मळून पडला. हेरंबनेही शिक्षण सोडून नोकरी धरली याही परिस्थितीत बापूनं पेपर मिळवून एस. एस. सी.ला खूप मार्कस् मिळवले. बापू आता वयानं मोठा झालाय. त्याला लकडीपुलावर पोरी पाहात हिंडायची सवय लागली आणि त्याचा संघ कायमचाच सपला, पण संघात जात होता म्हणून त्याला इंजिनिअरिंगला प्रवेश मिळू शकला नाही. त्याची बहीण कमळी शिवणकाम करते. मॅट्रिकचा नादही सोडला. आता ती सिंध्याच्या तरुण पोराबरोबर दर सोमवारी न चुकता सिनेमाला जाते. तिचं लग्न जमणं कठीण झालय. बापूची आई–आजी अगदी हळव्या झाल्यात.

बापूला रेशनिंग ऑफिसात नोकरी मिळाली, ती सुटली. पुन्हा बापूचे बेकारपणाचे उद्योग सुरू झाले. त्याला मग कोळसेवाल्या चहाड्या वासूअण्णाकडे नोकरी लागली, तीही सुटली. आता घरची सारी जबाबदारी बापूवर. हेरंबानं घर वेगळं करायचं ठरवलं. त्यामुळे बापूला आतून कससच होतंय, पण तरीही 'व्हाइट हाउस'मधील त्याचे व गँगचे उद्योग मन:पूर्वक करण्यात तो मग्न होता. मग बापूला एकदा समाजसेवकाच्या नोकरीची अपॉइंटमेंट मिळाली. बापू रुजू होण्याच्याच दिवशी त्याची आजी देवाघरी गेली आणि बापू सुन्न-सुन्नसा झाला.

'घरदार'मध्ये बापूचं हे असं जगणं लेखक श्री. मधू साबणे यांनी रेखाटलंय. एका सामान्य मुलाची ही कहाणी. बापू हा या सामान्यांचा प्रतिनिधी, तुमच्या-आमच्यातलाच. आपल्यासारख्याच त्याच्याही लहानपणी गमती होत्या; पण जसजसं जगणं त्याला सामोरं येऊ लागलं तसतसा बापू आतून विरघळत चालल्याचं दिसतं. बापू आणि त्याचं कुटुंब यामधली ही नाती 'घरदार'मध्ये तरलपणे व्यक्त झाली आहेत. कुटुंबातल्या साऱ्या घटनांचे पडसाद आणि प्रतिसाद त्यातल्या प्रत्येक व्यक्तीवर कसे होतात याचं चित्रण इथं जिवतपणे उभं राहतं. कुटुंबातली Complications आणि त्यातून मनाची होणारी अवस्था, व्यक्ति-व्यक्तीमधील ताणबाण या कादंबरीत मांडले आहेत, यातूनच जगण्याचा एक आलेख काढण्याचा प्रयत्न लेखक करताना दिसतो.

'घरदार' चा नायक बापू. त्याच्या अवतीभोवतीची सारी माणसे, त्याच्या स्वभावछटांसह इथं वावरतात आणि त्या माणसांमधील अंतर्गत तणावही व्यक्त करतात. शेवटी अस्तित्वाचा संदर्भ जगण्यात आहे, जगण्याच्या अर्थामध्ये आहे, याचा उलगडा घरदार वाचताना होतो. बापू कोण होता ? खरं तर बापू म्हणजेच तुम्ही, मी, आपण. आपल्या जगातली ही विदारकता घरदारमध्ये आरशासारखी प्रतिबिंबित होताना दिसते.

बापूची गँग पोरी फिरवण्यापासून जे सर्व चाळे करते त्याचा बापूच्या जीवनावर नेमका कोणता परिणाम होतो ? बापू या सगळ्यातून पुन्हा पुन्हा अंतर्मुख कसा होतो? की बापू या साऱ्याच बाह्य गोष्टींना कंटाळून या गँगमध्ये सामील होतो ? बापूला त्यात फार स्वारस्य नाही, जीवनातला हा अनुभवही तो कोरडेपणानेच घेतो; पण त्याचबरोबर त्याला सतत अंतर्मुखही व्हावं लागतं आहे. बापूचे वडील वारले, आजोबा चिडून निघून गेले, आई, आजी कसे तरी करून चार पैसे मिळवू लागले, बापूला मिळालेली नोकरी सुटली तर बरी असे वाटू लागले. हेरंबकाकाही त्याच्या होणाऱ्या बायकोच्या आहारी जाऊन घर वेगळं करतोय, शामकाका तर जमेला धरण्यातलाच नाही. कमळीचं लग्न होऊनही नवऱ्याच्या वासनेला तिला बळी पडायला लागते आहे, या साऱ्या प्रकारात बापूचा मात्र कोंडमारा सतत होतो आहे. खरं तर बापूला हे काहीच समजत नाही. त्याला कुणाचा खोडी काढण्यात रस वाटतो, याचे मूळ इथे आहे.

त्याला हे सारे पेलत नाहीये, बापू स्वतःची वाट शोधतोय, पण पुन्हा पुन्हा तिथेच येऊन थावतोय, घुटमळतोय.

बापूची व्यक्तिरेखा लेखकानं अतिशय समर्थपणे उभी केली आहे. संबंधाचे हे छोटं जग दाखविण्यात लेखक म्हणूनच यशस्वी झाला आहे. बापूचं जीवन तसं नीरसच त्याच्यासारख्याच्या जीवनातली स्वप्नं सुद्धा फार मोठी नाहीत, तो चौकटीत बंद झालेला एक सामन्य जीव आहे पण त्याच्या या नीरसपणातील नेमकेपणा श्री. मधु साबणे शोधतात आणि हा शोधाचा प्रयत्न म्हणूनच कादंबरीला निराळा आकार प्राप्त करून देतो.

कादंबरीचा आकार, छोटाच आहे एकशे चव्वेचाळीस पृष्ठामध्ये बापूचा शाळेतला प्रवेश ते बापूचं घरातील प्रस्थान एवढा जीवनपट लेखकाने कुशलतेने उलगडून दाखविला आहे. भाष्यशैली हे या कादंबरीचे वेगळेपण म्हणायला हवं. साधी, सोपी, सरळ आणि सुबोध भाषाशैली असं तिचं वर्णन करायला हवं. भालचंद्र नेमाडे पंथातील भाषाशैलीचा हा अद्ययावत नमुना असंच वाटत राहतं.

कादंबरी आत्मकथनाच्या फॉर्ममधली नसूनही पुन्हा पुन्हा बापूच सारं काही सांगतोय असा भासही भाषाशैली निर्माण करते आणि त्यामुळे कादंबरीची वाचनीयता अधिकच वाढते.

या कादंबरीच्या बाबतीत कलात्मक मूल्ये इत्यादीच्या गोंधळात न जाता ती एक वाचनीय कादंबरी आहे एवढंच म्हणणं अधिक योग्य वाटतं. 'कोसला' नंतर नेमाडपंथी साहित्यिकृतीमधील 'घरदार' ही सरस कलाकृती वाटते.

ही कादंबरी प्रश्न निर्माण करते तें जगण्याविषयी. जीवनातल्या कॉम्प्लिकेशन्स-संबंधी ही कादंबरी विचार न करता त्याचं एक चित्र डोळ्यांसमोर उभं करते. अस्तित्वाचा हा गहनगंभीर प्रश्न 'घरदार'मध्ये त्याच तीव्रतेने पण अधिक जवळचा होऊन उभा ठाकतो आणि अंतर्मुख करतो. कादंबरीचं नेमकं यश इथं आहे असं मला वाटतं.

बापूला केंद्रस्थानी ठेवून त्याच्या जीवनातील घडामोडीबरोबरच लेखक समाजाचं चित्रण त्याच दृष्टिकोनातून करतो आणि मग समाजाचं आणि व्यक्तीचं नातं काणतं असा प्रश्न उभा करतो. या प्रश्नांची उत्तरं शोधण्याचा खटाटोप आजतागायत चालूच आहे, श्री. साबणेंनी मात्र हे प्रश्न पुनश्च उभे केले आहेत, ते प्रश्न आहेत असं वाटू न देता !

पुस्तकाच्या मलपृष्ठावरील दिलेला पुढील मजकूर म्हणूनच अधिक अर्थवाही वाटतो. जेमतेम घर चालवणारा एक बाप . जेमतेम घर चालवणारी एक आई–ह्याच्या पोटी जन्माला आला एक मुलगा . रीतीप्रमाणं शाळेत गेला, वेळ घालवायपुरत...कधी रस्त्यावरचे मित्र, जसे मिळाले तसे . जमेल तसं शिकत गेला, मिळेल तसं खात गेला... पैसे मिळवायसाठी कामं केली, हाती आली तशी...मार्गी लागण्यासाठी नोकऱ्या केल्या, मिळत गेल्या तशा...अन आता घर चालवायसाठीच घर सोडावं लागतंय...बघा तुमच्या आसपास–कदाचित तुमच्या ऑफिसातच तो कामाला लागला असेल, तुमच्या शेजारीच तो रहायला आला असेल.'

—मुकुन्द संगोराम

घरदार :
मधु साबणे
प्रास प्रकाशन, मुंबई
पृष्ठे : १४४, मूल्य : १८ रुपये.

---

## फिनिक्स निवड

# Inside The Soviet Empire

*The Myth And Reality*
By Nora Beloff.

---

पुन्हा एकदा कॅलायडोस्कोप. कधी मनोवेधक डिझाइन तर कधी सामान्य. कधी गुंता असलेले तर कधी सुटसुटीत व आटोपशीर.

क्रेमलिनच्या बुरुजावरून–नरेंद्र सिनकरोस्कोपमधील रंगीत व मनोवेधक आकृती. सोविएत रशियाची पन्नास वर्षे–संपादक वसंत पळशीकर यानी समाज प्रबोधन संस्था व मौजेच्या शेगडीवर शिजवलेले चित्रान्न. धुक्यातून लाल ताऱ्याकडे–अनंत काणेकराचे एक तरल व थ्री डायमेन्शनल डिझाइन. व्होल्गा जेव्हा लाल होते–वि. स. वाळिंब्याची गवसणी. मुंबई ते मॉस्को व्हाया लंडन–माधव गडकऱ्याची ट्रिप. हुकुमशहा स्टॅलिन र. धों. धाणेकराचं चित्रण,–एवं मराठी. Inside Russia by John Gunther. Soviet Union : Fifty years–by Harrison Salisbury. The Russians by Hedrick Smith. Russia : The People and the Power by Robert G. Kaiser KGB by John Barron. The New Soviet Psychic Discoveries –Henry Gris & Dick William. Gulag Archipelago by Alexander Solzenytsin. I owe Russia $ 12. by Bob Hope. Psychic Discoveries Behind Iron Curtain या सर्वांतून रशियाचे डिझाइन, फर्मा किंवा पाटण पाहिले की, खरे काय नि खोटे काय हा प्रश्न साहजिकच पडतो.

याशिवाय रुश्चेव्ह, स्वेतलाना, स्टॅलिन, लेनिन, मार्क्स, टॉलस्टॉय यांची चरित्रे, आत्मचरित्रे व इतर वाङ्मय 'फिनिक्स' मधे आहेत.

रशियावर व रशियन्सनी लिहिलेली इतकी पुस्तके कम्युनिझमचा कसलाही प्रचार न करता 'फिनिक्स' मध्ये आली कशी? आजपर्यंत या लालबावटी देशावर माझ्या ग्रंथालयात सर्व देशापेक्षा जास्त पुस्तके असतील हे माहिती नव्हते. सौ. नोरा बेलॉफच्या पुस्तकावर हा लेख लिहिताना सहज चेक केले तेव्हा आढळून आलं.

काय चालत असेल या बंद खिडकीमागे किंवा या पडद्याआड याची उत्सुकता नेहमीच माणसाला असते. एखादं घर नेहमीच बंद असतं व आत 'क्या चल रहा है?' तसं बाबू व आयर्न कर्टनमागे काय होत आहे याबद्दल बरंवाईट ऐकायला मिळतं.

पण निव्वळ कुतूहलापोटीच एवढी पुस्तके माझ्या वाचनालयात आली असे म्हणणे एकदम खरे नाही. अर्थात सत्य हे आहे की, सोव्हिएट युनियनने भूतलावर ऑक्टोपसच्या पायासारखा प्रदेश व्यापून टाकला आहे. शिवाय युद्धशास्त्रात तो जगात नं १ चा देश. तेथे साहित्यिकही काय कमी झाले?

टॉलस्टॉय, डोस्टोव्हस्की, पास्टरनॅक, सोल-झेनित्सिन, चेकॉव्ह, मायकल सॉलोकॉव्ह, टरगेनेव्ह वगैरे या सर्व कारणामुळे वाचकाची सोव्हिएट युनियनविषयी वाचण्याची उत्सुकता नेहमीच असते असे वाटते. नाही तर आम्ही लालबावटी देशावर एवढी पुस्तके घेतली नसती कारण पुस्तके विकत घेताना आम्ही फिनिक्सच्या वाचकाचा प्रामुख्याने विचार करीत असतो.

सौ. नोरा बेलॉफचे हे रशियाचे पुस्तक म्हणजे काही प्रमाणात टवाळखोरीच, पण पुस्तकात टवाळखोरीबरोबरच माहितीही चांगलीच आहे शेवटी त्याना जसे लोखंडी पडद्यामागे (आयर्न कर्टन) अनुभव आले असतील तसेच त्यानी लिहिले असेल.

तशी बॉब होपच्या पुस्तकात टवाळखोरी काय कमी आहे ? त्याच्या पुस्तकावर चक्क छापलेले आहे 'We had a very successful trip to Russia'—व त्याहूनही बारीक टाइपमध्ये 'We came back with 65 photographs !'

सोव्हिएट रशियाच्या आत जाणाऱ्या व बाहेर येणाऱ्या लोकाना इतके सतावले जाते की, रशियाला टुरिस्ट धंद्याची काहीच फिकीर नाही असे वाटते. आमच्या वाचनालयातील काही वाचक थोडचा थोडचा वेळाने अभिमानपूर्वक सागत असतात की, मी चाललो बरं का USA ला, जपानला, कॉन्टिनेन्टला वगैरे; पण माझ्या ऐकिवात असे कधीही आले नाही की, 'मी तिबेटला चाललो', 'चायनाला चाललो' किंवा 'सोव्हिएट युनियनकडे माझे प्रयाण होणार आहे.'

सौ नोर बेलॉफ या एक पत्रकार (The Observer, London) आहेत. रॉयटर व The Economist याचेकडेही त्यानी काम केले आहे· त्याची मैत्रीण मार्गारेट हिच्याबरोबर त्यानी व्हॉक्सवॉजेन गाडीत, चॉप- हंगेरी येथून रशियात प्रवेश केला व कार्पेथियन रेंज, ब्लॅक अर्थ रीजन क्रीमिया, डॉन व्हॅली अशी ५००० किलोमीटर्सची मोटर रॅली केली. मोटर रॅलीच ती. कारण रशियाचे रस्ते इतके खराब आहेत की सौ. बेलोफना आपण व्हॉक्सवॉजेनच्या दणकटपणाची (endurance test) घेत आहोत की काय असे वाटले.

रस्त्यांचा विषय निघाला म्हणून आठवते. इतिहासकार श्री लिडेलहार्ट एकदा म्हणाले होते की रशियाचे रस्ते खराब होते म्हणून हिटलरचा मोटारीचा काफिला १९४१ च्या ख्रीसमसमध्ये ठरल्याप्रमाणे मॉस्कोपर्यंत पोचू शकला नाही. तेव्हापासून रशियाने जो चागल्या रस्त्याचा धसका घेतला तो आजतागायत तसाच आहे वास्तविक रशियाचा आर्थिक आराखडा वर्षानुवर्षे आधी तयार असतो; पण मोटारीच्या बाबतीत मात्र त्यानी पचकाच केला आधी दुरुस्तीकेंद्रे न उघडता व रस्त्याची सुधारणा न करता रशियाने मोटारीच्या धद्यात कोटचवधी रुपये ओतले ! मोठमोठचा शहरात व त्याच्या भोवतालच्या परिसरात मात्र रस्ते चागले ठेवले जातात. गैरकारभार, लाचलुचपत व लालफितीचा ऑक्टोपस या गोष्टी इतर देशातही भरपूर प्रमाणात आहेत हे या पुस्तकात वाचून किती negative समाधान झाले म्हणून सागू !

एके ठिकाणी तर सौ. नोरा बेलॉफ यानी त्याची वॉक्सवॉजेन ठरलेल्या रस्त्यावरून थोडीशी आडोशाला नेली लगेच सोव्हिएट पोलिस तिथे आले व नकाशावर बोट दाखवून म्हणाले की तुमची मोटार टूरचा ठरलेला रस्ता सोडून गेली आहे !

सुरुवातीलाच सोव्हिएट देशात त्याची मोटार चेक–पोस्टवर थकल्यावर लेखिकेची व त्याच्या मैत्रिणीची कडक तपासणी केली गेली. त्याची दस्तूरखुद्द वॉक्सवॉजेनचा प्रत्येक भाग सुटा करून तपासण्यात आला टुथपेस्टवर रशियन नजर फिरवली गेली

ट्रकवर प्री फॅब्रिकेटेड खोल्याच्या खोल्या टाकून घराचा प्रश्न सोडवण्यात आला. पण त्या घरांच्या दर्जाचे वर्णन वाचले की ती काँक्रीट झोपडपट्टीच वाटते.

सोव्हिएट रशिया नुसत्या युद्धशास्त्रात नं. १ चा देश नाही. पिण्यातही तो जगाच्या आघाडीवर आहे हे मी आधी सांगितलेच आहे.

कीव्ह (Kive) शहराविषयी नोरा बेलॉफ या पुस्तकात प्रशसा करतात. दनायपर नदीच्या जवळ ते वसलेले आहे तिथल्या बागा, जवळपासची झाडी वगैरे अगदी उत्कृष्ट आहे.

कीव्हमध्ये दोन युद्धाची स्मारके आहेत. वेगवेगळचा टोकाची एक टॉवर ऑफ द अननोन सोल्जर हे स्मारक जरी युद्धाचा उघड उघड उदोउदो करीत नसले तरी अपरोक्षरीत्या युद्धातील शिस्तीचे द्योतक आहे दुसऱ्या स्मारकाविषयी बऱ्याच लोकाना माहिती आहे, ते बाबीयार. माझ्या आठवणीप्रमाणे या नावाचे श्री. कुझनेस्टॉव्ह किंवा दुसऱ्या कोणत्या तरी स्टॉव्ह किंवा रॉव्हने या नावाचे पुस्तकच लिहिले आहे. इथे सुमारे ६० ते ८० हजार ज्यूंची कत्तल करण्यात आली होती. त्यात कीव्हमधील जवळजवळ सर्वच ज्यू होते. हत्या जर्मन लोकानी केली होती, पण युक्रेनियन्सनी त्यांना मदत दिली होती. सौ. नोरा बेलॉफ असे म्हणतात की कीव्हमध्ये ज्यू लोकाच्या विरुद्ध अजूनही द्वेष आहे. माणूसजात एकूण सारखीच म्हणजे, हा मारवाडी, हा गुजराथी, हा हिंदू, हा मुस्लिम ही भावना विकसित व सुधारलेल्या देशातही अजून कायम आहे.

कम्युनिस्ट पार्टीच्या दोन सभासदांच्या घरी सौ नोरा बेलॉफ व त्याच्या मैत्रिणीने भेट दिली काही औपचारिक गप्पा झाल्यानतर या सभासदानी सौ. बेलॉफला एक विनंती केली, (कम्युनिस्ट पार्टीचे हे दोन सभासद म्हणजे एक दापत्यच होते.) त्याना पाश्चात्य देशातून मानसशास्त्राची पुस्तके हवी होती. त्याना सोलझेनित्सिनचे ऑगस्ट १९१४ हे पुस्तकही हवे होते ! या दापत्याने ही पुस्तके K. G. B ला फसवून रशियात स्मगलर कशी करावी याचा आराखडा सौ. बेलॉफ याना सांगितला !

—जे. एन्. पोंडा


वीस व्यक्तिशोधांचा संग्रह

**देवाघरचा पाऊस**

लेखक : रवींद्र पिंगे

आवृत्ती : दुसरी

किंमत : १० रुपये

राजहंस प्रकाशन, पुणे

हिंदी चित्रपट । सदानंद बोरसे

# बंदिश

## कृपया बदलापूरचा ठावठिकाणा कळवावा

तुम्हाला बदलापूर नावाचे शहर किंवा गाव किंवा जे काय असेल ते कुठे आहे, माहीत आहे का ? *असेल तर कृपया कळवा.* कारण 'बंदिश' पाहिल्यापासून मी त्याचा अत्यंत बेकरारीने शोध घेत आहे. कारण काय विचाराल, तर त्या कॉलेजात एक वैद्यकीय महाविद्यालय आहे. आता पुण्याचे 'बैरामजी जीजीभॉय' पाहून आपल्या मनात वैद्यकीय महाविद्यालयाबद्दल एक ठराविक प्रतिमा बसलेली असते आणि तिचा आणि एकूण आजारपण, रोगी, इस्पितळ यांसारख्या गोष्टींचा अतिशय अतूट ऋणानुबंध असतो; पण हे बदलापूरचे वैद्यकीय महाविद्यालय म्हणजे एकदम मेडिकल कॉलेजच आहे आणि तेही पुण्या-मुंबईच्या कुठल्याही आर्टस कॉलेजच्या फाडकन तोंडात मारील असे मेडिकल कॉलेज आहे. म्हणजे असे की, त्या मेडिकल कॉलेजात हेमामालिनी, बिंदिया गोस्वामी, प्रीति गांगुली इत्यादी अनेक सुंदर कन्यका शिकण्यासाठी येतात. (धक्का क्रमांक १) त्या मुलींच्या अनेक खोड्या काढण्याची (खरे म्हणजे विनयभंग करण्याची) मुक्त परवानगी कॉलेजातील प्रौढ विद्यार्थ्यांना दिलेली असते. (ध. क्र. २) या मेडिकल कॉलेजच्या आवारात हॉस्पिटल, रोगी, उपकरण इत्यादी संबंधित गोष्टी दिसण्यापेक्षा पोहण्याचा तलाव, हिरवे हिरवे गार गालिचे असलेली प्रशस्त मैदाने इत्यादी गोष्टी अधिक भरल्या आहेत. *(अधूनमधून एवढ्या मोठ्या कॉलेजातील* फक्त चार की पाच मृतदेह ठेवलेला 'डिसेक्शन हॉल' सुद्धा आढळतो; पण तो नियमाला अपवाद समजावा.) मुख्य म्हणजे या तलाव व मैदानांचा विद्यार्थी मुलींना पाण्यात ढकलणे, त्यांचा पाठलाग करून शिवणापाणी खेळणे आणि अन्य अशाच उद्योगांसाठी मनचाहा वापर करू शकतात आणि यावरची सर्वांत कडी म्हणजे मुलांबद्दल कितीही तक्रारी आल्या तरी त्यांना समज, मग कडक समज, मग कडक-कडक समज आणि मग अधिक कडक-कडक समज देऊन सोडून देणारे पिंचू कपूर नावाचे प्रेमळ डीन या कॉलेजला लाभले आहेत. आता इतक्या सगळ्या उत्तमोत्तम गोष्टी उपलब्ध असताना या सर्वच विद्यार्थ्यांचा अभ्यास किती उत्तम होत असेल, याची कल्पना येईलच. म्हणूनच 'बदलापूर' कुठे आहे याची मी सध्या बेकरारीने चौकशी करीत आहे.

आता तुम्ही म्हणाल, मला एवढ्या *सगळ्या बित्तंबातम्या कशा लागल्या ?* तर डी. रामा नायडु नावाच्या एका सद्‌गृहस्थांनी या गुणी कॉलेजात चालणाऱ्या अभ्यासेतर उपक्रमांना भरघोस प्रसिद्धी मिळावी, या सद्‌हेतूने 'बंदिश' नावाचा चित्रपट काढला. तो पाहिल्यामुळे मला हे सर्व शोध अचानक लागले.

शिवाय या कॉलेजातील विद्यार्थ्यांचे उपक्रम एवढ्यावरच संपत नाहीत. उदाहरणादाखल त्या कॉलेजातील किशन नावाच्या तरुणाचे आयुष्य आपण बघू. या किशनचे कॉलेजातील मधू नावाच्या मुलीवर प्रेम बसते. (अरे हो, बदलापूरचे आणखी एक वैशिष्ट्य सांगायचे विसरलोच— प्रत्यक्षात अस्तित्वात नसलेल्या पण हिंदी चित्रपटांमध्ये पोत्यांनी *आढळणाऱ्या आणि प्रियकर-प्रेयसीच्या मुक्त* व प्रेमळ धावपळीसाठी राखून ठेवलेल्या निर्मनुष्य जागाही बदलापूरमध्ये भरपूर आहेत.) तर थोडेसे प्रेम करून झाल्यावर किशन व मधूने लग्न करायचे ठरवले. लग्न म्हणजे एकदम आज मंगनी, कल ब्याह. त्यामुळे मधूच्या घरच्यांना या गोष्टीचा पत्ताच नव्हता. मधूनेही 'हॅं, लग्न तर करते आहे. त्यात काय कळवायचंय ?' म्हणून कळवले नाही. तर संध्याकाळी लग्न म्हटल्यावर दुपारी अचानक मधूचा खून झाला. (टि ढी ऽ ग ! ढॅटणॅण् ! ! — अर्थात रहस्य.) मग किशन निघाला त्या खुन्याला शोधायला; तर वाटेत त्याला भेटली मधूची जुळी बहीण— चंचल. मग किशनने विचार केला, 'जाऊ दे, आपण *त्या खुन्याला शोधण्यापेक्षा या* चंचलमध्ये मधूला शोधू.' असा सुज्ञ विचार करून त्याने ते काम चालू केले आणि ते पूर्ण होत आले असताच तो खुनीही 'मला पकडा, मला शिक्षा द्या !' म्हणत हजर झाला. शेवटी थोडीशी मारामारी, किशनने एक टाइमबाँब गळ्यात घालून पाच कोटी रुपये (म्हणजे नेमके किती हो ?) शोधायला जाणे असे थोडे गंमत-जंमत जादूचे खेळ झाल्यानंतर किशनला चंचल मिळाली, शिवाय त्याचे 'मधू हॉस्पिटल'ही जोरात चालू लागले आणि सगळे कसे व्यवस्थित मार्गी लागले.

हो, आणखी एक सांगायचे राहिलेच. तो जो शिक्षा मागायला आलेला खुनी होता ना, आपल्या किशनचाच बालपणी हरवलेला वडीलभाऊ— कपिलकुमार, (काय ही नियतीची *अजब तऱ्हा किंवा दैवाचा दुर्दैवविलास* वगैरे.) त्याच्या हातून मधूचा खूनही चुकून होतो शेवटी खरा खलनायक तिसराच असून त्याची शेवटी 'बाप्पाने भली खोड मोडली' झाल्यावर चित्रपट संपतो.

आता या सगळ्या प्रकरणात एखाद्या ठिकाणी जरी थोडासा घोळ झाला असता; तरी— पण घोळ होणार कसा ? कारण कॉलेजातून बाहेर पडणाऱ्या प्रत्येक किशनसाठी के. बापय्या नावाचा एक हिंदी मालमसाल्यात मुरलेला दिग्दर्शक नेमलेला असतो. वाटेल तसे डोके चालवून नव्हे तर लढवून तो प्रत्येक गोष्टीतून बरोबर वाट काढतो आणि 'गो ऽ ड शेवटाशी येऊन भिडतो. कारण 'आयुष्य म्हणजे दोन अधिक दोन चार असे *तर्कशुद्ध गणित नसून योगायोगाचा एक प्रचंड* गुंतडा आहे' या तत्त्वावर त्या दिग्दर्शकाचा भला दांडगा विश्वास असतो.

बदलापूरला प्रसिद्धी देणे, एवढाच संपूर्ण चित्रपटाचा उद्देश असल्याने आणि त्यावरच सर्व लक्ष केंद्रित झाल्यामुळे इतरांचे आपापल्या कामाकडे दुर्लक्ष झाले आहे. उदाहरणार्थ राजेश खन्ना, हेमामालिनी, असरानी, डॅनी इत्यादी लोकांचे अभिनयाकडे वा लक्ष्मीकांत प्यारेलाल यांचे संगीताकडे दुर्लक्ष झाले आहे; पण त्याबद्दल त्या लोकांना माफ करण्यात यावे.

सरतेशेवटी वाचकांना नम्र आवाहन—

कृपया बदलापूरचा ठावठिकाणा कळवावा.

□

## निवडणुकांचा कौल : पृष्ठ ४ वरून

प्रभावी, पर्यायी निरोधी पक्षाचा अभाव कल्पक-प्रतिभाशाली अशा विरोधी नेतृत्वाचा अभाव, जनमानसातील विरोधकाबद्दलचा अविश्वास जनतेच्या जिव्हाळ्याच्या कार्यक्रमाचा अभाव अशा अनेक अभावातून विरोधकाना हे अपयश आलं आहे. 'लोकशाही वाचविण्यासाठी सर्व विरोधकानी एकत्र येऊन हुकूमशाही-एकाधिकारशाही शक्तीशी सामना देण्याची ही वेळ आहे,' असला तोच तो प्रचार लोकांनी दोन निवडणुकात स्पष्टपणानं झिडकारूनही नवं काही विरोधी नेत्याना सुचलेलं नाही. 'लोकशाही रक्षणाच्या' आपल्या 'लढ्या'वर जनतेचा विश्वास राहिलेला नाही, आपल्या आघाड्या जनतेला मान्य नाहीत, ही वस्तुस्थिती या नेत्याना अजून उमजत नाही. उमजली असली तर नवा मार्ग काढता येत नाही. थकलेल्या कल्पनाचं थकलेलं नेतृत्व जनतेच्या मनात नव्या आशा-आकांक्षा जागवू शकत नाही. अखेर लोकमानसात रुजण्यासाठी लोकांना हवहवंसं वाटेल असं, जिव्हाळ्याचं वाटेल असं काही नवं आशादायी स्वप्न जागवावं लागतं. त्याच्या पूर्तीचा प्रभावशाली कार्यक्रम जनतेपुढे मांडावा लागतो. कुठलाही राजकीय पक्ष अतिशयोक्त स्वरूपातच हे 'नव्या रचने'चं चित्र रंगवत असतो. त्यासाठी प्रतिभाशाली नेतृत्वाची गरज असते. दुर्दैवानं, आज एखाद्या नेत्याचा अपवाद वगळता विरोधी पक्षाची याबाबत निराशाजनक अवस्था आहे. या साऱ्याचाच त्यांच्याकडे अभाव आहे. महागाईविरोधी आदोलनासारखे गुळगुळीत झालेले आणि अंतिमत: केवळ राजकीय हेतूनं उभारले जाणारे, जनतेच्या दृष्टीनं निष्फळ ठरणारे लढे लोकांना आता नको आहेत. अशा लढ्यातलं राजकारण उमगून जनता आता त्याला उबगली आहे. हे सत्य विरोधक अजून स्वीकारायला तयार नाहीत. शेतकरी आदोलनासारखं भिडणारं आदोलन कुठल्याही राजकीय नेत्याला सुचत नाही, त्यासाठी राजकारणाबाहेर असलेल्या एका शरद जोशीनी दिशा दाखवावी लागते. मग सारे फरफटत त्यांच्या आदोलनाचं नेतृत्व करण्यासाठी धावायला लागतात. आसाम आंदोलनात कुठला राजकीय पक्ष पुढं येऊ शकत नाही. विद्यार्थी तिथे या पक्षाना नाकारून उभे राहतात. ही काही उदाहरणंही बोलकी आहेत. विचार करायचं ठरवलं तर विरोधी पक्षाना बरच काही सांगू शकणारी आहेत.

कॉंग्रेस (आय)च्या कारभारावर जनता संतुष्ट आहे, असं नाही; पण 'नाही तर कोण' हा पर्यायाचा प्रश्न जनतेपुढं उभा आहे आणि कुठलाही विरोधी पक्ष अगर नेता त्याचं उत्तर देऊ शकत नाही. 'पर्यायी' म्हणून उभं राहण्यासाठी पक्षबांधणी करण्यावर काही प्रमाणात भाजपचा अपवाद वगळता कुणाचाच भर दिसत नाही. 'तात्कालिक कार्यक्रमावर आधारलेले हंगामी विरोधी पक्ष' असं स्वरूप बहुतेकाना आलेलं आहे. गेल्या काही वर्षांमधल्या या सर्व पक्षाच्या वर्तनानं त्यांच्या आघाड्यावरचा जनतेचा विश्वास उडालेला आहे. तरीही त्यांचा आघाड्याचा सोस कायम आहे. (त्यातही मतभेद आहेतच. १९६७ मधले अंतुल्याचे प्रतिस्पर्धी उमेदवार, या वेळी ज्याच्या नावाची विरोधकाचे उमेदवार म्हणून चर्चा चालू होती ते, गेल्या विधानसभा निवडणुकीतले जनता पक्षाचे उमेदवार, शे. का पक्षनेते भाई दांडेकर, जनता पक्षाचे आमदार अशोक साबळे आदीनी अंतुल्यांना जाहीरपणे पाठिंबा दिला होता. हे एकच उदाहरण मतभेद दाखवायला पुरेसं आहे.) त्यातून दिवसेदिवस त्यांचं सामर्थ्य घटतंच आहे. ते तसंच घटत राहिलं तर लोकशाही व्यवस्थेतच एकपक्षीय सत्ताशाही यायला वेळ लागणार नाही. म्हणूनच आघाड्याच्या मागे लागून तात्पुरता विचार न करता दूरगामी विचार करून संघटित पक्षबांधणी करण्याकडे विरोधकांनी लक्ष द्यायला हवं, हाच या पोटनिवडणुकांच्या निकालाचा अन्वयार्थ आहे. जनतेच्या या इशाऱ्याकडे डोळेझाक करून आमचे विरोधक अजूनही 'एकाधिकारशाही विरुद्ध लोकशाही' हाच जप करत राहणार असतील तर त्याच्या दु:स्थितीचे धनी दुसरं कोण असेल ? □


सामाजिक चळवळीच्या इतिहासाविषयी आस्था असणाऱ्या सर्वांना
हे पुस्तक वाचावंसं वाटल्याशिवाय राहणार नाही. —डॉ. य. दि. फडके

# महाडचा मुक्तिसंग्राम

लेखक : प्रा. रा. म. बिवलकर / प्रा. झुंबरलाल कांबळे

मूल्य : वीस रुपये. — राजहंस प्रकाशन, पुणे ३०.